साप्ताहिक

# माणूस

८ फेब्रुवारी ८६/२ रुपये

## संगमनेर दंगल

### — एक सत्यशोधन



साप्ताहिक

माणूस

□

वर्ष : पंचविसावे

अंक : सदतिसावा

□

८ फेब्रुवारी १९८६

किंमत : दोन रुपये

□

संपादक

श्री. ग. माजगावकर

□

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

□

वार्षिक वर्गणी

साठ रुपये

□

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही

□

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

□

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ४११०३०

दूरध्वनी : ४४३४५९


□

मुखपृष्ठ–सुरेश नावडकर

□

छायाचित्रात : कॉलेज रोडवर जमावाने पेटवलेली कांद्याची ट्रक व उध्वस्त दुकाने

छायाचित्रे : राज फोटो स्टुडिओ व मोना आर्ट, संगमनेर



# मुंबापुरी

## □ मनमोकळेपणा

थोर समाजवादी नेते एस्. एम् जोशी यांचा अठ्ठावीस तारखेला कामगार मैदानावर झालेला नागरी सत्कार चिरस्मरणीय ठरला तो अण्णाच्या भाषणामुळे. उत्तरादाखलचं अण्णांचं भाषण म्हणजे एका उत्कट मनाची कैफियत होती. त्याला प्रसन्न निर्व्याजतेची किनार.

अण्णा वक्तृत्वोत्तेजक सभेतल्या फडर्या वक्त्यासारखं बोलत नाहीत. भाषणात कुठेही आव नसतो, आवेश नसतो. (दंडवते, आर यू लिसनिंग ? अ‍ॅण्ड व्हेअर इज मधू लिमये? या लिमयांकडे साधं बोलायचीही छाती होत नाही बुवा आपली. लगेच बिस्मार्क, गॅरिबॉल्डी, मॅझिनी या सगळ्यांचे पूर्वज काढतात. आपण आपले पामर. आपण थोडेच समाजवादी चळवळीत आहोत ?)

हल्ली आपण सत्कारसोहळे का स्वीकारीत नाही ते अण्णांनी मार्मिक शब्दात मांडलं. 'या वयात सत्कार घेत बसणं योग्य वाटत नाही. तुम्ही लोक असे सत्कार वगैरे करून आम्हाला चढवून ठेवता. लोकांच्याही मग आमच्याकडनं अपेक्षा उंचावतात. आणि त्या अपेक्षा पूर्ण करण्याचं सामर्थ्य माझ्यापाशी आता या वयात नाही. दुसरं, चांगुलपणा करण्याचा तो काळ वेगळा होता. आताचे दिवस वेगळे आहेत.'

हे सगळे सांगताना कुठेही कटुता नाही, प्रिटेन्स नाही, टॉकिंग डाऊन द ऑडियन्स नाही. हा निष्पाप मनमोकळेपणा एसेम यांच्या आत्मवृत्तातही ठायीठायी आढळतो. हा निर्दोष भाबडेपणा एकट्या एसेममध्येच नव्हे तर अनेक समाजवादी नेत्यांत वेळोवेळी आढळून आलाय. समाजवादी चळवळीला ही 'नाईविटी' चांगलीच भोवली. असो.

अण्णांचा सत्कार मुंबई महापालिकेच्या वतीने झाला. एकशे सत्तर नगरसेवकांपैकी कितीजण या सत्काराला हजर होते याची आकडेवारी मिळेल काय ? बाबा आमट्यांच्या नागरी सन्मानाला नगरसेवकांची उपस्थिती विशेष जाणवत नव्हती. अण्णांच्या सत्कारालाही फारसे नगरसेवक हजर नव्हते. आता पुढील महिन्यात राजीव गांधींचा सन्मान आहे असं ऐकतोय. त्याला पहा कसे सगळे जमतील. गुळाची ढेप दिसली की मुंगळे झाले गोळा.

## □ गेले ते रंग ?

नागपूरचं अधिवेशन जरी सुरळीत पार पडलं असलं तरी येते काही दिवस मुख्यमंत्र्यांना जड जातील, गटबाजी अन् पक्षांतर्गत हेवेदावे उफाळून येतील असं एका ज्येष्ठ सत्ताधारी नेत्याने काल फोनवर 'ऑन ओथ' सांगितलं.

शिवाजीराव पाटलांच्या खिलाफ डिनर–मीटिंगा सुरू झाल्या आहेत अशीही पुस्ती त्यांनी जोडली. मागे एकदा अशीच आवई उठली (किंवा उठवली) होती की रामराव आदिक, भोसले, बळीराम हिरे, प्रभृती नेते शिवाजीरावांविरुद्ध डिनर डिप्लोमसी रचताहेत. आम्ही भोसल्यांना विचारलं तर ते म्हणाले, 'अहो, आता आम्ही साधं जेवायचं सुद्धा नाही का ?'

खरंच आहे ते. चार ज्येष्ठ नेते एकत्र बसून जेवले. आदिकांनी सौ. भोसल्यांच्या पाककौशल्याची किंवा भोसल्यांनी सौ. हिऱ्यांच्या 'डेजर्ट'ची वाखाणणी केली तर त्यात बंडखोरी कसली ? 'आम्ही जर चार-पाच जण एकत्र सहभोजनाला बसलो तर मुख्यमंत्र्यांना घास कमी जातात, त्याला आमचा इलाज काय ?' यू सेड इट, भोसले.

आता पुन्हा अशी हवा आहे की आदिक बंडखोरांचं नेतृत्व करणार. त्या दिशेने पूर्व-तयारी म्हणून काही नेते भोजनं

घालताहेत. परवा, मित्रवर्य प्रफुल्ल सागळे यांच्या 'सत्ताचक्र' या पुस्तकाच्या प्रकाशन-सोहळयाला आदिक भेटले. ते काही बंडाच्या मूडमध्ये दिसले नाही. झुलपं जरा जास्त काळी दिसली इतकंच. बाकी सगळा मूड अगदी 'गेले ते उडून रंग, उरले हे फिकट सग' असा.

माझ्या हॅनोव्हर-वारीवर सपादकीयातून माझ्यावर यथेच्छ कोरडे ओढणारे संपादक स्वत: मात्र व्हिस्की पिऊन अग्रलेख लिहायला बसतात, असं आदिक या समारंभात बोलताना म्हणाले. आदिकाची व्यथा समजण्यासारखी आहे. पण रामरावजी, एडिटर मडळी काही विमानात गीत नाहीत किंवा घेतलेच जर दोन पेग तर धांगडधिंगा करत नाहीत रामराव खरं तर एक बुद्धिवंत (सॉरी. बुद्धिवान, बुद्धिमंत वगैरे) वकील. त्यात मॅडमची खास मर्जी असलेले. त्याचं असं व्हावं ? असो.

आता आदिकानी आपल्या आठवणी लिहून काढाव्यात. बाबासाहेब भोसलेंचं आठवणीवजा पुस्तकही तयार होतय त्यात जर शालिनीताईंनी देखील मनावर घेतलं आणि आपला जीवनपट लिहून काढला तर क्या बात है ? आम्हाला शालिनीताईंच्या चरित्रासाठी एक वेधक कॅच-लाईनही सापडली. 'वसत आला निघून गेला, मला कुठे वर्तमान होते ?'

बड करण्यापेक्षा थंड होणे हेच आता श्रेयस्कर.

## □ अक्षरप्रयोगी जोशी

'सत्यकथे'च्या मुखपृष्ठातून र. कृ. जोशींशी पहिलीवहिली भेट झाली. अक्षरलेखनाचे प्रयोग ते साप्रत करताहेत हे ऐकून होतोच. चिमणलाल कंपनीच्या सुरेख डायऱ्या आणि 'मौजे'चं 'सत्यं, शिवं, सुदर'सारखं रसरशीत मुखपृष्ठ पाहून जोश्याच्या एकूण प्रयोगाविषयी कुतूहल वाढलं. परवा, जानेवारी तेवीस ते एकूणतीस, जोश्यानी एशियाटिक सोसायटीच्या दालनात आपलं कॅलिग्राफीच प्रदर्शन माडल अन् तेव्हापास्नं आमचं जोश्यांविषयीचं आणि त्याच्या कॅलिग्राफीविषयीचं कुतूहल सॉलिडच वाढलं.

जोशी गेली वीस वर्षं अक्षरलेखनाच्या वेडाने झपाटलेत. बरं, त्यांच्या या सगळया नादावण्यामागे प्रचंड डिसिप्लीन, अभ्यास आहे. रॉयल एशियाटिक लैब्ररीच्या ग्रंथागारात बसून जोशींनी प्राचीन हस्तलिखितांचा जो अभ्यास केला त्यामागे मूळ प्रेरणा होती सतराव्या शतकातल्या प्रयोगशील कॅलिग्राफर पॅलातिनो या इटालियन अवलियाची.

आमच्या लेखनकौशल्याच्या त्यातल्या त्यात मर्यादा म्हणजे समास सोडून, सुवाच्य लिहिणे जोशीचा वकूब सॉलिड. केवढी अक्षर ! वळणदार, ठसठशीत, रसरशीत, घुमावदार, जाड, पातळ, रेखीव, प्राणदायी.......

हे प्रदर्शन लॉर्ड मौंट स्टुअर्ट एलफिस्टनसाहेबाच्या स्मृतीला अर्पण केलं होतं. 'शहाणे करून सोडावे'......या ब्रीदाला साक्षात जागून नेटिवांना अक्षरमंत्र देणाऱ्या एल्फिस्टनला ही आदरांजली उचितच होती.

या प्रदर्शनाद्वारे एशियाटिक सोसायटीने आपल्या मुख्य दालनातला काही भाग कला-पुराणवस्तू–साहित्य–संशोधन–अभ्यास–प्रदर्शन करता खुला ठेवण्याचे ठरवलंय. अक्षरलेखनासारख्या इतर चिंतनशील प्रयोगांना आता एक सुजाण व्यासपीठ उपलब्ध झालंय ही समाधानाची गोष्ट. थॅक्यू, अशोक शहाणे, दुर्गा भागवत अॅण्ड फ्रेण्ड्स.... ..

□

जाता जाता : दादा कोंडक्यांच्या 'अंधेरी रातमें, दिया तेरी हाथमे' या लेटेस्ट हिंदी चित्रपटात सेन्सॉर बोर्डाने बत्तीस कट्स सुचवलेत. सेन्सॉरचं सगळयात स्ट्रॉंग ऑब्जेक्शन मेहमूदच्या या एका वाक्याला होतं म्हणतात. मेहमूद एका दृश्यात कोंडक्याना सांगतो : 'धिस इज फॉर युवर काइन्ड इन्फर्मेशन अॅण्ड ब्रॉडकास्टिंग...' सॉरी, कट् प्लीज !

—विष्णू जयदेव

# पुणे वार्ता

## □ जानदार कवीसंमेलन

एखादं रंगलेलं कवीसमेलन एखाद्या रंगतदार एक दिवसाच्या क्रिकेट मॅचसारखं असतं काय ? अस्मादिकांना असं वाटायचं कारण म्हणजे तिकडं ऑस्ट्रेलियात एक दिवसाच्या क्रिकेटचा धम्माल मोसम चालू आहे आणि तमाम इंडियन पब्लिकप्रमाणे अस्मादिकही त्यात मश्गूल आहेत. त्याचाच हा परिणाम.

झालं काय की, ३१ जानेवारीला आम्ही (म्हणजे आमच्या 'वर्ल्ड चॅम्पियन' खेळाडूंनी) तिकडे क्रिकेटची मॅच जिंकली आणि त्याच खुशीत रात्री टिळक स्मारक मंदिरात आम्ही ( म्हणजे अस्मादिकांनी ) अखिल भारतीय हिंदी कवीसमेलन 'अटेण्ड' केलं. आणि तिथेसुद्धा आम्हाला गावसकरसारखी नजाकतदार दिलखुष फलदाजी, रवी शास्त्रीसारखी धीर गभीर गोलदाजी आणि वेंगसरकर–कपीलदेवसारखी तडाखेबद टोलेबाजी पहायला (की ऐकायला ?) मिळाली.

पुणे विद्यापीठाच्या हिंदी विभागानं आपल्या रजत जयंती समारोहाच्या निमित्ताने हे खास कवीसमेलन आयोजित केलं होतं. अध्यक्ष होते ख्यातनाम कवी डॉ. शिवमगल 'सुमनजी.' सहभाग होता हिंदीतील जानेमाने कवी विरेन्द्र मिश्र, सोम ठाकूर, रमा सिंग, सुनिता जैन, सच्चिदानद समीर, महेंद्र मार्कंडेय आणि अशोक चक्रधर यांचा ! संचालन केले विश्वनाथ सचदेव यानी !

विश्वनाथ सचदेवानी सुरुवातीसच सागून टाकलं. 'यहाँ सिर्फ कविता होगी और कविताही होगी !' त्याचा रोख अलिकडे कवीसमेलनाच्या घसरत्या दर्जाच्या दिशेने होता. मचावरील सर्वच कवी सचदेवांच्या या आश्वासनाला जागले आणि एक दर्जेदार कवीसमेलन टिळक स्मारक मदिराच्या प्रेक्षागृहात संपन्न झाले.

हिंदी भाषा जानदार आहे आणि हे कवी जेव्हा त्याच्या कविता शब्द आणि सुरातून सादर करू लागतात तेव्हा या भाषेची नजाकत फुलारू लागते. प्रत्येक कवी आपल्या तब्येतीने आणि खासियतीने पेश झाला आणि रसिकाची मनमुराद दाद घेऊन गेला. खरं

म्हणजे सुमनजी, विरेंद्र मिश्र, अशोक चक्रधर, सुनिता जैन याना असं एका मंचावर ऐकणं हाच एक वेगळा अनुभव होता आणि तो पुणेकरानी मनमुराद लुटला.

या कवितांमध्ये सारेच रग होते. सारेच रस होते. शिवमगल सुमनजीना ऐकणे तर केवळ अनुभव होता. आपल्या पाऊणतासाच्या रसभरीत वक्तव्यात त्यानी सान्या रसांना स्पर्श केला. आपल्या वयाची तमा न बाळगता ते एकेक रचना उत्साहाने पेश करीत होते. तो उत्साह आगळा होता. त्यानी रवीद्रनाथ ऐकवले, तुलसी-कबीर ऐकवले आणि 'नीरालाजी'नाही ऐकवले. या माणसाकडे समृद्ध असं खूप आहे, ते एका रात्रीत पुरणारे नाही. 'लूट लो लूट लो यहाँ तो अमृत बह रहा है' असं त्यांच्याच शब्दात त्याच्याविषयी बोलावस वाटतं.

चढत्या रात्रीबरोबर मनमुराद रंगाची बरसात घडत होती. सच्चिदानद 'समीरा'च्या तिखट सामाजिक कविता, रमासिगाची गंभीर जीवनविषयक मुक्तके, अशोक चक्रधरांचे मनमुराद हास्य व्यग्य, सुनीता जैनांच्या राधा-कृष्ण प्रेमाच्या छोटया छोटया कविता, विरेंद्र मिश्र आणि सुमन याच्या अभिजात कविता अशा संपन्न साहित्याची मनपसद लयलूट घडत होती. एकूणच सारे वातावरण उल्हासित आणि तृप्त होते.

### □ आर एक जिन्देर बाडी

मराठी माणसाचं नाटच प्रेम सर्वांनाच ठाऊक आहे. पण नाटचप्रेमाचा हा मक्ता काही एकटचा मराठी माणसाच्याच मालकीचा नाही. बगाली माणसाचे नाटचप्रेमही तेवढेच उदड आहे. म्हणूनच की काय पुण्यात स्थायिक झालेल्या काही बंगाली बाबूंनी एकत्र येऊन नाटच चळवळ सुरू केली. तिचे नाव आहे 'जागरण'

'जागरण'ने आपला दुसरा नाटचप्रयोग ३० जानेवारीला टिळक स्मारक मदिरात सादर केला. त्याचे नाव होते 'आर एक जिंदेर बाडी.' टिपिकल बगाली स्टाईलमध्ये सादर झालेला हा प्रयोग उल्लेखनीय होता.

श्यामकात दास यानी लिहिलेल्या या नाटकाचे दिग्दर्शन सुशील चौधरी यानी केले होते. संगीताची बाजू देखील त्यांनीच सांभाळली हे नाटक म्हणजे एका तरुणाचे दिवास्वप्न. स्वप्नात त्याला 'जिंदा' या राज्याचा प्रधान भेटतो आणि राज्याभिषेकाआधीच गायव झालेल्या शकर सिगाऐवजी त्याला घेऊन जातो आणि राज्याचा राजा बनवतो. हा तरुण (पेटो त्याचे नाव) हुबेहूब शकर सिगासारखा दिसत असतो. खरं तर राजा म्हणून वावरताना पेटोची तारांबळ उडत असते पण हळूहळू तो सरावतो. त्याच्या सहज आणि साध्या वागणुकीने तो दरबाऱ्याना अडचणीत आणतो. भीमसिगासारख्या बागी लोकाना तो जीवनदान देतो तर उदीतसिग, मयूर बहानसारख्या दरबाऱ्याच्या काळया कारवाया उघड करतो. अखेर परतण्याची वेळ येतेच. अतिशय हृद्य अत:करणाने जिंदावासी त्याला निरोप देतात आणि पेटो स्वप्नातून जागा होतो.

हे नाटक एक रूपक आहे. सुराज्याची कल्पना म्हणजे दिवास्वप्नच की काय ही कल्पना माडली गेली आहे. सुशील चौधरीनी या नाटकातील बारीक जागा अचूक हेरून त्या समर्थपणे पेश केल्या. सुशील चौधरी स्वत: 'पेटो'च्या भूमिकेत वावरले. पेटोचा सामान्यपणा, राजा झाल्यानतरची त्याची तारांबळ आणि नंतर सहजतेने यथायोग्य निर्णय घेणाऱ्या पेटो त्यानी व्यवस्थित पेश केला. इतर भूमिकामध्ये अशिश घोष (प्रधानजी), अमीतेन्द्र मुजुमदार (भीमसिंग), सुमीत बसू (उदीतसिंग), रतनराव चौधरी (रुद्ररूप), शर्मिला मुजुमदार (राणी चपला) व्यवस्थित वावरले. प्रकाश आणि वेषभूषा या गोष्टीवर बगाली माणसाचे प्रेम आहे. इथे पुण्यात प्रयोग करतानाही आकर्षक वेषभूषा आणि रंगसंगती साधणारी प्रकाशयोजना करण्यास ते विसरले नाहीत.

'जागरण'चा उपक्रम केवळ बंगाली नाटके सादर करण्याचा नाही, तर तो बहुभाषिक आहे. त्याचे या पुढचे नाटक हिंदी असणार आहे. आणि इतर भाषांतूनही हा उपक्रम राबवण्यांचा त्याचा विचार आहे.

—मनोहर सोनवणे

## सांस्कृतिक नागपूर

# दोन मंदिरे

महाराष्ट्रात संशोधन संस्था अगदी हाताच्या बोटावर मोजण्याइतक्या आणि त्यातही त्यांना पैसे कोण देणार ? पुण्यात काय किंवा नागपुरात काय– विद्वत्क्षेत्रात अगदी थोडी माणसे सरस्वतीची निष्ठेने सेवा करताना आढळतात. कै. ग. ह. खऱ्यांमुळे भारत इतिहास सशोधन मडळाला बरे दिवस आले तर नागपुरात डॉ मिराशी यांच्यामुळे विदर्भ संशोधन मडळ उभे राहिले. परंतु महाराष्ट्रातल्या बहुतेक विद्वान मडळींनी एकखांबी तंबू उभे केले. सस्था चालण्याकरिता विद्वत्तेची आवड असणारी काही चांगली माणसेही आपल्याभोवती गोळा करावी लागतात. मिराशी गेल्यानतर विद्वत्तेशी निष्ठा बाळगून असणाऱ्या काही मंडळींनी धडपड चालविली आणि विदर्भ सशोधन मडळ पूर्वीच्याच दिमाखात चालू राहील याची दक्षता घेतली. त्यातच गेल्या २३ तारखेला एक नवल घडले. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमत्री श्री. शिवाजीराव पाटील निलगेकर स्वत: मडळात आले आणि मडळाच्या धडपडया मडळींनी अभ्यासकाच्या सोयीच्या दृष्टीने पहिल्या मजल्यावर जे सभागृह बांधले त्याचे त्यानी मोठया थाटामाटात उद्‌घाटन केले. त्याचबरोबर त्यानी २५००० रुपयाची देणगीही मडळाला दिली. ह्याचे सारे श्रेय मडळाच्या कार्यकर्त्यांना ज्याप्रमाणे आहे त्याप्रमाणे मडळाच्या कार्यात सतत रस घेणाऱ्या श्री. जयतराव टिळकाना आहे. 'तुम्ही मडळात चला. तिथे तुम्हाला दहा हजाराची सभा दिसणार नाही परंतु अभ्यास करणारी १०–५ मडळी तुम्हाला तिथे दिसतील. याना कोण मदत करणार? लक्ष्मीने–सरकारने सरस्वतीला मदत केलीच पाहिजे. नाही तर महाराष्ट्रात सरस्वतीची पूजा कशी होणार?' जयतराव टिळक (महाराष्ट्र विधान परिषदेचे अध्यक्ष) नेहमी ह्याच शब्दात सत्ताधिशाना त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून देतात आणि प्रेमाच्या अधिकाराने त्यांना अशा

एखाद्या विद्वत संस्थेत घेऊन जातात. त्याना अशा संस्थाना मदत करावयास भाग पाडतात.

अहो या महाराष्ट्र सरकारला झाले तरी काय ? परवा ह्या सरकारने नागपूर–विदर्भातल्या सर्वच रसिक लोकाची दाडीच उडविली ! सर्वांचे लाडके गायक कै श्री. वसतराव देशपाडे याच्या स्मृतीप्रित्यर्थ महाराष्ट्र शासनाने सिव्हिल लाईन्स नागपूर ह्या ठिकाणी असे सुदर रंगमंदिर बाधले आणि त्याचा उद्घाटन समारभ इतक्या कलात्मकरीत्या साजरा केला की आम्ही तर पहातच बसलो ! समारंभ मुख्यमंत्री आणि सुशीलकुमार शिंदे याच्या उपस्थितीमुळे सुरेख तर बनलाच परतु समारंभानतर नागपुऱ्याच कलावतानी 'कटयार काळजात घुसली' ह्या नाटकाचा प्रयोग सादर केला त्यालाही ते आवर्जून उपस्थित होते. नवीन रंगमंदिर स्वरानी नुसते धुद होऊन गेले. ह्यात धक्का दिला नागपूर टि. व्ही. ने. चागला कार्यक्रम नागपूरच्या लोकाना दाखवावयाचा नाही अशी शपथ घेतलेल्या नागपूरच्या टि. व्ही. ने ह्या सपूर्ण कार्यक्रम तीन तास प्रक्षेपित केला! ह्यावर कडी केली ह्या समारभाच्या प्रमुख सरकारी अधिकाऱ्यानी ! शेवटी ते चक्क व्यासपीठावर आले आणि नम्र स्वरात म्हणाले, 'ह्या समारभात प्रत्येकाची मनाप्रमाणे आणि मानाप्रमाणे सोय करता आली नाही याची आम्हाला पूर्ण कल्पना आहे. परतु त्यानी उदार मनाने आम्हाला क्षमा करावी कारण कार्यक्रमाला इतकी गर्दी झाली की सर्वांची सोय करणे अशक्य होते!' सरकारी अधिकारी आणि दिलगिरी ? आम्ही थक्क झालो ! इतक्या रसिकतेने जर कार्यक्रम होणार असतील तर शिवाजीराव तुमचे सरकार टिकणार कसे ?

सध्या येथे नागपुरातील एक ध्येयवादी शिक्षण सस्था–धरमपेठ शिक्षण सस्था–हिचा सुवर्ण जयती महोत्सव चालू आहे. त्यात अनेक कार्यक्रमाची गर्दी आहे. परतु त्यात एक वैशिष्टचपूर्ण कार्यक्रम आखण्यात आला त्याकडे सर्वांचेच लक्ष वेधले गेले. नागपुरातील एक अधिवक्ता श्री. शिरीष देशपाडे याचे 'शहाबानो निर्णयावर' एक अभ्यासपूर्ण व्याख्यान दिनांक १८ रोजी ठेवण्यात आले व त्यानिमित्ताने चर्चाही ठेवण्यात आली. श्री. देशपांडे यांनी कुराणातील अनेक तरतुदींचा अर्थ समजाऊन तर सागितलाच परतु सुप्रीम कोर्टाचे सरन्यायाधीश श्री. चद्रचूड यानी कुराणातील कायद्यांवर बदलत्या आधुनिक परिस्थितीत सुधारणावादी भाष्य केले आहे याकडे आवर्जून लक्ष वेधले. मुसलमान समाजाने अशा जागृत भाष्याचा सखोल विचार केला पाहिजे आणि त्याचे स्वागत केले पाहिजे असा त्याच्या म्हणण्याचा आशय होता. सुधारणा मुसलमान समाजातूनच आल्या पाहिजेत परतु त्याची सुरुवात कुठे तरी झाली पाहिजे की नाही असा त्यानी प्रश्न केला. न्यायमूर्ती चंद्रचूडानी चर्चेला प्रारंभ करून दिला आहे, आता त्याचा धागा पकडून मुसलमान सुशिक्षित वर्गाने पुढे गेले पाहिजे हा महत्त्वाचा मुद्दा त्यानी माडला. आपल्या समारोपाच्या भाषणात नागपुरातील सुप्रसिद्ध अॅडव्होकेट सौ. मीरा खडक्कार म्हणाल्याच, 'हिंदू स्त्रियाकरिता तरी घटस्फोटाला कुठे स्थान होते ? परंतु मूळ हिंदु धर्मात ज्या गोष्टी नव्हत्या त्या आपण कायद्याने आणल्याच ना ? मग मुसलमान स्त्रियानीसुद्धा ह्या सुधारणाचे हळूहळू स्वागत का करू नये ?'

—शरश्चंद्र

# भारत जोडो

## सोमनाथच्या श्रमसंस्कार छावणीतले, आनंदवनातले

गणराज्य दिनी केंद्र शासनाने 'पद्मविभूषण' हा बहुमानदर्शक किताब देऊन गौरविलेले श्री. बाबा आमटे याच्याविषयी आपण खूप वाचतो, ऐकतो. पण त्याच्या एका 'श्रम सस्कार छावणीत' प्रत्यक्ष भाग घेऊन तेथे आलेला अनुभव डॉ. हरीश नवल ह्यानी नुकताच 'धर्मयुग' या हिंदी साप्ताहिकातून प्रसिद्ध केला आहे या लेखातील महत्त्वाचा भाग सक्षेपाने–

चंद्रपूरजवळच्या सोमनाथ येथील निबिड अरण्यातील ती पहिली रात्र. सुमारे दीड हजार व्यक्ती तिथे जमल्या होत्या. एकमेकाचा परिचय करून घेण्यात सर्व दग होत्या. एका नव्या जीवनाचा आरभ होत होता. श्री नवल हे एम्. ए. करीत असणारे युवक त्यासाठी दिल्लीहून आले होते.

दुपारच्या भोजनाचा कार्यक्रम नक्की नव्हता. काश्मिरपासून ते कन्याकुमारीपर्यंतचे युवक–युवती रेल्वे, जीप वा पायी पायी आले होते. रात्रीच्या भोजनाची सोय मात्र दोन विशाल मंडपात केली होती. हैद्राबादहून प्रमोद रेड्डी हा तरुणही आला होता रेड्डी व नवल याच्याकडे भोजन व्यवस्था सोपवली होती. मडपातील आसनावर सर्वजण बसू लागले. तेवढयात बाबा मडपाच्या मागून आले. साधारण अंगकाठी, तेजस्वी चेहरा, गहिरी नजर, सदैव हसते ओठ, खादीची एक निकर व खादीचीच बनियन. गळयाला कॉलर (मानेच्या दुखऱ्या मणक्यामुळे लावलेली) त्यांनी रेड्डी व हरीशना खुणेने जवळ बोलावल. त्याना घेऊन ते मडपामागे गेले. तिथे विस्तृत पाकगृह होतं. अनेक चुलखाणं पेटलेली. त्याच्या उजेडाने आचारीजनाचे चेहरे वेगळयाच प्रकारे चमकत होते. बहुतेकाचे डोळे आत ओढलेले, काहीनी अर्धे चेहरे फडक्यानी झाकलेले. ज्याची मुखं उघडी होती, ती भयकारक दिसत होती. नाक व वरचे ओठ अपुरे होते. मोठं विचित्र होत ते दृश्य. बाबा म्हणाले, 'मुलांनो, याच्याकडे नीट पहा. हे सर्वजण कधीकाळी कुष्ठरोगी होते. याची बोट, चेहऱ्याचा भाग रोगाने झडलेला होता हे सारे माझ्या 'आनदवनाचे' सोबती आहेत. आता मात्र हे पूर्णतया निरोगी आहेत. आजपासनं याच्या हातचा स्वैपाक तुम्हा सर्वांना खावा लागणार आहे. आता तुमची परीक्षा आहे की, तुम्ही याच्याबद्दल कुणाला–अगदी जिवलग दोस्तालाही काही सागायच नाही. हळूहळू सर्वांना ते सारं कळेल.'

पृष्ठ ३१ वर

## पोप यांच्या भेटीनिमित्त...

# लढणारे धर्मगुरू नि चर्चची अडचण

अविनाश कोल्हे

१ फेब्रुवारीपासून रोमन कॅथलिक पंथाचे धर्मगुरू आणि व्हॅटिकन देशाचे प्रमुख दुसरे जॉन पॉल पोप हे भारत भेटीस आलेले आहेत. ते येण्याआधीपासूनच या ना त्या कारणांनी त्यांची नियोजित भेट गाजत आहे, वादग्रस्त ठरत आहे. हिंदुत्वनिष्ठानी घेतलेला आक्षेप म्हणजे या पोप भेटीमुळे धर्मांतरास प्रोत्साहन मिळेल. पोप भेटीतील एक महत्त्वाचा कार्यक्रम म्हणजे केरळमधील सिस्टर आल्फान्सो आणि फादर एलिअस यांचे बिआटिफिकेशन ( Beatification ). बिआटिफिकेशन म्हणजे जे फादर किंवा नन दैवी चमत्कार करू शकतात अशी जनसामान्याची श्रद्धा आहे, त्या घटनेला रोमन कॅथलिक चर्चतर्फे अधिकृत मान्यता देणे आणि त्या फादर किंवा नन यांच्या अंगी काही 'दैवी अंश' होता हे जाहीर करणे पोप भेटीवर दुसरा महत्त्वाचा आक्षेप हाच आहे की, अशा दैवी चमत्कार करणाऱ्या व्यक्तींना जाहीर मान्यता देऊन समाजातील अंधश्रद्धेस खतपाणी घातल्यासारखे होते.

बिआटिफिकेशनची प्रक्रिया फार गुतागुतीची, किचकट आणि वेळ खाणारी असते. ही चर्चची मान्यता मिळवण्याकरिता किमान एक तरी 'चमत्कार' करून दाखवावा लागतो. कॅननाईज होण्यासाठी किमान दोन 'चमत्कार' करून दाखवावे लागतात. उदाहरणार्थ, वांझ स्त्रीस मूल होणे, असाध्य रोग बरा होणे, इत्यादी. हा चमत्कार आहे, हे मान्य होण्याआधी एखाद्या प्रशिक्षित डॉक्टरचे प्रमाणपत्र लागते की, हा रोग, व्याधी आज उपलब्ध असलेल्या वैद्यकीय ज्ञानाच्या बळावर बरा करता येण्यासारखा नाही. असा रोग, व्याधी जर एखाद्या फादर, ननने केलेल्या प्रार्थनेने बरा झाला, तर त्याला 'चमत्कार' म्हणतात.

केरळमध्ये सिस्टर आल्फान्सो आणि फादर एलिअस यांना मान्यता देण्यासाठी पोप आलेले आहेत. सिस्टर आल्फान्सो २८ जुलै १९४६ साली कालवश झाल्या त्यांच्या थडग्याजवळ प्रार्थना केल्यास इच्छा पूर्ण होतात, असा लौकिक पसरू लागला. (जागृत दैवत ?) थॉमस अथाईलिल या माणसाचा, तो ११ वर्षाचा असताना सिस्टर आल्फान्सोंच्या थडग्याजवळ प्रार्थना केल्यामुळे आनुवंशिक रोग बरा झाला. सिस्टर आल्फान्सोंची कीर्ती सर्वदूर पसरू लागली. आता दरवर्षी २९ जुलैला तेथे मोठी यात्रा भरते. सिस्टर आल्फान्सोंची बिआटिफिकेशनची प्रक्रिया १९५३ साली सुरू झाली. १९६२ साली अहवाल व्हॅटिकनला पाठविण्यात आला आणि आता १९८६ साली पोप, सिस्टर आल्फान्सो, फादर एलिअस यांना बिआटिफाईड करतील वेगळ्या शब्दात सांगायचं म्हणजे सिस्टर आल्फान्सो, फादर एलिअस यांच्या अंगी 'दैवी अंश' होता हे जाहीर करतील.

या पोप भेटीमुळे साऱ्या केरळभर खर तर भारतभर श्रद्धाळू रोमन कॅथलिकामध्ये उत्साहाचे वातावरण पसरले आहे. असे असले तरी केरळमधील रोमन कॅथलिकांचा पोप भेटीस एकमुखी पाठिंबा आहे असे म्हणणे चूक ठरेल एक मोठा वर्ग असा आहे, जो पोप भेटीवर नाराज आहे. केरळमधील मच्छिमार लढ्याचे नेतृत्व करणाऱ्या सिस्टर ॲलीस वगैरेंसारख्या 'चळवळवादी' धर्मगुरूंच्या मच्छिमार लढ्यात सक्रिय भाग घेतला म्हणून बदल्या केल्या आहेत. अशा तऱ्हेने लोकात मिसळून प्रत्यक्ष कार्य करणे रोमन कॅथलिक पंथाच्या तत्त्वज्ञानात बसत नाही. आखून दिलेल्या मार्गापेक्षा वेगळा मार्ग अंगिकारल्याबद्दल त्यांना शिक्षा म्हणून बदल्या करण्यात आल्या.

### मच्छिमार लढा

गेली कित्येक वर्षे केरळमधील मच्छिमार समाज मच्छिमारीच्या व्यवसायावर उपजीविका करत आहे अलिकडे 'सागरी अन्न' (सी फूड) निर्यात व्यापार फार मोठा नफा मिळवून देणारा झाला आहे. शिवाय परकीय चलन मिळण्याच्या आशेने सरकारने बऱ्याच उत्तेजनपर योजना जाहीर केल्या आहेत. उदा. 'रोप लायसेन्सेस्' या योजनेमुळे निर्यात केलेल्या रकमेच्या अमूक एक रकमेची आयात करता येते प्रसंगी निर्बंध घातलेल्या वस्तूसुद्धा आयात करता येतात. या सर्वच बाबींचा एकत्रित परिणाम म्हणजे मोठ्या उद्योगसमुहांची नजर या भागाकडे वळली. त्यानी ताबडतोब मोठमोठ्या नावा, लॉंचेस आणून व्यवसायाला प्रारंभ केला.

मोठमोठ्या उद्योगसमुहांच्या संघटित आर्थिक शक्तीपुढे एकटा मच्छिमार स्पर्धेत टिकूच शकत नाही. त्या मच्छिमाराचे जगणे धोक्यात आले या स्पर्धेत टिकता न आल्या कारणाने आज ना उद्या या छोट्या मच्छिमारांना स्वत च्या नावा, जाळी विकून टाकून मोठमोठ्या कंपन्यात नोकरी करावी लागेल. म्हणजे ज्या समुद्रावर आज तो मच्छिमार स्वत ची नाव आणि जाळं घेऊन मच्छिमारीसाठी जात आहे, उद्या त्याच समुद्रावर त्याला एका मोठ्या राक्षसी कंपनीचा कामगार म्हणून जावे लागेल. कारण स्पर्धेत न टिकता आल्या कारणाने उत्पादनाची साधने जी आज त्याच्या मालकीची आहेत, उद्या ती विकून टाकून त्याला नोकर व्हावे लागेल. यातूनच परात्मतेचा प्रादुर्भाव होतो. हा सगळा धोका वेळीच ओळखून केरळमधील मच्छिमार संघटित झाले. त्यांचे नेतृत्व सिस्टर ॲलिस यांचेकडे आहे.

### कॅथलिक पंथाची पार्श्वभूमी

येशू ख्रिस्ताने ख्रिस्ती धर्म स्थापन केला. काही शतकानंतर या धर्मात फूट पडली. प्रस्थापित चर्चमध्ये वाढ वैकल्याचा वाढलेला प्रभाव, धर्मप्रमुख पोप यांची दहशत यांच्याविरुद्ध मार्टिन ल्युथर यानी बंड केले. त्यानी 'प्रोटेस्ट' केला आणि बाहेर पडले म्हणून या पंथाला 'प्रॉटेस्टंट' म्हणतात. शिवाय मेथॉडिस्ट चर्च, पूर्ण युरोपिय चर्च वगैरे इतरही ख्रिस्ती धर्माचे पंथ आहेत. अल्प-



फादर लिओनार्ड बॉफ–चर्चवर खळबळजनक आरोप

संख्याक असूनही रोमन कॅथलिक पंथाचे अस्तित्व जाणवत राहते. या पंथाइतका कडवा, संघटित पंथ क्वचितच सापडेल. रोमन कॅथलिकांच्या संघटना जगभर पसरल्या आहेत. या पंथाचा अनभिषिक्त सम्राट व्हॅटिकनचे पोप. व्हॅटिकन या जगातील सर्वात लहान देशाचे प्रमुख म्हणूनही हेच पोप वावरतात. यांच्या मालकीचे स्वतंत्र रेडिओ स्टेशन, वर्तमानपत्रे आहेत. शिवाय देशोदेशींच्या सरकारचे राजदूत व्हॅटिकन येथे नियुक्त केले जातात. इतर कोणत्याही धर्माच्या, पंथाच्या प्रमुखाला एवढी अमर्याद सत्ता, अधिकार नाहीत.

रोमन कॅथलिक पंथाचे तत्त्वज्ञान येशूवर पूर्ण (आणि आंधळा ?) विश्वास ठेवण्यास सांगते. 'येशूवर विश्वास' हा पायाभूत स्वरूपाचा आहे. त्याच्यावर विश्वास ठेवला म्हणजे तो देवाचे आणि तुमचे नाते जोडतो. येशूची कृपा संपादन करण्यासाठी मग देवाच्या आज्ञा पाळणे, चर्चमध्ये नियमितपणे जाणे, पापाची कबुली देणे वगैरे बाबी आहेत. देवाकडे जाण्याचा मार्ग फक्त चर्चच्या माध्यमातूनच उपलब्ध आहे. 'देवावर विश्वास' या संकल्पनेबरोबर 'पाप' ही संकल्पनाही अत्यंत महत्त्वाची आहे. आपण सर्व पापी आहोत, येशूने आपल्या सर्वांच्या पापमुक्तीसाठी स्वतःचा बळी दिला आणि अखिल मानवजात मुक्त केली. त्याच्यावर विश्वास ठेवत जगायचे, गोरगरिबांची यथाशक्ती सेवा करायची. तो जेव्हा परत येईल तेव्हा सर्वांचा न्यायनिवाडा करणार आहे. ज्याच्या त्याच्या वागणुकीनुसार ज्याला त्याला शासन, पुण्यवंतांना स्वर्ग देणार आहे. म्हणून त्याच्यावर 'विश्वास' ठेवा.

देवावर आणि त्याच्या न्यायनिवाड्यावर विश्वास या संकल्पनांचा पगडा एवढा जबरदस्त आहे की, समजा एखादा सुदृढ, धष्टपुष्ट माणूस एखाद्या अबलेस, बालकास अमानुषपणे मारहाण करत असेल तर त्या व्यक्तीचा शारीरिकदृष्ट्या प्रतिकार करण्याऐवजी, त्या व्यक्तीच्या मनातील सैतान जावा म्हणून प्रार्थना करणे, हा मार्ग धर्मगुरू स्वीकारतात आणि इतरांना शिकवतात. शारीरिक विरोध करण्याच्या विरोधातील मुद्दा किंवा समर्थन असे की, त्या पापी व्यक्तीचा प्रतिकार करण्याइतके तुम्ही स्वतः पुण्यवान आहात का ? तर नाही. मग प्रतिकार करण्याचा, विरोध करण्याचा तुम्हाला अधिकार काय ? उलट प्रतिकार करून तुम्ही देवावर, देवाच्या न्यायावर अविश्वास व्यक्त करता. त्यापेक्षा त्या पापी व्यक्तीच्या मनातील सैतान आहे, त्या सैतानावर प्रेमाने विजय मिळवावा. त्याने एका गालावर मारल्यास आपण दुसरा गाल पुढे करावा, एवढेच नव्हे तर त्याच्या या वाईट कृत्याबद्दल त्याला क्षमा करावी, शासन नव्हे. कारण शासन करण्याचा अधिकार फक्त देवाला आहे. देव मुक्तीदिनी सर्वांचा न्यायनिवाडा करणार आहेच. तुम्ही, आम्ही कमी अधिक प्रमाणात पापी आहोत. मग देव तरी हे सर्व अन्याय, अत्याचार का होऊ देतो ? तर हा प्रश्न पापी मानवाने विचारायचा नाही. देवाचे मार्ग गूढ आहेत. आज ना उद्या, मुक्तीदिनी न्याय होणार आहे, तोपर्यंत वाट पाहा, 'सहन' करा, 'विश्वास' ठेवा. पण 'प्रतिकार' करू नका. कारण तुम्हाला नैतिक अधिकारच नाही.

हे कसे छान तत्त्वज्ञान आहे ! म्हणजे लुटारूंना लूट करू द्या, भांडवलदारांना मजुरांची पिळवणूक करू द्या, पुरुषांना स्त्रियांवर अत्याचार करू द्या, याचा प्रतिकार करायचा नाही, याविरुद्ध आवाज उठवायचा नाही, संघटित होऊन लढा द्यायचा नाही. या स्वरूपाचे तत्त्वज्ञान आणि शिकवण फक्त ख्रिस्ती धर्माचीच आहे, असे नव्हे हिंदू धर्मसुद्धा सदाचरण करा, म्हणजे पुढच्या जन्मी सुख मिळेल, या जन्मातील दुःखाचे मूळ मागच्या जन्मी केलेल्या पापाची भरपाई म्हणून आहे, ते निमूटपणे सहन करायचे, म्हणजे मग पुण्य गोळा करत मोक्षप्राप्तीसाठी प्रयत्न करायचे, असेच शिकवतो. येथेही मानवी प्रयत्नाला, प्रतिकाराला स्थान नाही. या प्रकारच्या शिकवणीविरुद्ध वागल्यास दैवी कोपाला बळी पडण्याची धमकी आहेच.

## बंडाचे वातावरण

या स्वरूपाच्या तत्त्वज्ञानामुळे 'जैसे थे' परिस्थिती बरीच वर्षे, शतके चालली. रोमन कॅथलिक चर्च धर्मप्रसार, शाळा, दवाखाने चालवणे वगैरे मर्यादित आणि काही प्रमाणात प्रस्थापितांना अनुकूल अशा भूमिकेतच राहिले. त्यामुळे जनसामान्यांचे मूलभूत प्रश्न अनुत्तरीत राहिले. त्यांच्या हालअपेष्टा कमी होण्याऐवजी वाढल्या. श्रीमंत वर्ग जास्त श्रीमंत झाला. गरीब वर्ग जास्त गरीब झाला. कारण धर्मगुरु ज्या स्वरूपाची सेवा करत होते, ती वरवरची होती. परिस्थितीचे कठोर विश्लेषण नव्हते. त्यामुळेच मूलभूत बदल होत नव्हता हळूहळू असंतोष साचत गेला. माणसाची समज विकसित होत गेली, जागृती वाढत गेली. आपल्या दुःखाला येथील परिस्थितीही जबाबदार आहे. ही परिस्थिती, चौकट बदलणे शक्य आहे असा विश्वास निर्माण झाला. याचा पहिला स्फोट दक्षिण अमेरिकेत झाला. चर्चच्या मर्यादित आवाराबाहेर पडून तेथील पाद्री, धर्मगुरू

लोकात मिसळले, त्याचे प्रश्न समजावून घेतले, त्यावर लढे उभारले. या प्रकारचे कार्य धर्मगुरूंच्या परंपरागत कार्यापासून भिन्न आणि विरोधी आहे. यातूनच 'पिडीत मुक्तीच्या धर्मशास्त्राचा' (Liberation Theology) चा जन्म झाला.

या नवीन पुरोगामी तत्त्वज्ञानाप्रमाणे धर्मगुरूंनी फक्त धार्मिक कार्यापुरतीच स्वत ची भूमिका सीमित न ठेवता राजकीय, सामाजिक आणि आर्थिक प्रश्नांवर पण लक्ष केन्द्रित केले पाहिजे. या समस्या सोडवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. कारण या समस्यापैकी बहुतेक समस्या मानवनिर्मित आहेत. प्रभूवर विश्वास ठेवा म्हणजे स्वर्गप्राप्ती होईल, अशा भूलथापा मारत शोषणाची प्रक्रिया चालू ठेवण्यात अप्रत्यक्ष मदत करणे, हेच खरं तर पाप आहे. शोषणावर, अन्यायावर आधारीत आर्थिक, सामाजिक चौकट उखडून नवीन शोषणरहित, समतेवर आधारीत समाज–व्यवस्था निर्माण केल्यास माणसाचे बरेचसे प्रश्न सुटतील, दु ख कमी होईल. त्यासाठी प्रयत्न करणे, सघटित होणे अपरिहार्य आहे. स्वर्गप्राप्तीचे गोड गुलाबी स्वप्न दाखवण्यापेक्षा या पृथ्वीवरील परिस्थिती बदलण्यासाठी, येथील राहणीमान सुधारण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. बहुसंख्य लोकाना इथे, या जगात भाकरी, न्याय आणि स्वातंत्र्य हवे आहे. स्वर्गाचे पुढे बघू हा पिडीत मुक्तीच्या धर्मशास्त्राचा गाभा आहे.

दक्षिण अमेरिकेतील देश काय किंवा तिसऱ्या जगातील देश काय, इथे भयानक दारिद्रय आहे. दक्षिण अमेरिकेतील राष्ट्रात हुकूमशहा सत्तेवर आहेत. अमेरिकेच्या भाडवलदारीच्या स्वार्थासाठी या हुकुमशहाना अमेरिकेने बाहुले केलेले आहे अन्याय, अत्याचार, बेरोजगारी, दारिद्रय, नागरी स्वातन्त्र्याचा सकोच इत्यादी कारणानी आख्खा दक्षिण अमेरिका धुमसत आहे. दक्षिण अमेरिकेच्या इतिहासात बडे जमिनदार, हुकूमशहा आणि रोमन कॅथलिक चर्च याची सत्ता आणि सपत्तीतील भागिदारी वर्षानुवर्षे सुखाने सुरू होती. आश्चर्य वाटेल पण आज तेथील सर्वात मोठा जमिनदार चर्च आहे. या स्थितीला पहिल्यादा धक्का बसला १९५९ साली क्युबात झालेल्या क्रांतीने या क्रातीमुळे जनसामान्यात नवीन विश्वास निर्माण झाला. तरुण वर्ग कॅथलिक विचारसरणी सोडून मार्क्सवादाकडे आकृष्ट झाला. आज दक्षिण अमेरिकेतील बहुतेक देशात धर्मगुरू लोकामध्ये कार्य करत आहेत, त्यांना सघटित करत आहेत, अन्यायाविरुद्ध आवाज उठवत आहेत. निकाराग्वामध्ये झालेल्या क्रातीमध्ये कित्येक धर्मगुरूनी प्रत्यक्ष भाग घेतला. तेथील मत्रिमडळामध्ये चार मंत्री रोमन कॅथलिक धर्मगुरू आहेत ! पीडित मुक्तीच्या धर्मशास्त्राचे प्रणेते फादर मार्टिनेझ हे सास्कृतिक मत्री आहेत. चर्च आणि आपला सबंध फक्त रविवार सकाळी प्रार्थनेला जाण्याइतकाच मर्यादित नसून चर्च आपल्या जीवनाशी निगडीत प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्नशील आहे, हे बघून चर्चविषयी लोकाच्या मनात आपलेपणाची भावना निर्माण झाली आहे. चर्चमधील उपस्थिती वाढली

## जगभर आव्हान

यावरून आपल्या लक्षात येईल की, जगभर परंपरावादी रोमन कॅथलिक पथाला आव्हान देण्यात येत आहे पोथिनिष्ठ पथाने आखून दिलेल्या मर्यादित मार्गावरून चालण्याचे नाकारून हे धर्मगुरू लोकामध्ये मिसळत आहेत. जनसामान्याच्या प्रश्नाशी, अडीअडचणीशी सवादी होत आहेत. व्हॅटिकनच्या अधिसत्तेला हे आव्हान आहे मुख्य म्हणजे हे आव्हान चर्चमधूनच मिळाले. या तत्त्वज्ञानाची वाढती लोकप्रियता पाहून रोमन कॅथलिक धर्मसत्ता अस्वस्थ झाली आहे या वाढत्या प्रभावाला अटकाव करावा म्हणून पोपच्या आदेशावरून रोमन कॅथलिक पंथाचे तत्त्वज्ञ फादर शासिगर याच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने एक आठ पानी अहवाल प्रसिद्ध केला. या अहवालाच्या टिकेचा सर्व रोख, 'आदोलनवादी धर्मगुरू आणि पीडित मुक्तीचे धर्मशास्त्र' यावर आहे त्याचे म्हणणे असे की,हा मार्ग स्वीकारल्याम रोमन कॅथलिक पथाला राजकीय पक्षाचे स्वरूप येईल चर्च निधर्मी राजकारणातील एक साधन होईल. शिवाय येशूच्या मरणाला राजकीय रग देण्याचा प्रयत्न त्याना मान्य नाही. धर्मग्रंथातून सागितलेले 'गोरगरीब' आणि मार्क्सने सागितलेले 'प्रोलेटारिएट' यांच्यात मूलभूत फरक आहे·

या अहवालात रोमन कॅथलिक पथासमोर असलेल्या भीषण प्रश्नाचे प्रतिबिंब पडलेले दिसते कारण अशी प्रतिकूल टीका करताना चर्चला जनसामान्याच्या भावनाची दखल घ्यावी लागली आहे अलिकडेच पोप यानी असे विधान केले की, श्रीमताच्या चैनबाजीपेक्षा गोरगरिबाच्या गरजा जास्त महत्त्वाच्या आहेत. म्हणजे पोप याना कशी तारेवरची कसरत करावी लागत आहे, हे आपल्या लक्षात येईल. एकीकडे रोमन कॅथलिक पंथाला येत असलेल्या राजकीय स्वरूपाची भीती आणि असे कार्य करणाऱ्या धर्मगुरूंवर शिस्तभगाची कारवाई करण्याची सुप्त इच्छा आणि दुसरीकडे अशी कारवाई केल्यास त्याची प्रतिक्रिया केवढी तीव्र होईल याची धास्ती; अशा कात्रीत पोप आणि रोमन कॅथलिक चर्चसत्ता सापडली आहे.

पीडित मुक्तीच्या धर्मशास्त्रावरील घेतले जाणारे आक्षेप जर काळजीपूर्वक तपासले तर असे लक्षात येते की, खरे आक्षेप गोरगरिबासाठी कार्य करणे यावर नाहीत कारण गोरगरिबाची सेवा हे तर एक महत्त्वाचे तत्त्व आहे. आक्षेपाचा खरा रोख या चळवळीच्या मार्क्सवादी आशयावर आहे. ख्रिस्ती तत्त्वज्ञान आणि मार्क्सवादी तत्त्वज्ञान याचा समन्वय साधण्यावर आहे. रोमन कॅथलिक पंथामध्ये वाढणारा मार्क्सवादी विचारसरणीचा प्रभाव हे खरे पोटदुखीचे कारण आहे.

ब्राझिलियन धर्मगुरू फादर लिओनार्ड बॉफ यानी एक पुस्तक लिहिले आहे. (Church – Charism and Power – Liberation Theology in the institutional Church) पुस्तकात त्यानी प्रस्थापित रोमन कॅथलिक चर्चवर जोरदार हल्ला चढविला आहे त्याचे म्हणणे असे की प्रस्थापित चर्च भाडवलदारी सारखेच आहे.येथेसुद्धा मुठभर लोकाच्या हाती सत्ता एकवटली आहे. अशा प्रस्थापित चर्चला आव्हान म्हणून 'लोकाचे चर्च' (पिपल्स् चर्च) भरविण्याचे प्रयत्न सुरू आहेत

रोमन कॅथलिक पथाच्या आजपर्यंतच्या इतिहासात चर्चसत्तेला एवढे जबरदस्त आणि व्यापक प्रमाणात आव्हान मिळाले नव्हते. रोमन कॅथलिक चर्चची आजची मुख्य अड-

चण म्हणजे त्यांना या बंडखोरांविरुद्ध काहीही करता येत नाही. निकाराग्वा सरकारमध्ये सांस्कृतिक मंत्रीपद भूषविणाऱ्या फादर मार्टिनेझ यांना व्हॅटिकनच्या चर्चसत्तेने दोनदा अंतिम इशारा दिला होता की त्यांनी हे मंत्रीपद सोडावे. पण दोन्ही वेळा फादर मार्टिनेझनी इशारा धुडकावून लावला. मुळात दोनदा अंतिम इशारा देण्याची वेळ आली, ही घटनाच पुरेशी बोलकी आहे. वर उल्लेख केलेल्या पुस्तकाचे लेखक आणि पीडित मुक्तीच्या धर्मशास्त्राचे एक महत्त्वाचे नेते फादर लिओनार्ड बॉफ यांना व्हॅटिकन येथे चर्चेसाठी बोलावून घेण्यात आले होते. रोमन कॅथलिक चर्चचे तत्वज्ञ फादर रात्झिंगर यानी फादर बॉफ यांच्या बरोबर चार तास चर्चा केली. या घटनांवरून आपल्या असे लक्षात येईल की, रोमन कॅथलिक चर्चला, आतून मिळणाऱ्या आव्हानांनासुद्धा चर्चला बोलणी, चर्चा इत्यादी लोकशाही पद्धतीने सामोरे जावे लागत आहे. एवढा रोमन कॅथलिक चर्चच्या वृत्तीमध्ये बदल झाला आहे.

## चर्चची अडचण

याबदलामागील कारणे समजून घेणे आवश्यक आहे. ज्या दक्षिण अमेरिकेत हे नाटच घडत आहे, त्या दक्षिण अमेरिकेची लोकसख्या ७८.४ कोटी आहे. त्यापैकी ४०% लोकसंख्या रोमन कॅथलिकांची आहे. एवढेच नव्हे तर जगभर पसरलेल्या रोमन कॅथलिकांची संख्या ३६ कोटी आहे. त्यापैकी ९०% रोमन कॅथलिक दक्षिण अमेरिकेत आहेत. हे एवढे प्रचंड बहुमत मागे असताना फादर मार्टिनेझ, फादर लिओनार्ड बॉफ यांना पंथाबाहेर घालवून किंवा त्यांच्या विरुद्ध कारवाई करणे रोमन कॅथलिक चर्चला किती अवघड आहे, याची कल्पना येईल. हे धर्मगुरू गोरगरिबांच्या बाजूने लढत आहेत. अशा रीतीने ते लढतात म्हणून जर त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात आली तर लोकांमध्ये असंतोषाची प्रचंड लाट उसळेल. उलट आपण सुद्धा जनसामान्यांच्या बाजूचे आहोत हे दाखविण्याकरिता पोप यांना 'श्रीमंतांच्या 'चैनबाजीपेक्षा गोरगरिबांच्या गरजा महत्त्वाच्या आहेत' वगैरे विधानं करावी लागत आहेत. अन्यथा रोमन कॅथलिक चर्चने नेहमीच प्रस्थापितांबरोबर, सत्ताधाऱ्यांबरोबर सहकार्य केलेले आहे. पण आता त्यांनाही गोरगरिबांची 'सक्रीय' दखल घ्यावी लागते.

## इतिहासाची साक्ष

धर्मसत्तेच्या वृत्तीमधील बदलाचे दुसरे आणि महत्त्वाचे कारण म्हणजे समाजाची माणसांची वाढलेली समज! मानवी प्रज्ञेमध्ये झालेली प्रगती! म्हणून रोमनकॅथलिक चर्चसत्तेला या आंदोलनवादी धर्मगुरूंविरुद्ध काही कारवाई करता येत नाही. अन्यथा इतिहासाची साक्ष अशी आहे की, ज्यांनी ज्यांनी चर्चसत्तेला विरोध केला, आखून दिलेल्या मार्गापेक्षा वेगळा मार्ग स्वीकारला, त्यांना त्यांना दडपणं आणून गप्प बसविण्यात आले किंवा त्या व्यक्तींना प्रसंगी प्राणास मुकावे लागले. जोन ऑफ आर्कला जिवंत जाळण्यात आले होते. सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ गॅलिलिओ गॅलिली यांचा अमानुष छळ करण्यात आला होता. त्यांना संशोधन करण्यावर चर्चने बंदी घातली होती. एवढेच नव्हे तर त्यांना धर्मगुरूंची नाक घासून माफी मागायला लावली होती. पण आता त्याच चर्चने मान्य केले की गॅलिलिओ यांच्याबाबत चर्चची चूक झाली होती. ते निश्चित महान शास्त्रज्ञ होते. ही मान्यता कित्येक शतकानंतर! त्या काळात त्यांचा छळ केला होता. जोन ऑफ आर्कबद्दलही तसेच. अलिकडेच पोप यांनी जाहीर केले की जोन ऑफ आर्क ही एक थोर संत होती आणि मोठ्या सन्मानाने तिला सेंट जोन म्हणून कॅननाईझ करण्यात आले आहे. म्हणजे ज्या जोन ऑफ आर्कला काही शतकांपूर्वी धर्मविरोधी कृत्ये करते म्हणून जिवंत जाळण्यात आले होते, आता त्याच जोन ऑफ आर्कचा सत्कार करण्यात येतो.

पीडित मुक्तीच्या धर्मशास्त्राच्या प्रणेत्या धर्मगुरूंना या अग्नीदिव्यातून जावे लागत नाही कारण मधल्या काळात मानवी समाजाने प्रगती केली. त्याची समज विकसित झाली असंही म्हणता येईल की, जोन ऑफ आर्क, गॅलिलिओ वगैरेंनी त्याग करून, हालअपेष्टा सोसून इतरांचा मार्ग काही प्रमाणात सुकर केला. म्हणूनच 'चर्च ही भांडवलदारी सारखी रचना आहे, जेथे मूठभर लोकांच्या हातात सत्ता एकवटली आहे,' असा खळबळजनक आरोप करणाऱ्या फादर लिओनार्ड बॉफ यांच्या बरोबर व्हॅटिकन धर्मसत्तेने चार तास चर्चा केली, त्यांना धर्माबाहेर हाकलून दिले नाही की त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई केली नाही. यातच प्रस्थापित रोमन कॅथलिक चर्चचा पराभव आणि मानवी प्रज्ञेचा विजय आहे. □



## संगमनेर दंगली

# आक्रमक गुंडगिरी थांबत नाही तोवर....

विशेष वार्तापत्र : विनय गुणे

दि. १७ जानेवारी १९८६

तहसीलदार श्री. रमाकात मुळे यांनी संगमनेर शहरात शांतता आणि सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टिकोनातून दुपारी ४ वाजता शातता समितीची मिटीग बोलावली होती.

विविध राजकीय पक्ष, सामाजिक, सास्कृतिक सघटनांचे प्रमुख, हिंदु-मुस्लिम समाजातली नेते मंडळी हजर होती. शहरात गेल्या आठवडाभर चालू असलेल्या विविध घटनांमुळे मिटीग बोलावणे भाग पडले होते.

सदस्यानी घटना सागण्याचा आग्रह धरला. पी. एस्. आय्. श्री. पाटील यानी त्याच्याकडे नोद असलेल्या आठ घटनाची जंत्री वाचून दाखवली.

चार जानेवारीपासून शहरात घटना घडत होत्या एक-दोन किरकोळ मारामारीचे प्रकार झाले चार-सहा मारामाऱ्यात शस्त्राचा वापर करण्यात आला.

दि. ४–१–८६ ते १६–१–८६ पर्यंतच्या मुदतीत असे ८ प्रकार पोलीस दफ्तरात नोदविण्यात आले. यातील चार प्रकरणी मुस्लिम तर चार प्रकरणी हिंदु दोषी आहेत. मारहाण करण्याचे कोणतेच कारण समजू शकले नाही.

किंबहुना झालेल्या या ८ प्रकरणी मारहाण करणारे एकमेकाला ओळखतही नाहीत. त्यामुळे फिर्याद असली तरी आरोपीची नावे नाहीत, सशयित कोण माहित नाही.

साहेबांनी, केलेल्या आणि करत असलेल्या उपाययोजनांची माहिती दिली.

पोलिसाच्या निष्क्रियतेवर तोफ डागली गेली.

'हिंदु-मुस्लीम भाई भाई, आपल्याला एकत्र रहायचे आहे भाडण कशाला ? पोराना समजावून सागा, काही घडलं तर दोन्ही समाजातील प्रमुखानी, समितीच्या सदस्यानी घटनास्थळी जाऊन परिस्थिती हाताळायची' अस ठरलं. आणि मिटीग सपली.

सात–साडेसात वाजले असावेत. मिटीग संपवून घरी निघालेले सदस्य घरीही पोहचले नसतोल एवढ्यात पार्श्वनाथ गल्लीत एका मुस्लिम तरुणाला मारण्याची खबर आली. पाच–दहा मिनिटात दुसरी बातमी–

'दोन हिंदु तरुणांवर शस्त्राने वार करण्यात आले.'

पोलिसाची गाडी निघाली.

'भाजप'चे शहराध्यक्ष, नगरसेवक राधावल्लभ कासट याच्या 'जनता एजन्सीज्' मधून नगराध्य श्री खडेलवाल यानी डी. एस्. पी. आणि जिल्हाधिकारी याना नगरला फोन लावले –

'ताबडतोब सगमनेरला या, वातावरण चांगलं नाही. अशातता आहे. स्वत: या, फोर्स पाठवा.'

श्री. कासट नासिकला डी. आय्. जी श्री इनामदार याच्याशी बोलले.

डी. आय्. जी. नी त्याना काहीही झालं तरी तुम्ही कुठंही जाऊ नका, बाहेर पडू नका अशी सूचना दिली आणि फोर्स पाठविण्याचे आश्वासन दिले.

या फोनाफोनीत पंधरा मिनिटे गेली असावित. तेवढ्यात पुन्हा बातमी आली..

'दिल्ली नाक्या 'वरच्या शंकर माताडे यांच्या 'माताडे टी सेन्टर 'ला आग लावली, दगडफेक सुरू झालीये.'

नगरपालिकेच्या अग्निशामकला सूचना दिली. पोलीस स्टेशनचा ३३ नबर मिळत नव्हता. पुन्हा या नवीन घडामोडीची खबर देण्यासाठी वरिष्ठाना फोन. नागपूरला गृहराज्यमत्र्यांना लाइटनिग कॉल बुक केला.

तेवढ्यात पुन्हा शंकर माताडेचा फोन. तो गावाबाहेरून बोलत होता. त्याच्या हुंदक्यामुळे त्याचे बोलणेही समजेना. त्याचे आई–वडील तिथेच, हॉटेलच्या मागे असलेल्या त्याच्या राहात्या घरी अडकलेले होते. कसाबसा त्याला समजावला.

दंगल वाढत होती. — जाळपोळ सुरू झाली.

कुंभार आळीतलं कर्पेचं किराणाचं दुकान, सय्यदबाबा चौकातलं तवरेज, भगिय, खिडके याच्या दुकानाना आगी लावण्यात आल्या.

धुराचे लोट उठत होते.

अग्निशामक, संरक्षणाशिवाय काम करायला तयार नव्हते. सरक्षण देण्याइतका पोलीस फोर्स नव्हता. लोक रस्त्यावर आले. विझवण्याचा प्रयत्न सुरू झाला. बादल्या बादल्या पाण्यान तीन–तीन मजली इमारतीची आग विझवणार तरी कशी ? एव्हाना आग विझविण्याचा प्रयत्न करणाऱ्यावर दगडफेक ही सुरू झाली होती.

धुराचे लोट आणि ताबडलाल आकाश बघून, काय झालं बघायला रस्त्यावर गर्दी केलेल्या लोकाना पिटाळण्यासाठी पोलीसगाडी फिरू लागली.

फायर म्हणून ओरडत गोळीबाराच्या फैरीही झाडण्यात आल्या.

जिथं दगडफेक होत होती, जिथं जळत होत तिथं काय ?

आणि मग प्रतिक्रिया सुरू झाली.

मेनरोडच 'डायमड इलेक्ट्रिकल्स 'मधलं सामान काढून त्याची होळी करण्यात आली. बाजारपेठेतल्या ताबोळीच्या पान-विडीच्या दुकानातला माल बाहेर आला. त्याचीही होळी झाली. पार्श्वनाथ गल्लीतलं 'खुशबू' पान स्टॉल फुटलं. कॉलेज रोडवरचं डिसेन्ट 'प्रिया कोल्ड्रिंज 'ची राख झाली. त्याच

भागातल्या छोटया–मोठया टपऱ्या फुटल्या. तेलीखुट, कुंभार आळी इथल्या दुकानांना, 'श्रीराम प्रेस'ला आग लावण्याचे प्रयत्न झाले. लोकाच्या तातडीच्या आणि शर्थीच्या प्रयत्नामुळे अशा काही आगी लगेच विझविण्यात आल्या.

जंगम चुलत्या–पुतण्याला घराजवळ उभे असताना पायाला गोळी लागली.

पोलिसांच्या गोळीनं वसत तवरेज घायाळ झाला.

राजू ठाकरेच्या मेंदूतून आरपार गेलेल्या गोळीनं त्याला जागीच ठार केल.

सुमारे पाच–सहा तास सुरू असलेली धुमश्चक्री अखेर पहाटे पहाटे हळूहळू शांत होत गेली.

खबर दिल्यानंतर चार तासानी कुमक आली.

एस. आर. पी. नी शहाराचा ताबा घेतला. ८७ दंगलखोरांना अटक करण्यात आली. अटक केलेल्यापैकी ६ जण सोडले तर इतर सर्व मुस्लिम समाजाचे.

हिंदुतल्या चायल नावाच्या एका वृद्ध स्वातंत्र्यसैनिकाला, ज्याचं घर जळल त्या ६५ वर्ष वयाच्या श्री. कर्पे यांना आणि त्यांच्या मुलाला अटक करण्यात आली.

एव्हानं कलेक्टर राजीव आग्रवाल, डी. आय. जी. अरविंद इनामदार, डी. एस. पी. श्री. सुधाकर आंबेडकर संगमनेरला डेरेदाखल झाले होते. गृहराज्यमंत्र्याना नागपूरला लावलेला लाइटनिंगकॉल तोपर्यंत लागला नव्हता. स्थानिक आमदार श्री. बाळासाहेब थोरात यांच्यासाठी नागपूरच्या निवासात लावलेला फोन नबर खराब आहे म्हणून मिळाला नव्हता.

शहरात १४४ कलम पुकारून जमावबंदी लागू करण्यात आली.

त्यानंतर संगमनेर शहरात तणावपूर्ण शांतता आहे.

अफवाचं पिक आहे.

पोलिसांची दहशत आहे.

संध्याकाळी ७–७॥ लाच शुकशुकाट होतो. दुकाने बंद होतात.

रात्रीचे गप्पाचे अड्डे बंद झालेत.

आठवडाभर सिनेमा थिएटर्स बंद होती.

'रणजित स्पोर्टस् क्लब'ने योजलेल्या क्रिकेट टुर्नामेंटस् रद्द करण्यात आल्या आहेत.

'संगमनेर कॉलेजच्या' रौप्यमहोत्सवानिमित्त योजलेली 'व्याख्यानमाला' फक्त चालू होती.

### कडवटपणा वाढला

संगमनेर शहर हे तालुक्याच गाव.

नासिक–पुणे राष्ट्रीय महामार्गावरचं महत्त्वाच केंद्र. १७०३५ चौ. कि. मि. भूभागाचा हा तालुका. इथल्या एस. टी. डेपोतून रोज ६८ बसेस राज्यातल्या विविध ठिकाणी जातात. शहरात २० प्राथमिक शाळा, ८ माध्यमिक विद्यालये, ४ ज्युनियर महाविद्यालये आणि २ महाविद्यालयातून २२ हजारपर्यंत विद्यार्थी शिक्षण घेतात.

जर्दा, विडी कारखाने, ऑइल मिल्स, दाळ मिल्स, साखर कारखाना असे विविध मोठे उद्योग आहेत. या उद्योगातून १० हजारपेक्षा जास्त कामगार काम करतात.

शहरातील एकूण लोकसंख्येपैकी २० टक्के लोकसख्या मुस्लिम समाजाची. त्यातला बहुसख्य समाज गॅरेज, इंजिनिअरिंग, फॅब्रिकेशन वर्कशॉप्स, ॲटोमोबाअिल्स आणि प्रायव्हेट ट्रान्स्पोर्टमध्ये गुतलेला आहे.

शहरातील खाजगी ट्रक वाहतुकीचा व्यवसाय मोठा आहे. अहमदाबाद, मुंबई, नागपूर, पुणे अशा विविध ठिकाणी माल वहातुकीची नियमित सेवा पुरविली जाते. शहरात अशी २४ ट्रान्स्पोर्ट ऑफिसेस असून ३७५ ट्रक्सची अविरत वाहतूक चालू असते. या ट्रान्स्पोर्ट व्यवसायात ८० टक्के मुस्लिम समाजातील व्यावसायिक आहेत आणि त्यात ३॥ ते ४ हजार माणसे गुतलेली आहेत.

असं काही घडलं की मग संगमनेरचं वातावरण बदलून जातं. शहराला पोलिसी छावणीचं स्वरूप येतं शाळा, कॉलेज, कारखाने, उद्योगधंदे, सगळेच व्यवहार ठप्प होतात.

असलं वातावरण संगमनेरला आता नवीन राहिलेलं नाही.

पूर्वी वर्षातून कधी तरी घडणारे प्रसंग, वाढणारा तणाव, होणारे संघर्ष गेल्या वर्षात नित्याचे झाले.

संघटित गुंडगिरीला एकटादुकटा माणूस कधी तोंड देण्याच्या फंदात पडत नाही. मार खाल्ला तरी तक्रार न करता घरी गप्प बसायचं अशी प्रकृती. पोलिसांकडे तक्रार केल्यावर ते न्याय देतील अशी खात्री नाही. त्यामुळं प्रत्येकजण 'आपण बरं आणि आपला उद्योग बरा' असच जगायचा.

४ सप्टें. ८२ ला संगमनेर शहरात 'पतित पावन संघटना' स्थापन झाली आणि शहरातली ही परिस्थिती हळूहळू बदलत गेली.

अन्यायाचा जाब विचारला जाऊ लागला. पोलिसस्टेशनला तक्रार करायला घाबरणारे धैर्यानं पुढं व्हायला लागले. शहरातील विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित नागरिकही अशा वेळी ठाम उभे रहायला लागले. दसऱ्याचे सीमोल्लघन, नवरात्रातील देवीच्या माळेच्या नऊ दिवस चालणाऱ्या मिरवणुका, गणेशोत्सव यातली सर्वसामान्याची उपस्थिती वाढली. ७९ च्या दगलीनतर बंद पडलेला रंगपंचमीचा 'उत्सव' पुन्हा सुरू झाला.

धार्मिक उत्सव, सण, समारंभातला सहभाग आणि उत्साह वाढत होता.

प्रतिक्रिया ठरलेली होती.

मुस्लिमांच्याकडूनही नमाजाच्या वेळी मशिदीवरून वाजत गाजत मिरवणुका नेल्या जाऊ नयेत अशी मागणी झाली. त्यांच्याही मोहरमच्या, ईदच्या मिरवणुका जोरदार निघू लागल्या.

'जय भवानी–जय शिवाजी'ला 'अल्ला हो अकबर'ने प्रत्युत्तर मिळू लागले. प्रत्येक वेळी दोन्ही समाजातील समजस प्रमुखामुळे आणि अधिकाऱ्यांनी 'वेळापत्रक' आखून दिल्यानें वेळ निभावून गेली.

तरीही आपापसातील कडवटपणा वाढत होता.

या वातावरणाचा परिणाम नगरपालिकेच्या निवडणुकीतही दिसून आला. कितीही उमेदवार उभे असले तरी मतदारांनी जाणीवपूर्वक मतदान केलं. अशा काही 'बॉर्डर'च्या वॉर्डातून हिंदुत्ववादी कार्यकर्ते निवडून आले. एकूण ३३ उमेदवारांपैकी ६ मुस्लिम तर २७ हिंदू उमेदवार निवडून आले. निवडून आलेल्यांपैकी दोन्ही गटात प्रत्येकी ३ मुस्लिम नगरसेवक आहेत.

आपल्याला न्याय मिळत नाही ही पोलीस यंत्रणेविरुद्धची सार्वत्रिक तक्रार होतीच; पण नगरपालिकेच्या अध्यक्षपदाच्या १५ मे ८५

झालेल्या निवडणुकीपासून पोलीसयंत्रणे-विरुद्धचा असंतोष आणखी वाढला होता.

या निवडणुकीत एका गटाच्या अर्धांगवायू झालेल्या नगरसेवक मतदाराला मेनगेटमधून हॉलपर्यंत मोटारसायकलवर बसून जायची परवानगी नाकारली गेली. तर दुसऱ्या गटाच्या नगरसेवकांना घेऊन जाणाऱ्या जीप, मेटॅडोर गाड्याही सरळ गेट उघडून हॉल-पर्यंत सोडण्यात आल्या आणि बाहेर जमलेल्या शेकडो लोकांच्या शिव्या अधिकाऱ्यांना खाव्या लागल्या.

यंत्रणेविरुद्धचा असंतोष वाढत असला तरी हिंदू-मुस्लिम ऐक्याचं एक चागलं चित्र या निवडणुकीत निर्माण झालं होतं विरोधी गटाने स्वीकृत सदस्याच्या दोन जागा जिंकल्या. त्यापैकी एक विजयी उमेदवार मुस्लिम युवक होता. त्यानंतर निघालेल्या विजयी उमेदवाराच्या मिरवणुकीत हिंदू–मुस्लिम युवकाचा सहभाग होता. या मिरवणुकीनं आशादायी वातावरण निर्माण झालं होतं.

## वातावरण तापलं

पण मारामारीच्या, बाचाबाचीच्या त्यानतर घडत गेलेल्या घटनामुळं वातावरण बदलत गेलं.

१९८५ च्या एप्रिल महिन्यातला एक दिवस

वसत गुजाळ नावाच्या एका तरुणाला चार जणानी रिक्षात घालून प्रवरा नदीकाठी नेऊन बेदम मारला ज्यानी मारला ते मुस्लिम. त्या सर्वांना अटक करण्यात आली. कोर्टातून रितसर केस दाखल करण्यात आली.

जुलै महिन्यातल्या शेवटच्या आठवड्यातला एक दिवस.

एका बाईला सायकलवरून डबलसीट जाणाऱ्यांनी धक्का दिला म्हणून ते बघणाऱ्या तरुणानी त्या सायकलस्वाराला अडवले का धक्का दिला विचारले आणि दोन लगाव त्याही. ज्या लगावल्या तो मुस्लिम, ज्याने लगावल्या तो हिंदू. मार खाणाऱ्याने नावानिशी रितसर तक्रार नोदवली.

त्यानंतरच्या एकदोन दिवसातली घटना तो तरुण आपल्या चार मित्रासह एका हॉटेल-जवळ थाबलेले. एवढ्यात एक रिक्षा येऊन थाबली. सात-आठजण उतरले आणि काही समजण्याच्या आत मारहाण सुरू. मारणाऱ्याच्या हातातल्या वस्ताऱ्याने रमेश काळेला आणि मध्ये पडलेल्या एका पोलिसाच्या हाताला जखम झाली. पोलीस असले तरी मारणारे पळून गेले. त्याना अटक करावी अशी मागणी करणाऱ्या पंचवीस–तीस तरुणावरच पोलिसानी लाठीमार केला.

नावे माहीत असूनही हल्लेखोर सापडले नाहीत.

दि. १४ ऑगस्ट ८५ ची घटना

संगमनेर नगरपालिकेत दोन तुल्यबळ गट आहेत.

दोन्ही गटाचे संख्याबल समसमान आहे. नवीनच निवडून आलेल्या सर्वच नगरसेवकाना कामाचा हुरुप आहे. नागरीकही आपल्या साध्या साध्या तक्रारी नगरसेवकांकडे नेतात. आपल्या तक्रारीचे निराकरण व्हावे, नगरसेवकांनी त्यात लक्ष घालावे अशी त्याची स्वाभाविक अपेक्षा असते वॉर्डातील नागरिकानी सागितलेले काम झाले पाहिजे हा मग नगरसेवकाच्याही प्रतिष्ठेचा प्रश्न बनतो. विरोधी गटाचे नगरसेवक श्री. शेख सैंदू यानी त्याच्या वार्डातील गटारीच्या कामासंबंधी बाधकामखात्याला सूचना दिली होती. वारंवार सागूनही आपले काम होत नाही, कामात मुद्दाम दिरंगाई केली जाते, असा श्री. शेख याना अनुभव आला होता. स्वाभाविकपणे चिडून बांधकाम समितीचे चेअरमन सत्ताधारी गटाचे श्री. पडवळ व शेख सैंदू यांच्यात बाचाबाची झाली. वाद वाढला. प्रकरण पोलीस स्टेशनपर्यंत गेले. दोघांनाही जामिनावर सोडण्यात आले.

ही झाली संध्याकाळची घटना.

त्याच दिवशी रात्री ८/८॥ वाजण्याचे सुमारास शेख सैंदु याचे सबधित, सध्याकाळच्या वादाबद्दल 'जाब' विचारायला नेहरू चौकातील पडवळ याच्या दुकानी आले. त्याना पडवळ भेटले नाहीत. पण तिथे असलेल्या तरुणाना त्यांनी शिवीगाळ केल्याने प्रकरण हातघाईवर आले. जाब विचारायला आलेल्या त्याना काहीनी शात करून पाठविण्याचा प्रयत्न केला. उलट तेच आणखी चार–सहा जणाना घेऊन मारामारीच्या पवित्र्यात पुन्हा हजर झाले. एव्हान जमाव वाढला होता.

हातघाईच्या प्रकरणाचे पर्यावसान मारामारीत झाले.

आणि त्या दिवशी रात्री ९ नतर शहराच्या विविध भागात मारहाणीचे सहा-सात प्रकार घडले. या सर्व प्रकारात मुस्लिमाना लक्ष्य करण्यात आलं होतं. पोलिसांनी खबरदारी घेतली. तातडीनं कारवाई केली. बंदोबस्त वाढवला. गस्त सुरू झाली. त्यामुळे परिस्थिती काबूत ठेवता आली.

सहा हिंदू तरुणाना या प्रकरणी अटक करण्यात येऊन त्याच्यावर केसेस दाखल करण्यात आल्या.

४ सप्टें. ८५ 'पतित पावन सघटने'चा वर्धापनदिन. त्यानिमित्त क्रांतीगिता महाबळ याचा 'सावरकर दर्शन' हा एकपात्री प्रयोग चालू होता रात्री ११ वाजले असावेत, चद्रकात अभग नावाचा एक तरुण आपल्या दोन मित्रासह कुभारआळीतून नेहरू चौकाकडे आपल्या घरी निघालेत. त्याला चार जणानी अडवले. मारहाण केली, घड्याळ काढून घेतले.

तो कार्यक्रमाच्या ठिकाणी आला. मारहाणीचा जास्त बोभाटा होऊन वातावरण चिघळू नये म्हणून त्याला परस्पर पोलीस स्टेशनला तक्रार नोदविण्यासाठी कार्यकर्त्यांनी पाठवून दिले दरम्यान आधीच्या एक दोन दिवसात पोलिसाच्याकडेही आपापसातील मारहाणीच्या काही तक्रारी दाखल झालेल्या होत्या. रात्री पोलीस गाडी गस्त घालीत फिरू लागली–

त्या रात्री वर्धापनदिनाचा कार्यक्रम सपवून घरी जाणाऱ्या पतित पावन सघटनेच्या दोन कार्यकर्त्यांना रस्त्यातून उचलून नेले. आणखी दोन कार्यकर्त्यांना रात्रीतून घरातून नेसत्या वस्त्रानिशी उचलून नेले.

दुसऱ्या दिवशी, दि. ५–९–८५ ला या कार्यकर्त्यांना विनाकारण अटक केलेली आहे. (हे पी. एस. आय. पाटील ह्यानी तहसिलदार याचेसमोर झालेल्या चर्चेत मान्य केले होते.) त्याना सोडावे अशी सघटनेने आणि काही प्रमुख नागरिकानी विनती केली. संगमनेरचे प्रांत, अधिकारी, डी. एस. पी. डी आय जी तहसिलदार ह्या सर्वांना हस्तक्षेप करण्याची विनती करण्यात आली. पण प्रयत्न निष्फळ ठरले.

त्या रात्री दि. ५–९–८५ रोजी झालेल्या 'नागरीक कृती समिती'च्या सभेला नागरिकांनी प्रचंड प्रतिसाद दिला. ५ हजार

तरुण, व्यावसायिक, व्यापारी हजर होते. कार्यकर्त्यांच्या अटकेचा, नेहमी होणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांच्या पक्षपाती वर्तणूकीचा बेकायदेशीर धंद्यांना संरक्षण देणाऱ्या धोरणाचा निषेध नोंदविण्यासाठी ६ सप्टेंबरला संगमनेर शहर बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला.

'बंद'ला मिळालेला प्रतिसाद उत्स्फूर्त आणि अभूतपूर्व होता.

संध्याकाळी ५ वा. निवेदन देण्यासाठी मोर्चा निघाला. मोर्चा मूक होता. तहसिलदार प्रा. मूळे यांनी कार्यकर्त्यांना सोडायची तयारी दाखवली.

कृतिसमितीचे काही कार्यकर्ते काही वकिलांच्यासह चर्चेसाठी गेले.

मोर्चा विसर्जित करण्यात आला. लोक घरी परतू लागले. अचानक कृतिसमितीचे नेते राधावल्लभ कासट यांच्यावर लाठीमार करण्यात आला. सुटका होणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी धावलेल्या लोकांवर बेछूट लाठीमार झाला.

बातमी शहरभर पसरली. घरी परतणारे मागे फिरले.

लाठीमार सुरूच होता. अश्रुधुराच्या नळकांड्या फुटल्या. नागरिकांकडूनही प्रतिकार सुरू झाला शहरभर पोलिसांविरुद्ध 'अघोषित युद्ध' सुरू होते.

त्या दिवशी पहाटेपर्यंत उठणाऱ्या किंकाळ्यांच्या आवाजाने वातावरण भयभीत करून टाकले होते. त्या दिवशी झालेल्या गोळीबारात ५ तरुण जखमी झाले. असंतोष पोलीसयंत्रणेविरुद्ध होता. म्हणून त्या दिवशी जमावाने पोलिसानाच टार्गेट बनविले होते.

पोलीस विरुद्ध हिंदू जनता असे त्या दिवसाच्या घटनेचे स्वरूप होते.

२ डिसें. ८५ रोजी पुन्हा एक घटना घडली.

शंकर मातोडे या 'पतित पावन संघटने'च्या कार्यकर्त्याला काही गुंडांनी मारहाण केली. तो मारणाऱ्यांना ओळखतो. त्याने काही नावेही पोलिसांना सांगितली. पण अधिकाऱ्यांकडून 'पूर्ण नावे नाहीत' या कारणामुळे कोणतीच कारवाई घडली नाही.

'आक्रमक गुंडगिरी करणाऱ्या एका गटाच्या प्रवृत्तीमुळे दर वेळेला आपल्याला मार खावा लागतो. पोलीस अधिकाऱ्यांकडे तक्रार केली तरी न्याय मिळत नाही. उलट मार खाणाऱ्यांवरच चॅप्टर केसेस दाखल केल्या जातात. मारणारे पोलिसांना कधीच सापडत नाहीत. त्यांना दडवून ठेवले जाते. संरक्षण दिले जाते. त्यांच्या बरोबरच्या हितसंबंधामुळे पोलीस कारवाई करू शकत नाहीत. त्यामुळे गुंडगिरीचे प्रमाण वाढले आहे

सहन न होणारा एखादा पेटून उठतो, विचारतो वेळप्रसंगी दोन लगावतोही. तक्रार पोलीस स्टेशनला गेली की जाब विचारणाऱ्याने दोन का लगावल्या आहेत याचा विचार न करता, खऱ्या गुंडांना सोडून, अशा तरुणांनाच अडकवले जाते. आजपर्यंत अनेक प्रसंगी असा 'न्याय' मिळाल्याने अधिकाऱ्यांवरचा नागरिकांचा विश्वास उडालेला आहे. त्यामुळे प्रचंड असंतोष आहे.'

शहरातल्या तमाम हिंदू जनतेची ही कैफियत आहे.

फारसे शिक्षण नाही. शिक्षण घेण्यासारखी बहुतेकांची परिस्थिती नाही. त्यामुळे रोजी रोटी कमावणे भाग असते. त्यामुळे मुलगा कळता झाला की कमावता होतो. आपल्या पायावर उभा राहतो, स्वतंत्र होतो. घरची बंधने सैल होतात.

या शहरात आमच्या पिढ्या नांदल्या आहेत. आमचेही व्यवसायधंदे याच शहरात आहेत, शहरातील सर्वच समाजाबरोबर आमचे व्यावसायिक संबंध आहेत. अशा स्थितीत निष्कारण कुरापत काढून आमचे परस्परातील संबंध ताणण्याचे कृत्य आमच्याकडून घडेलच कसे? काही उनाड मुलांच्यामुळे घडणाऱ्या किरकोळ बाचाबाची, मारामारी याचा एवढा बाऊ करून त्याला व्यापक स्वरुप द्यायचं काही कारण नाही. आपापल्या समाजातील अशा उपद्रवींना समाजातील 'वजनदार' लोकांनी गप्प बसवावं.

ही बाजू आहे मुस्लिम जनतेची.

'संगमनेर हे 'हॉट स्पॉट' असल्याने इथल्या इनचार्ज ऑफिसरला नेहमीच सजग रहावे लागते. नेहमीच्या चोऱ्या, दरोडे, किरकोळ भांडणे, कोर्ट-कचेरीची कामे, अपघात, विविध कार्यक्रमांचा बंदोबस्त, संप, मोर्चे, उपोषण यासाठीचा बंदोबस्त, त्याशिवाय घडणारे असे प्रकार. इथली ड्युटी हा नियमितचा मानसिक ताण आहे.

रोजच्या कामाबरोबर विविध प्रकारणातून होणारा हस्तक्षेप यामुळे या पोलीस स्टेशनला काम करणे ही कसरत आहे. प्रत्येक तक्रारीची तातडीने दखल घेण्याचा प्रयत्न असतो. तक्रारीच्या मागची खाजगी कारणांची त्रयस्थ माणसांना फारशी कल्पना नसते. किंबहुना त्या कारणाचा फारसा कुणी विचारही करत नाही. दोन जमातीमध्ये झालेली घटना असेल तर लगेच त्याला 'कलर' येतो. आम्हालाही त्यादृष्टीने काळजी घ्यावी लागते. लोक तक्रार करायला पुढे येत नाहीत. आले तर पुरेसा साक्षी पुरावा मिळत नाही. म्हणून केसमध्येही फारसा अर्थ उरत नाही. गेल्या तीस-पस्तीस वर्षात संगमनेरमध्ये हिंदू-मुस्लिमांच्यात झालेल्या तणावाच्या, दंगलीच्या कोणत्याच केसेस त्यामुळे उभ्या राहू शकल्या नाहीत. त्यामुळे गुन्हेगारांना सजा होत नाही. पण पोलिसांच्या माथी मात्र अपयशाचं खापर फोडलं जातं.

इथल्या कोणत्याही इनचार्ज पोलीस अधिकाऱ्यांची ही नेहमीची तक्रार आहे.

नगरपालिकेत सध्या सत्ताधारी आणि विरोधी दोन्ही गटात प्रत्येकी तीन मुस्लिम नगरसेवक आहेत. विरोधी गटातील मुस्लिम नगरसेवकांची मने कलुषित होऊन तुल्यबळ असलेला विरोधी गट कमकुवत व्हावा असाही हा तणाव निर्माण होण्यामागे प्रयत्न असल्याचे शहरात उघड बोलले जाते.

या दंगलीमुळे शहरातील दोन्ही समाजात दरी निर्माण झाली आहे. दोन समाज मोठ्या प्रमाणावर दुरावले आहेत. त्यांच्यात वैमनस्याची भावना निर्माण झाली आहे— ही मने साधणे अवघड आहे. घडलेल्या घटनांचे विश्लेषणं करताना अधिकारी, नागरीक, पत्रकार फार वरवरचा विचार करून घटनेची वासलात लावून टाकतात.

अधिकाऱ्यांनी घेतलेली शांतता समितीची मिटिंग, नागरिकांची मिटिंग, स्वतःला सेक्युलर म्हणवणाऱ्या पण नेहमीच पक्षपाती आणि पूर्वग्रहदूषित भावनेतून विचार कर-

णाऱ्यांची मिटिंग. प्रत्येकाची सदिच्छा शांतता निर्माण व्हावी अशी असली तरी यापैकी कोणीही सत्यशोधनाचा प्रयत्न केला नाही. प्रत्येक ठिकाणी 'हिंदू मुस्लिम भाई भाई, आपल्याला एकत्र एका गावात रहायचे आहे, शहरात शांतता राहिली पाहिजे, गुंडाचा बंदोबस्त झाला पाहिजे मग ते कोणत्याही जातीधर्मातले असोत–' अशी जाहीर सभेतल्यासारखी भाषणं ठोकली गेली.

अशा ठिकाणी प्रत्येकजण मुखवटा घालून वावरणारा, त्यामुळे वस्तुस्थितीकडं सोयिस्कर डोळेझाक केली जाते.

संगमनेर शहरात नेहमी घडणाऱ्या या घटनांमागची कारणे शोधायला हवीत. तात्कालीन कारण काही असलं तरी विविध घटनामुळे निर्माण झालेला असंतोष अशा वेळी बाहेर पडतो. त्याचा उद्रेक होतो.

त्यात अपराधी–निरपराधी सगळेच भरडले जातात.

१९७९ च्या 'रंगपंचमी'च्या दिवशीच्या दंगलीतलं चित्र वेगळं होतं– 'जातीय तणावातही' माणसाच्यातली माणुसकी करपली नव्हती. आपल्या शेजारच्या हिंदूचं घर पेटवायला आलेल्या जमावाच्या हाता–पाया पडून जमावाला परतवून लावणारी मुस्लिम स्त्री, पेट्रोल पंपावरून मालकाला सुरक्षित घरी पोहचवणारा मुस्लिम गृहस्थ, हिंदूच्या जळलेल्या कारजवळ उभ्या असलेल्या मुस्लिमांच्या ट्रकला वाचवणारे हिंदू, हिंदूच्या गल्लीत राहणारा 'अब्दुल' आणि मुस्लिम मोहल्यातला 'प्रभाकर' दोघेही आपापल्या स्थानी सुरक्षित होते.

ह्या वेळच्या दंगलीत चित्र वेगळं दिसलं. अशी दिलासा देणारी उदाहरण नव्हती असं नाही तरीही नित्य व्यावसायिक वा अन्य मित्रत्वाचे संबंध असतानाही केवळ 'हिंदू' आणि फक्त 'मुस्लिम' म्हणूनही काही जाळपोळीचे प्रकार घडले. बिनचेहऱ्याच्या अनावर जमावान कोणालाच जुमानल नाही.

विवेकी माणसंही हतबुद्ध होती.

दंगलीचे सगळेच खापर सरकारी अधिकारी किंवा पोलीसयंत्रणेवर फोडण्यात अर्थ नसला तरी इतक्या दिवस सातत्याने घडणाऱ्या घटनांमुळे बिघडत चाललेल्या परिस्थितीचा नीटसा अंदाज अधिकाऱ्यांना आला नसावा. अन्यथा आवश्यक आणि पुरेसा बंदोबस्त ठेवता आला असता. गस्त वाढवता आली असती. कुंभार आळीतच लागोपाठ बरेच प्रकार घडल्याने त्या स्पॉटवरही विशेष लक्ष ठेवणे आवश्यक होते.

शांतता हवी अशा कितीही गप्पा मारल्या तरी शहरातील कोणताही नागरीक शांतता निर्माण करू शकणार नाही. स्थिती शांत भासली तरी ती वरवरची असेल खरी शांतता हवी असेल तर विनाकारण किंवा किरकोळ कारणावरून वादंग माजविणाऱ्यांना दूर ठेवायला हवे.

त्याचा त्यामागचा व्यक्तिगत स्वार्थ लोकांच्या नजरेसमोर आणायला हवा. व्यापक समाजहिताचा विचार करून अधिकारी किंवा पुढारी ह्यांनी साध्या कारणासाठी प्रतिष्ठेचा प्रश्न न करता, सर्वांचीच प्रतिष्ठा राहील अशा रीतीने प्रश्न सोडविला पाहिजे. अधिकाऱ्यांनी निःपक्षपातीपणे कारवाई करावी, यात कोणी हस्तक्षेप करू नये, केला तर जुमानला जाऊ नये.

त्याचबरोबर अधिकाऱ्यांचे 'हितसंबंध' संपवायला हवेत.

बेकायदेशीर धंद्याच्या आश्रयाने वाढणारी गुंडगिरी थांबवायला हवी.

त्यासाठी बेकायदेशीर धंदे बंद होणे आवश्यक आहे. प्रत्येक घटनेची खोलात जाऊन चौकशी करून, कारण शोधून घटना का घडली हे जाणून अधिकाऱ्यांनी उपाय योजणे गरजेचे आहे. 'सब घोडे बारा टक्के' या न्यायाने सर्वांनाच बडगा दाखवला तर मग निमित्त मिळाल्यावर असंतोष उफाळून आल्याशिवाय राहाणार नाही.

मग 'सुक्याबरोबर ओलेही जळेल' आणि अशीच गोलमाल भाषा बोलून वर वर मलमपट्टी केली जाईल. मूळ दुखणे मात्र कायम राहील.

मग शांततेच्या सदिच्छेला काहीच अर्थ उरणार नाही.

☐

---

# संगमनेरचं हे दुसरं रूप !

संगमनेर महाविद्यालय–
चालू वर्ष हे रौप्यमहोत्सवी वर्ष,
पण फक्त इतकंच नाही,

गेल्या २४ वर्षात महाविद्यालयानं अनेक उपक्रम सुरू केले, अनेक प्रकल्प राबवले. संगमनेर महाविद्यालय फक्त शैक्षणिक संस्था न रहाता परिसरातल्या सर्वांगिण जीवनाशी बांधली गेली, संगमनेरमधल्या रचनात्मक चळवळीचं केंद्र बनली.

या महाविद्यालयाची, प्रकल्प–उपक्रम–योजनांची ओळख करून देणारा विशेष लेख पुढील अंकी.

---

# जनता राजवटीतला एक यशस्वी प्रयोग अंत्योदय... राजस्थान



ग्रामीण विकास हा सर्वसाधारण विकासाचा एक अविभाज्य विभाग आहे, आणि आर्थिक विकास हा समाजाने अथवा समाजाच्या विविक्षित घटकाने करावयाचा एक प्रयोग आहे. ग्रामीण विकासाचे मर्म याच पार्श्वभूमीवर अवलंबून असते. या पार्श्वभूमीतूनच गरिबी आणि गरीब या संबंधीची समस्या सोडविण्याच्या उद्देशाने भारतात २ ऑक्टोबर १९५२ सालापासून ग्रामीण विकासाचे कार्यक्रम राबविले जात आहेत. गेल्या तीन दशकात सरकारने विकासाच्या अनेक योजना पूर्ण केल्या तरीसुद्धा या योजनांचा लाभ गरिबांना, समाजातील तळागाळातील लोकांना, आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या घटकांना मिळाला असे म्हणता येणार नाही. अशा योजनांचा फायदा समाजातील सुखवस्तु, व्यापारी, उद्योगपती, बडे शेतकरी आदी लोकांना अधिक मिळाला. समाजातील तळागाळातील लोकांना लाभ व्हावा, त्यांना समृद्ध नसले तरी सुखी जीवन जगता यावे म्हणून अनेक योजना साकार झाल्या, नव्या योजनांच्या शिफारशीही तज्ज्ञांच्याकडून होत आहेत. परंतु या सर्वांच्या मूल्यमापनाचे अहवाल जर पाहिले तर एकंदर चित्र मात्र नैराश्यजनकच आहे.

महात्मा गांधींच्या आर्थिक विचारातील महत्त्वाचा टप्पा अंत्योदय हा आहे. जे. पीं. च्या संपूर्ण क्रांतीमधील दुसऱ्या टप्प्यामध्ये अंत्योदय विचारांचा उहापोह केला आहे. अंत्योदय ही गांधीवादी संकल्पना आहे. 'अन् टू द लास्ट' या रस्किनच्या पुस्तकामुळे प्रभावित होऊन, गांधीजींनी ग्रामीण 'अंत्यजासाठी' आयुष्यभर काम करण्याची जबाबदारी स्वीकारून यश संपादण्याचा प्रयत्न केला. 'अंत्योदय' ही चळवळ राजस्थानमध्ये **२ ऑक्टोबर १९७७** पासून सुरू झाली. समाजातील अत्यंत गरीब, आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि चरितार्थाचे पुरेसे साधन नसलेल्या माणसाला अधिक चांगले जीवनमान कसे जगता येईल, स्वतः कष्ट करून स्वाभिमानाने स्वतःची भाकरी कशी मिळवता येईल याचा विचार या योजनेमध्ये करण्यात आला. हे करताना धर्म, जात, पंथ, वंश यांचा विचार केला नाही. अंत्योदयाचे हे एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्यच म्हणावे लागेल. राजस्थानमध्ये ही योजना प्रथमतः अंमलात आणली गेली. त्यानंतर अनेक राज्यांनी त्याचे अनुकरण केले. तिसऱ्या जगातील कित्येक गरीब राष्ट्रांनीही याचा खास अभ्यास सुरू केला; पण दुर्दैवाने ही योजना ३१ ऑगस्ट १९८१ रोजी बंद केल्याची घोषणा झाली. राजस्थानमध्ये ही योजना सध्या एकात्मिक ग्रामीण कार्यक्रमाद्वारे राबवली जाते.

कोणत्याही योजनेचे मूल्यमापन तीन टप्प्यातून करता येते. पहिल्या टप्प्यामधील मूल्यमापन हे अंमलबजावणी अगोदर (ex-ante) केलेली एक प्रायोगिक चाचपणी असते. अशा प्रकारचे मूल्यमापन राजस्थान सरकारने केले होते. त्यामध्ये पाच जिल्हे होते. अजमेर, कोटा, जयपूर, चितोडगड व झुनझुन या पाच जिल्ह्यातील अनुक्रमे भडसोडा, कोटखवडा, हनमंतपुरा, हुनव्हस्कलन आणि उंडावा या खेड्यामध्ये अंत्योदय योजना प्रथमतः राबवली आणि त्याचे मूल्यमापन सरकारने केले. दुसऱ्या टप्प्यातील मूल्यमापन प्रत्यक्ष योजनांची अंमलबजावणी होत असताना केले जाते. या प्रकारच्या अंत्योदय योजनेचे मूल्यमापन नियोजन मंडळाने ( P. E. O. ) सप्टेंबर १९७९ मध्ये केले होते. या प्रकारच्या मूल्यमापनात प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या वेळी येणाऱ्या अडचणी व त्यांच्या निराकरणाचे उपाय शोधले जातात. तिसऱ्या टप्प्यामध्ये योजनेच्या अंमलबजावणीनंतर ( ex–post ) त्याचे परिणाम, अडचणी, यशापयश आणि निष्कर्षांबरोबरच उपाय आदींचा विचार केला जातो. सदर लेखामध्ये तिसऱ्या प्रकारच्या मूल्यमापनाचा विचार केला आहे.

### ग्रामविकास आणि ग्रामीण गरीब

ग्रामीण विकास हा संख्यात्मक आणि गुणात्मक अशा अनेक अंगांनी परिपूर्ण आहे. त्यामध्ये सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, तांत्रिक आणि नैसर्गिक आदी सांघिक बदलांचा अंतर्भाव असतो. त्यामध्ये विशेषतः क्षेत्र व त्यावर अवलंबून असणाऱ्या उद्योगांची वाढ आणि रोजगार निर्मिती करून दारिद्र्य निर्मूलनाचा प्रयत्न केला जातो. अशा ग्रामीण विकास कार्यक्रमात होणाऱ्या वाढीच्या फलात गरीबातल्या गरीबांचा न्याय्य वाटा असला पाहिजे हे कटाक्षाने पहावे लागते

ग्रामीण विकासाच्या विविध घटकांवर अनेक व्यक्ती संघटना, सरकार आणि सहकारी चळवळीने काम केले आहे. ग्रामीण विकास हा अनेक अंगांनी परिपूर्ण असल्याने त्याचा स्पर्श केवळ सांघिक राहिला नाही आणि जरी राहिला तरी त्याच्या अंमलबजावणीचा प्रश्न मोठा आहे. त्यामुळे आजही (१९८०) ५३.६ टक्के ग्रामीण जनता आणि ३८ टक्के शहरी जनता दारिद्र्यरेषेखाली जीवन जगते. तसे पाहिल्यास भारतातील दारिद्र्यासंबंधीची पहिली मांडणी १८७६ मध्ये दादाभाई नौरोजींनी आपल्या इंग्लंडमधल्या व्याख्याना-

जनता राजवट राजस्थानमध्ये असताना (१९७७ ते १९८०) तेथे अंत्योदय योजना ही, ग्रामीण विकासाचा एक वेगळाच प्रयोग म्हणून सुरू झाली. पुढे इंदिरा राजवट आल्यानंतर ही योजना बंद करण्यात आली. पण जी २–२॥ वर्षे या योजनेला मिळाली त्या कालावधीत या योजनेची कार्यवाही कशी होती ? कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाच्या संशोधन अनुदान योजनेखाली यासंबंधी एक पहाणी झाली. या पहाणीवर आधारित हा लेख–

लेखक : प्रा. वसंत जुगळे, सांगली

तून केली. परंतु पारतंत्र्यामुळे त्याची तीव्रता राज्यकर्त्यांना जाणवली नाही. तरीसुद्धा बऱ्याच लोकानी ग्रामीण विकासाच्या दृष्टीने प्रयत्न केलेले आहेत. उदाहरणार्थ, रवींद्रनाथ टागोर आणि लिओनार्ड एल्मीरीस्ट याची पश्चिम बंगालमधील श्रीनिकेतन, डॉ. स्पन्सर हॅच यांचा केरळमधील मोर्टॅन्डम प्रकल्प, एफ्. एल् ब्रेयने याचा हरियाणा गोरेगाव जिल्हयाचा प्रकल्प, व्ही. टी. कृष्णम्माचारी याचा गुजरातमधील बडोदा जिल्हयाचा प्रकल्प इत्यादी प्रकल्प पायाभूत मानले पाहिजेत. १९३० नंतर गांधीजींची सेवाग्रामसबंधीची चळवळ उल्लेखनीय आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर मद्रासची फरक्का विकास योजना, मुंबईची सर्वोदय योजना, उत्तरप्रदेशातील अल्बर्ट मेयर याच्या नेतृत्वाने सुरू झालेली इटावाची पायलट योजना इत्यादींचा उल्लेख करावा लागेल. स्वातंत्र्योत्तर काळात या सर्व प्रकारच्या योजनांचा अंतर्भाव गटविकास कार्यक्रमामध्ये (C. D. P) करण्यात आला. पुढे पंचवार्षिक योजनाद्वारे अनेक प्रकल्प राबवण्यात आले. त्यामध्ये डी. पी. ए पी., डी. डी. पी., एम् एफ् ए. एल्., एस्. एफ् डी. ए., एन. आर. ई पी., ट्रायसेम, आय आर. डी., २० कलमी कार्यक्रम, एफ् एफ्. डी ए., समग्र ग्राम, ग्रामीण विकास केन्द्रे इत्यादींचा समावेश करता येईल.

परंतु ग्रामीण गरिबासबंधीचा प्रश्न महत्त्वाचा असूनही त्याला वेगळ्याने महत्त्व दिले गेले नाही प्रथमत. फक्त राजस्थानमध्येच ग्रामीण गरिबासाठी म्हणून अंत्योदय कार्यक्रम राबविण्यात आला व ही एक 'आदर्श ग्राम चळवळ' ठरली. आतापर्यंतच्या सर्व योजनांपेक्षा ही योजना खूपच वेगळी होती. ग्रामीण गरिबाना ओळखून, त्यांच्यापुढे अनेक कार्यक्रम मांडून, त्यांच्या इच्छेनुसार त्याचा विकास घडवून आणण्याची ही एक नाविन्यपूर्ण योजना होती.

## राजस्थानमध्येच का ?

भारतात २२ घटकराज्ये आहेत. त्याची भूरचना, नैसर्गिक परिस्थिती, लोकसंख्या इत्यादी बाबतीत भिन्नता असणे स्वाभाविक आहे. राजस्थान हे भारताच्या आग्नेय दिशेकडील आकाराने मोठे, वालुकामय आणि तितकेच गरीब राज्य आहे १९८१ च्या आकडेवारीवरून तिच्या ३४ दशलक्ष लोकाचे सरासरी उत्पन्न रु. ९६४ आहे. तर एकूण देशाची सरासरी उत्पन्न पातळी रु. ११८९ आहे जवळजवळ ८२.३७% लोकसंख्या ग्रामीण भागात राहते आणि सुमारे ७०% लोक शेती व शेतीस संलग्न जोडधंद्यामध्ये गुतलेले आहेत. राजस्थान मधल्या ३३.३०५ खेड्यापैकी ३०,००० खेड्याना अद्यापही पिण्याच्या पाण्याचा प्रश्न भेडसावतो आहे. राजस्थानचे बहुतेक उत्पन्न दुष्काळानेच गिळकृत केले जाते. १९६७–६८ नतर आतापर्यंतची आकडेवारी पाहिली तर १९७३–७४, १९७५–७६, ७६–७७ वगळता एकही वर्ष दुष्काळाशिवाय गेले नाही.

दारिद्रय मोजण्याचे कोणतेही मापन यंत्र नसले तरी इतर लोकाच्या राहणीमानाच्या तुलनेने दारिद्र्यावस्थेचा अंदाज व्यक्त करता येतो. १९७७ च्या नियोजनमंडळाच्या 'टास्क फोर्स ऑन प्रोजेक्शन्स ऑफ मिनिमम नीडस् ॲन्ड इफेक्टिव्ह कझम्शन डिमाड' या अहवालानुसार दारिद्र्यरेषा म्हणजे असा मध्यबिंदू की ज्याखालील लोकाना मासिक दरडोई खर्चातून ग्रामीण जनतेसाठी २४०० उष्णांकापेक्षा कमी आणि शहरी लोकाच्यासाठी २१०० पेक्षा कमी उष्णांक प्राप्त होतो. १९७९–८० साली राजस्थानात हा मध्यबिंदू ग्रामीण जनतेसाठी ७६ रु. आणि शहरी जनतेसाठी ८८ रु. होता.

राजस्थानमधली दारिद्र्यरेषा ठरविताना नियोजन मंडळाने असेही सांगितले होते की, १९६०–६१ च्या किंमतीनुसार दरडोई, दरमहा २० रुपये खालील उत्पन्न असलेले लोक दरिद्री समजावेत. अशी लोकसंख्या ५६% (१९६०) होती. १९७३–७४ मध्ये दारिद्र्यरेषेची मर्यादा ५५ रुपयेपर्यंत गेली. आणि अगदी अलिकडे हा मध्यबिंदू ६० रुपयेपर्यंत गेला होता. (१९७७–७८ च्या किंमतीनुसार)

याशिवाय राजस्थानमध्ये जमीनमालकीतील विषमताही गंभीर स्वरुपाची आहे. सरासरी जमिनीची उपलब्धता फक्त ३२ बिगा (१ बिगा = ० १६३८४०४ हेक्टर) इतकीच आहे ग्रामीण भागातील सधन लोकांची पिळवणूक आर्थिक आणि सामाजिक वर्चस्वातून झालेली दिसून येते. अशा प्रकारच्या काही तथ्यांचा विचार केला तर असे दिसून येते की, राजस्थानमधील दारिद्र्य हे कमी उत्पन्न, कमी उत्पादकता, अज्ञान, अंधश्रद्धा, अपुरा आहार, आवश्यक वस्तूवर कमी खर्च, अनारोग्य, शिक्षणाचा कमी प्रसार, पिण्याच्या पाण्याची टचाई, अपुरी निवास–व्यवस्था यातून व्यक्त होते.

## राष्ट्रीय योजना व राजस्थान

इतर राज्याच्या तुलनेने राजस्थानची याबाबतीतील परिस्थिती अत्यंत दयनोय आहे. केंद्र सरकारची या राज्यातील गुंतवणूक कुच-

कामी आहे. १९७७ सालातील केंद्राच्या सार्वजनिक क्षेत्रातील ११४५१.२ कोटी गुतवणुकीपैकी राजस्थानचा हिस्सा फक्त २२७.१ कोटी रु. ०.१९% इतकाच होता.

केंद्र सरकारच्या डी.पी.ए.पी. व डी. डी. पी. कार्यक्रमामध्ये १९७६ अखेर अनुक्रमे ११ व ८ जिल्ह्याचा समावेश करण्यात आला होता. ह्या योजना ५० : ५० तत्त्वावर केंद्र व राज्य यांच्यामध्ये (खर्चात) विभागल्या गेल्या. याशिवाय एस्. एफ्. डी. ए., एन्. आर. ई. पी. कार्यक्रमामध्ये १९७६ अखेर ६ जिल्ह्याचा समावेश करण्यात आला होता. प्रत्येक प्रकल्पासाठी ५०,००० लोकसंख्या, ८ वर्षासाठी सामावून घेतली जात होती. एस्. एफ् डी. ए. मार्फत लघु शेतकऱ्यांना 'सबसिडी' तत्त्वावर कर्जपुरवठा करण्यात येत होता. ही योजना बहुतेक मागासलेल्या जाती व जमातीतील लोकाना जास्त फायद्याची ठरली होती. याबरोबरच टी. ए. डी. पी., एस्. ए एच्. पी., एफ्. एफ्. डी. ए. व सी. ए. डी. इत्यादी आणि अलीकडील आय. आर. डी., २० कलमी कार्यक्रम, समग्र ग्राम चळवळ, ट्रायसेम इत्यादीसारखे विविध कार्यक्रम राज्यातील सर्व म्हणजे २३८ विकास गटात राबविले होते. या सर्व कार्यक्रमातून दारिद्र्य निर्मूलनाचे कार्यक्रम काही प्रमाणात यशस्वीरीत्या राबवले गेले असले तरी अंत्योदय योजना ही सर्व योजनेत गुणवत्तेने श्रेष्ठ ठरली.

## 'अंत्योदय' चे स्वरूप

'अंत्योदय योजना' ही राजस्थानच्या ऑफिसर्स ट्रेनिंग स्कूलचे १९८० चे संचालक आणि भूतपूर्व मुख्यमंत्री श्री. भैरवसिंग शेखावत याचे सचिव डॉ. एम्. एल्. मेहता यांनी तयार केली होती. ते 'अंत्योदयचे पिता' (फादर ऑफ अंत्योदय) म्हणूनच ओळखले जातात. अंत्योदय सुरू करण्यापाठीमागची स्फूर्ती गुजरातमधील 'वॅलोड ग्रुप' या स्वेच्छा संघटनेकडून मिळाली. १९७५-७६ मध्ये ग्रामीण भटक्या लोकांची आर्थिक व सामाजिक परिस्थिती सुधारावी अशा रोजगाराभिमुख व्यवसायांची सुरुवात करून, या स्वेच्छा संघटनेने मोलाचे कार्य सुरू केले होते हळूहळू त्याचा विस्तारही झाला. प्रत्येक ५ ते ६ माणसाच्या कुटुंबासाठी किमान ३०० रुपये उत्पन्न आवश्यक असते हे गृहीत धरून ३००० रुपयापर्यंत उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न कसा करावा यासंबंधी या संघटनेने कार्यक्रम तयार केले होते. त्याचा परिणाम, अधिक जनता सरकारचे गांधीवादी धोरण, यामुळे अंत्योदय ही योजना साकार झाली. दर वर्षाला पाच कुटुंबांची निःपक्षपातीपणे निवड व्हावी म्हणून ग्रामसभा बोलावून कुटुंबाच्या इच्छेची, अंत्योदय कार्यक्रमातील एखाद्या प्रकल्पाची निवड करून, कुटुंबाचे, पर्यायाने ग्रामीण गरिबाचे हीत साधले जावे, हा हेतू ठेवलेला होता. अशी निवड करताना खालील अटी घातल्या जात होत्या.

(१) जमीन जुमला, गुरे किंवा इतर कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. घरातील १५ ते ५९ या वयोगटातील व्यक्ती, वृद्धत्व अगर अपंग अशामुळे घरातील कोणीही मिळवते नाही अशी कुटुंबे.

(२) कुटुंबातील लोकाचे आर्थिक उत्पन्नाचे कायम साधन नाही, पण एक किंवा अनेक माणसे मजुरी करून जेमतेम १२०० रुपयाइतके वार्षिक उत्पन्न मिळवतात अशी कुटुंबे.

(३) भूमिहीन शेतमजुरांची किंवा कारागिरांची कुटुंबे, ज्यांची वार्षिक मिळकतसुमारे १२०० ते १८०० रुपये एवढी आहे.

(४) थोडीफार जमीन किंवा उत्पन्नाचे साधन असलेली; पण दरडोई ५५ रुपयापेक्षा कमी उत्पन्न असलेली कुटुंबे.

वार्षिक ३६०० रु. पेक्षा कमी उत्पन्न असलेली कुटुंबे दारिद्र्यरेषेखालील समजली जात होती. निवडलेल्या कुटुंबाला ओळखपत्र दिले जात होते. त्यावरून ती अनेक प्रकारच्या सवलतीस पात्र ठरली जात होती.

## अंत्योदय कार्यक्रम

प्रत्यक्ष कार्यक्रमाच्या अमलबजावणीअगोदर सरकारने ६ जिल्ह्याची एक प्रायोगिक पहाणी केली होती. या जिल्ह्यातील (कोटा, जयपूर, उदयपूर, अल्वारा, झुनझुन व जोधपूर) प्रयोगाच्या यशानंतरच अंत्योदयाची व्यापक अमलबजावणी सुरू झाली. ग्रामीण भागात कार्य करणारे ग्रामपातळीवरील कर्मचारी ( VLW ), गावातील गरीब कुटुंबाची नावे गोळा करीत. दर वर्षाला दारिद्र्य रेषेच्या तळातील ५ कुटुंबांची निवड ग्रामसभामधून होत असे. दरिद्री कुटुंबाची निवडही लोकसंख्येच्या वर्गवारीवरून ठरविली जात असे. उदाहरणार्थ ५०० लोकसंख्येला ३ कुटुंबे, ५०१ ते १००० साठी ५ कुटुंबे, १००१ ते २००० साठी ७ कुटुंबे, २००१ ते पुढे १० कुटुंबे निवडावीत असा नियम होता.

अशा प्रकारे अंत्योदय कुटुंबाची निवड झाल्यानंतर खालील कार्यक्रमाद्वारे त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न केला जात होता.

(१) निराधार व्यक्तीला सुरुवातीला दरमहा रु. ३० व जोडप्यास ४० रु. असे निवृत्ती वेतन देणे. हे वेतन पुढे अनुक्रमे ४० रु. व ६० रु. पर्यंत वाढविण्यात आले होते.

(२) भूमिहीन अंत्योदय कुटुंबांना जमिनी देणे. थोडीबहुत शेती असलेल्यांना जोडधंदे अथवा शेतीला आवश्यक अवजारे, खते, बियाणे वगैरे देणे. या कार्यक्रमाचा स्वीकार करणाऱ्याची संख्या अधिक होती.

(३) शेती क्षेत्रातील कार्यक्रमामधील एस्. एफ् डी. ए., एम्. एफ्. ए. एल्. व डी. पी. ए. बी च्या विविध सवलतींनुसार मदत करणे. लघु शेतकऱ्याना २५% व सीमांत शेतकऱ्याना ३३⅓% सबसिडी देण्यात आली. त्यामध्ये (अ) फॉस्फेटयुक्त व पोटॅशयुक्त खते पुरविणे, (ब) धान्य साठविण्यासाठी व अवजारांसाठी सवलतीच्या दराने सोयी उपलब्ध करून देणे, (क) बैलगाडी अथवा बैलजोडी, म्हैस अथवा म्हैसगाडी, गाय, उंट, गाढव अथवा उंटगाडी इत्यादीसाठी सवलतीच्या व्याजदराने कर्जपुरवठा करणे. शिवाय सबसिडी वेगळीच.

(४) लघु सिंचन प्रकल्पासाठी कर्जपुरवठा करणे. उदा. विहिरी खोदणे. (२० मि.), पंपसेट बसविणे इत्यादी.

(५) शेती-विकास कर्जपुरवठा करणे.

(६) पशुसंवर्धन कार्यक्रमाखाली शेळ्या, मेंढ्या, कोंबड्या, डुकरे इत्यादीसाठी पशु कर्ज पुरवठा करणे.

(७) उद्योग क्षेत्रातील विविध कार्यक्रमामध्ये लघु व घरगुती

उद्योगांना प्राधान्य देणे. ग्रामीण कौशल्य आणि ग्रामीण साधने यांचा मेळ घालून कुटुंबाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी हरतऱ्हेची आर्थिक मदत देणे. यामध्ये : (अ) खादी कार्यक्रमाखाली चरखा, खरग, तेल-पाणी इ. साठी ५०% सबसिडी व ५०% कर्ज पुरवठा करणे, (ब) छोटया उद्योगासाठी कर्ज पुरवठा करणे. यामध्ये अनाज–दाल प्रक्रिया उद्योग, ग्रामीण तेल उद्योग, चर्मोद्योग, खांडसरी, सात्रण, लोहारी, सुतारी इ. उद्योग व्यवसायांचा समावेश करण्यात आला. (क) ग्रामीण उद्योगधंदे या सदराखाली टेलरिंग, डब्बे तयार करणे, मॅट तयार करणे, चाकू तयार करणे किंवा गोळयांची छोटी दुकाने चालविणे आदी स्वयंरोजगाराभिमुख उद्योगांचा समावेश करण्यात आला होता.

(८) स्वयंरोजगार या कार्यक्रमाखाली धान्यावर प्रक्रिया करणे, तेलघाणा, कातडीकमाई, बूट तयार करणे, दोर विणणे, कारपेंटरी करणे, खांडसारी व गूळ तयार करणे, मडकी तयार करणे, धुलाई इत्यादीसारख्या व्यवसायाद्वारे रोजगार मिळवून देणे.

(९) राज्य सरकार व खाजगी संस्थांमध्ये वेतन रोजगार मिळवून देणे.

(१०) अंत्योदय विद्यार्थ्यांना १२ वी पर्यंत मोफत शिक्षण देणे, स्कूल युनिफॉर्म, शिष्यवृत्त्या इ. सवलती देणे.

(११) मोफत वैद्यकीय सल्ला, पशुविमा, गृहनिर्मिती, स्टँप डयुटी यामध्ये सवलत, मोफत कायदेविषयक सल्ला इत्यादी सवलती देणे.

असे विविध कार्यक्रम आखून, त्यांची शिस्तबद्ध रचना व अंमलबजावणी करून ग्रामीण गरिबी दूर करण्याचे खास प्रयोग या योजनेद्वारे राबवले गेले आणि म्हणून 'अंत्योदय योजना' ही पूर्वीच्या अनेक योजनांपेक्षा भिन्न वाटते व आदर्शही वाटते.

## योजनेचे मूल्यमापन

**(अ) खेडयांचा समावेश**

राजस्थानमधील खेडयांची संख्या ३३,३०५ एवढी आहे. बहुतेक खेडयांची लोकसंख्या (११,०१० खेडयांची) २०० ते ४९९ या गटातील आहे. अंत्योदय योजनेच्या पहिल्या टप्प्यात ३२,६३८ खेडयांचा समावेश करण्यात आला होता. पण प्रत्यक्षात ३१,३५८ खेडयांमध्ये अंत्योदय कार्यक्रम राबवले गेले. कारण १२८० खेडयांमध्ये एकही अंत्योदय कुटुंब आढळून आले नाही किंवा त्यांनी त्याचा फायदा घेतला नाही. फायदा न घेणारे केवळ अंधश्रद्धेमुळे कर्ज घेणे कमीपणाचे समजून स्वतःची उन्नती साधण्यास तयार नव्हते. राहिलेल्यांपैकी ६६७ खेडी शहरांमध्ये रुपांतरीत झाली. दुसऱ्या टप्प्यात (मार्च १९७९) ३१,४३६ खेडी अंत्योदय कार्यक्रमात आणली गेली. शेवटच्या अहवालानुसार सर्वच खेडयांमध्ये हा कार्यक्रम राबविला गेला होता असा उल्लेख आहे.

शहरांचा या कार्यक्रमात समावेश करण्यात आला नाही. अंत्योदय योजना ही फक्त ग्रामीण गरीबांसाठी होती. त्यामुळे विकास कार्यक्रमाचा प्रामुख्याने खेडयातील सधन लोकांना जो लाभ होत होता तो कमी झाला. राजस्थानमध्ये अशा उच्चभ्रू (Elite) वर्गाचे वर्चस्व अधिक आहे. एकूण लोकसंख्येच्या सुमारे ८१% शेतमजूर,



**पूर्वीच्या अनेक योजनांपेक्षा वेगळी व आदर्श योजना**

५७% शेतकरी व ४४% बिगर शेतकी क्षेत्रातील लोक दारिद्र्य रेषेखाली जीवन जगतात. लोकसंख्येच्या ५००० ते ९९९९ गटातील खेडयांचा समावेश दुसऱ्या टप्प्यात वगळण्यात आला. कारण काही खेडयांची लोकसंख्या वाढल्यामुळे त्यांचा समावेश नगरपालिकांमध्ये होणार होता आणि ज्या खेडयांची लोकसंख्या ५०० पर्यंत होती आणि त्या गावात फक्त ५ कुटुंबेच दारिद्र्यरेषेखाली असतील अशा गावामध्ये आणखीन निवड झाली नाही.

अशा प्रकारच्या ग्रामपातळीवर अथवा प्रांत विभाग पातळीवर ग्रामीण विकास कार्य करणाऱ्या स्वेच्छा सेवा संघटनांपैकी 'सोशल वर्क अॅन्ड रिसर्च सेंटर' यांचे कार्य अंत्योदय योजनेपेक्षाही सरस आहे. श्री. बंकर रॉय हे त्या संघटनेचे संचालक आहेत.

काही खेडयांमध्ये बोगस निवडही झाली होती. पंचायत समितीने यादी मागितली, म्हणून ग्रामसेवकाने आपल्या मर्जीनुसार गावातील गरीब कुटुंबाची नावे कळविल्याची काही उदाहरणे होती !

**ब) कुटुंबाची निवड** – ग्रामीण भागातील निवडीच्या अटी पूर्ण करणाऱ्या कुटुंबाची निवड ही अत्यंत शास्त्रीय, व्यवहार्य आणि काटेकोर होती. प्रथमतः ही निवड अत्यंत कठीण वाटली. परंतु नंतर संबंधित अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देऊन निवडीचे शास्त्र सुलभ केले गेले. अर्थात जिथे ग्रामपंचायती कार्यक्षम आणि सुशिक्षित लोकांच्या हाती होत्या तिथे ही निवड अत्यंत शास्त्रीय बनविण्याचा प्रयत्न केलेला होता. अनेक ठिकाणी सांघिक निवड व्हावी म्हणून बऱ्याच ग्रामपंचायती एकत्र येत होत्या. सर्वच ठिकाणी ग्रामसभा झाल्या असे नाही. पण अगदी पहिल्याच वर्षी कुटुंबांची निवड झाली होती. त्यानतर त्या संख्येमध्ये किरकोळ भर पडली. अंत्योदय योजनेचे सर्व

प्रकारचे यश कुटुंबाच्या निवडीवरच अवलंबून होते खेड्यामध्ये बऱ्याच प्राथमिक शिक्षकानीही या निवडामध्ये आपली सक्रीय भूमिका बजावली होती. १९८१ च्या दुसऱ्या टप्प्यातील निवडीमध्ये १,१२७३३ कुटुंबाचा समावेश होता. पण प्रत्यक्ष ९५,९९४ कुटुंबाना (८०%) या योजनेचा लाभ मिळाला.

निवड केलेली कुटुंबे आणि प्रत्यक्षातील कार्यक्रमाची पूर्तता या मधली तफावत फार नसली तरी ती होतीच. १९७८ मध्ये ही तफावत उदयपूर जिल्ह्याची ९४% होती तर जयसलमेर जिल्ह्याची २०% होती. म्हणजे निवडलेल्यापैकी २०% कुटुंबाना अत्योदय योजनेचा लाभ मिळाला. ही तफावत मार्च १९८१ अखेर १००% (सिरोही व उदयपूर जिल्हे) आणि कमी म्हणजे ६०.३% (डुंगरपूर जिल्हा) एवढी राहिली

राजस्थानमधील एकदरीत दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांपैकी १.६ लाख एवढी कुटुंबे अंत्योदय कार्यक्रमासाठी निवडलेली होती.

**(क) भूमिसहाय्य व शेती विकास कार्यक्रम :** कोणत्याही प्रकारच्या अत्योदय कार्यक्रमाच्या निवडीचे स्वातंत्र्य, निवडलेल्या कुटुंबावरच होते. त्यांच्या इच्छेनुसार त्याना सवलत देत असताना ते त्या सवलतीद्वारे दारिद्र्यरेषेच्यावर येतील काय, हे पाहिले जात होते. मार्च १९८१ अखेर सुमारे ४५,२१२ कुटुंबांना जमिनी देण्यात आल्या. दिलेल्या जमिनीचा सरासरी आकार साधारणत: १ बिगा ते ९ बिग्यापर्यंत होते. सरासरी जमिनीचे क्षेत्र मर्यादित असल्यामुळे मागणी केलेल्या सर्व कुटुंबांना जमिनी देता आल्या नाहीत. तरीसुद्धा भू-धारणेवरील कमाल मर्यादा कायद्यातून सरकारला मिळालेल्या जमिनीपैकी सुमारे १ ३२ लाख हेक्टर जमिनीचे वाटप झाले होते आणि सुमारे ५०% कुटुंबाना जमिनी द्यावयाच्या होत्या. दिलेल्या जमिनी बहुतेक नापीक असल्याने त्या जशाच्या तशा पडून राहिल्या. एस्. एफ्. डी. एल्, एम्. एफ्. ए. एल्. व सी. ए. डी. द्वारा दर हेक्टरला रु. १००० प्रमाणे शेतीविकास कर्ज उपलब्ध करून दिल्यामुळे काही जमिनी सुधारण्याच्या मार्गावर आल्या असल्याचे आढळून आले; परंतु या योजनेखाली फक्त ४०,००० हेक्टर जमिनीना कर्ज दिले गेले. त्यामुळे मर्यादित प्रमाणातच हेतु साध्य झाला.

जमिनी देण्याचे प्रमाण सर्वत्र सारखे नव्हते. सुमारे २३% ते २५% कुटुंबाना प्रत्येकी दोन बिगे जमिनी प्राधान्याने दिलेल्या होत्या. तर १५% ते १६% कुटुंबाना प्रत्येकी ५ बिगे जमिनी दिल्या. अर्थात जमिनीचा कस आणि तिची उपलब्धता लक्षात घेऊनच हे वाटप केलेले होते. राजस्थान कॅनॉल प्रोजेक्टच्या परिसरात कायम वास्तव्य करणाऱ्या कुटुंबांना निवाऱ्यासह पाण्याखालील जमिनी दर कुटुंबाला २ हेक्टरप्रमाणे दिल्या गेल्या होत्या. भूमिसहाय्य व शेती विकास कार्यक्रमाखालील सवलतीचा फायदा उदयपूर जिल्ह्याने अधिक घेतला तर सिकार जिल्ह्याने कमी घेतला.

## आढळलेले दोष, अडचणी

१) या कार्यक्रमाखालील सवलती कमी खर्चाने देता आल्या असत्या; पण त्या दिल्या गेल्या नाहीत. शेतीला पूरक सवलतीचा अभाव असल्याने या कार्यक्रमाची परिणामकारक अंमलबजावणी होऊ शकली नाही.

२) ज्या जमिनी दिल्या त्या बहुतेक नापिकच होत्या.

३) काही ठिकाणी ग्रामीण श्रीमतांनी बिनलागवडीच्या जमिनी लागवडीच्या म्हणून जाहीर केलेल्या होत्या. त्यामुळे सरकारची याबाबतीत दिशाभूल झाली.

४) ज्या जमिनी दिल्या गेल्या त्या बहुतेक मालकी हक्काच्या तंट्यातील होत्या.

५) ज्या जमिनी वाटल्या त्या योग्य माणसाला दिल्या गेल्या नाहीत. अपंग व कसण्यास अपात्र कुटुंबाला अशा जमिनी दिल्यामुळे त्या तशाच पडून राहिल्या.

६) काही कुटुंबानी पडीक जमीन स्वीकारली, कारण त्यांच्या विकासासाठी अनेक सवलती मिळतात म्हणून. उदाहरणार्थ बियाणे, खते, बैल अथवा बैलजोडी, पाणीपुरवठ्याची साधने इत्यादी आणि अशा सवलती दुसऱ्याना विकून टाकल्या.

७) वाटलेल्या बहुतेक जमिनी कोरडवाहू असल्याने पाण्याशिवाय अथवा पावसाशिवाय त्या जमिनीत पिकांची लागवड करणे अशक्यच होते.

८) ग्रामीण भागात अद्यापही जमीनदार, श्रीमत, सावकार याचे वर्चस्व आढळून येते.

९) शेती बाहेर इतर रोजगार साधने उपलब्ध नसल्याने अशा सवलतीचा फायदा घेणाऱ्यांची सख्या अधिक राहिली.

१०) काही कुटुंबाची तर दारिद्र्य हे आपल्या कर्माचे फळ आहे, म्हणून निमूटपणे त्याचे चटके सहन केलेच पाहिजेत अशी समजूत होती. फक्त राजस्थान कॅनॉल परिसरातील कुटुंबे सुखी होती.

११) प्रशिक्षण आणि भेट कार्यक्रमाखाली १७ जिल्ह्यातील २.९ दशलक्ष शेतकरी कुटुंबाना त्याचा फायदा घेता आला.

१२) वरील सर्व प्रकारच्या कार्यक्रमासाठी सरकारकडे मर्यादित निधी असल्यामुळे हवी ती वित्तीय उभारणी करता आली नाही.

**ड) लघुसिंचन :** पाणी पुरवठ्याच्या गरसोयीमुळे आणि पावसाच्या अभावामुळे शेतीला पाणीपुरवठा करणे महत्त्वाचे असल्याने विहीर, पंपसेट, कूपनलिका काढण्यास अत्योदय कुटुंबाना आर्थिक मदत देण्यात आली होती. पण बहुतेक विहिरी हगामी वापराच्या होत्या. कॅनॉल खालील विहिरींना मुबलक पाणी मिळाल्याने याचा फायदा त्या परिसरातील लोकाना जास्त झाला. या योजनेचा फायदा घेणारे फक्त ५% ते ६% लोक होते.

**इ) पशुपालन :** शेतीस पूरक अशी मिश्रित शेती करण्यासाठी आणि सहकाराच्या माध्यमातून समृद्धी साध्य होण्यासाठी आणि रोजगारवृद्धीसाठी या कार्यक्रमाचा फायदा अनेक लोकाना मिळावा या उद्देशाने पशुपालन कार्यक्रम हाती घेण्यात आला होता. यामध्ये शेळ्या, मेंढ्या, कोंबड्या, डुकरे, मासे इत्यादींच्या सगोपनासाठी सवलतीच्या दराने कर्जपुरवठा करण्यात येत होता. जमिनीच्या प्राधान्यानतर पशुपालन कार्यक्रमाचा मोठ्या सख्येने स्वीकार केला होता आणि विशेष म्हणजे पशुपालनाच्या बाबतीत राजस्थान प्रसिद्ध आहे उदा. निंगारी जातीचे बैल, राथी, दारपारकर जातीच्या गाई, मल्लानी घोडे आणि बिकानेरी जातीचे उट, चोकला, माग्रो, मेंढ्या, जक्राना, शिरोडी व मारवारी जातीच्या शेळ्या राजस्थानात आणि जगभर प्रसिद्ध आहेत. विशेषत: हा व्यवसाय पश्चिम राजस्थानमध्ये

जोरात चालतो. यासाठी घेतलेली कर्जे त्याच कारणासाठी बहुतेकांनी वापरलेली होती. कारण सरकारी अधिकारी स्वत. बाजारात जाऊन जनावरे खरेदी करून अंत्योदय कुटुंबाना देत. कुटुंबाची निवडही लक्षात घेतली जात असे. शेळ्या, मेंढ्या घेतलेल्या कुटुंबाचे उत्पन्न वाढत होते. यामुळे रोजगारही वाढला. विशेषतः भूमीहीनाना हे एक वरदानच ठरले.

**ई) कुक्कुट पालन :** राजस्थानमधल्या अजमेर, अल्वारा, भरतपूर, जयपूर, टोंक, कोटा, उदयपूर, गगानगर आणि जोधपूर इत्यादी जिल्ह्यामध्ये हा व्यवसाय प्रसिद्ध आहे. कारण या भागात बाजारपेठांची उपलब्धता आहे. विशेषतः जी खेडी शहराला जवळ होती अथवा खेड्यातील सोसायटयाद्वारा अंड्याची खरेदी होत होती अशा भागात ह्या धंद्याने चांगला जम बसवला होता.

**फ) ग्रामीण कुटीर उद्योग :** राजस्थान हा औद्योगिकदृष्टया अत्यंत मागासलेला प्रांत आहे. ग्रामीण भागामध्ये रोजगार निर्मिती करण्याचे एकमेव साधन म्हणून खादी व ग्रामोद्योगांची कामगिरी उल्लेखनीय आहे. १९७९–८० च्या अखेर खादी उद्योगाने १३.५० कोटी व ग्रामोद्योग बोर्डाने १२०० कोटी रुपये किंमतीचे उत्पादन केले. याबरोबरच रोजगारवृद्धीही अनुक्रमे १,३३,००० व ६१,५०० (कायम व अशकालीन मिळून) पर्यंत झाली. विशेषतः ग्रामीण कलाकारांना यामुळे वरदान मिळाले. परंतु अपेक्षेपेक्षा या कार्यक्रमाला अपयशच पदरी पडले. पहिल्या टप्प्याच्या १५००० कुटुंबाना रोजगारसंधी उपलब्ध करून देण्याची तरतूद होती. पैकी २९७९ अखेर ११,६६७ कुटुंबाना त्याचा फायदा घेता आला. यासाठी ३२ ८२ लाख रुपये खादी कार्यक्रमासाठी आणि ४.२५ लाख रुपये ग्रामोद्योगासाठी खर्च करण्यात आले. बहुतेक कुटुंबानी टेलरिंग, धुरी, मॅट, डबे तयार करणारे व्यवसाय निवडलेले होते. खादी कार्यक्रमाखाली बहुतेक कुटुंबाना चरखे, खरग वगैरे देण्यात आले होते.

पहिल्या वर्षी (१९७७–७८) या कार्यक्रमाखालील लक्षापैकी (Target) ९७.२२% कुटुंबे आणि ८७.३४% कर्जे देऊन पूर्ण करण्यात आली होती. तर शेवटच्या वर्षी (मार्च १९८१) या कार्यक्रमाखालील लक्ष्यापैकी फक्त २६.९१% कुटुंबाना १६ ७३% कर्जपुरवठा करण्यात आला. म्हणजे सुरुवातीचा उत्साह शेवटपर्यंत राहिलाच नाही हे स्पष्ट होते.

**(ग) रोजगार कार्यक्रम :–** अंत्योदय कुटुंबांना रोजगार उपलब्ध करून देणे ही या कार्यक्रमाची महत्त्वाकांक्षी योजना होती. अनेक सरकारी, बिनसरकारी आणि निमसरकारी संस्थामध्ये अंत्योदय कुटुंबातील लोकाना प्राधान्याने वेतन रोजगार मिळवून दिले गेले होते. बहुतेकाना हेल्पर, चौकीदार अशा चतुर्थ श्रेणीतील नोकऱ्या देण्यात आल्या. मार्च १९८१ अखेर सुमारे ४०,३०८ लोकाना विविध नोकऱ्या उपलब्ध करून दिल्या होत्या; परंतु मूळ लक्ष्य मात्र २,०७,३७० लोकाना रोजगार देऊ असे होते. ते मात्र साध्य झाले नाही.

**(ह) पेन्शन व इतर सामाजिक सेवा :–** वृद्ध अंत्योदय कुटुंबाना निवृत्ती वेतन देणे हा एक महत्त्वाचा प्रथम प्राधान्य क्रमाक कार्यक्रम होता. निराधार, अपंग, आणि उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही अशा वृद्ध व्यक्तींना ४० रुपये आणि जोडप्याना ६० रुपये वेतन दिले जात होते. पहिल्या ४ महिन्यामध्ये सुमारे १७,७६२ व्यक्तींना ही सवलत लागू केली. सहा महिन्यानंतर ही संख्या २२,८२० झाली. नंतर फारशी वाढ झाली नाही. चार वर्षात सुमारे ३९,००० व्यक्तींना निवृत्ती वेतन द्यावे असे ठरले होते पण यापेक्षा जास्त म्हणजे सुमारे ४७,२०२ पर्यंत ह्या सवेत वाढ झाली.

याशिवाय जानेवारी १९७९ अखेर सुमारे ४०,००० कुटुंबाना मोफत वैद्यकीय सल्ला दिला गेला. मात्र मोफत कायदाविषयक सल्ला कोणीही घेतला नाही. अंत्योदय कुटुंबाना दिलेल्या गाई, म्हैशी, शेळ्या, मेंढ्या याची वैद्यकीय तपासणीही मोफत केली जात होती. गृहनिर्मितीसाठी सरकारने ८,५४,००० चौरस फूट जमीन उपलब्ध करून दिली होती. १९७८ अखेर ६००० घरेही बांधून दिली गेली होती.

**(य) कर्जे :–** अंत्योदय कुटुंबाना दिल्या जाणाऱ्या आर्थिक सवलतीची रचना फारच वेगळी होती. सरकारी पैसा या कार्यक्रमासाठी कमी प्रमाणात वापरला गेला. वार्षिक ३०० कोटी रुपये वित्तीय मदत अंत्योदयासाठी राखून ठेवली गेली होती. अंत्योदय कुटुंबाना कर्जे देणाऱ्या संस्थामध्ये प्रामुख्याने सहकारी बँका, व्यापारी बँका, खादी बोर्ड इ. चा. समावेश झाला होता. शिवाय सरकार विविध प्रकल्पासाठी अर्थसहाय्य करत होते.

कर्जे देण्याचे प्रमाण झुनझुन व कोटा जिल्ह्यात कमी प्रमाणात आढळून आले. कुटुंबाच्या, धर्म, पथ, जातीच्या प्रतिष्ठेपाठी काहीनी कर्जे नाकारली. साधारणपणे दिलेल्या कर्जाचा विनियोग चांगला झाला असे म्हणता येणार नाही. वाहतुकीची साधने कमी असल्यामुळे प्रत्येक खेड्याला बँक रिकव्हरी ऑफिसरला भेटता आले नाही. त्यामुळे काहीची थकबाकी वाढतच गेली.

कुटुंबाना अल्प, मध्यम व दीर्घ मुदतीचा कर्जपुरवठा होत होता. अल्पकालीन व दीर्घकालीन कर्जे कमी प्रमाणात घेतल्याचे आढळून आले. मध्यम मुदतीची कर्जे परतफेडीस सुलभ असल्याने त्याचा स्वीकार अनेकानी केला. रिझर्व बँकेच्या सवलतीच्या व्याजदरामध्ये भिन्नता असल्याने सहकारी बँकाकडून कर्जे कमी प्रमाणात घेतली गेली. सवलतीचा व्याज दर व्यापारी बँकांसाठी ६% व सहकारी बँकासाठी १४% होता. नंतर हा दर सहकारी बँकासाठी कमी केला गेला. तरीसुद्धा ग्रामीण भागात सावकाराचे वर्चस्व असल्याने अशा कर्जाचा फायदा त्याना घेता आला नाही कर्जे मंजूर करणे आणि ती प्रत्यक्ष वाढविणे यामध्ये वेळ वाया जातो. १९८३ अखेर ८१.४५% मजूर कर्जाचे वितरण झाले होते.

**(ज) प्रशासन :–** अंत्योदय योजनेचे कार्य सुलभ व्हावे म्हणून जिल्हा पातळीवरील नियोजन महत्त्वाचे मानण्यात आले होते. शिवाय राज्यपातळीवरही आराखडा तयार करण्यासाठी तज्ञाची समिती नियुक्त केली होती. १९८० नतर सरकार बदलल्याने अंत्योदय कार्यक्रमाकडे अधिकाऱ्याचे दुर्लक्ष झाले आणि 'पिछले को पहला' या नावाने २० कलमी कार्यक्रमातून राबविण्याचा सरकारचा उपक्रम सुरू झाला.

(१) १९७८ पर्यंत राज्यातील उदयपूर, जोधपूर, बिकानेर, अल्वारा, बनसवरा, टोंक, जलोर, झुनझुन व सिरोही इ. जिल्हे राज्य सरासरीच्या उच्च पातळीवर होते. पुढे यापैकी जलोर व झुनझुन हे

जिल्हे सरासरीच्या खाली गेले.

(२) एकंदर १,६०,३६८ कुटुंबे दारिद्र्यरेषेखाली होती.

(३) १९७९ अखेर १००% लक्ष्ये पूर्ण करणारे जिल्हे फक्त सात होते. सिरोही, उदयपूर, जोधपूर, अल्वारा, टोंक, बनसवरा, सवाई माधवपूर हे सात जिल्हे. १९८१ अखेर अशा जिल्ह्यांची संख्या फक्त ३ च (सिरोही, उदयपूर, टोंक) राहिली होती.

(३) एकूण अंत्योदय कुटुंबांपैकी सर्वात जास्त म्हणजे २४.०१% लोकांना निवृत्ती वेतन दिले गेले होते आणि १८.६४% लोकांना जमिनी वाटल्या होत्या.

(५) फायदा घेणाऱ्या अंत्योदय कुटुंबांमध्ये मोठी संख्या (३७७४) उदयपूर जिल्ह्याची तर सर्वात कमी फायदा घेणाऱ्यामध्ये झुनझुन (१०) जिल्ह्याची होती.

(६) जयपूर व अल्वारा जिल्ह्याला जास्त कर्जे दिली गेली. (अनुक्रमे ३७१७ व ३१०० प्रकरणे) तर स. माधवपूर (८३७) व बिकानेर (३१) या जिल्ह्यांना कमी कर्जे वाटली होती.

(७) काही कुटुंबांची निवड संशयास्पद होती.

(८) वित्तीय तरतूद अत्यंत रेंगाळणारी आणि अपुरी होती.

(९) शेळ्या, मेंढ्या व रोजगार कार्यक्रम स्वीकारलेल्या कुटुंबांचे दरडोई उत्पन्न पूर्वीपेक्षा वाढत असल्याचे आढळून आले.

(१०) कॅनॉल परिसरातील कुटुंबांचे राहणीमान सुधारत होते.

(११) अंत्योदय कुटुंबांनी उत्पादन केलेल्या वस्तूंच्या विक्रीची समस्या शेवटपर्यंत सुटलेली नव्हती.

(१२) कार्यालयीन व विभागीय सलोखा सुरुवातीसारखा शेवटपर्यंत राहिला नव्हता.

भारतामध्ये समाजवादी समाजरचना प्रस्थापित करण्यासाठी लोकजागृती, समाजविकासातून आर्थिक विकास साधण्यासाठी ही योजना काटेकोरपणे राबवली असती तर महात्मा गांधींचे खेड्यांविषयीचे स्वप्न पूर्ण करता आले असते. पण दुर्दैवाने ही योजना ऑगस्ट १९८१ ला बंद केली गेली. १९८१ पर्यंत तरी ही योजना इतर सर्व भूतकालीन योजनांपेक्षा निश्चितच फायदेशीर ठरली होती. ही योजना बंद केल्यामुळे देशातील लहानात लहान माणसाला दिलेले आश्वासन पूर्ण करता आले नाही, अशी काहींनी टीका केली. तरीसुद्धा भारतात सद्यस्थितीत अशा योजनांची आवश्यकता आहे हे निर्विवाद आहे. सध्या भारतात धर्म, जातीभेद यासारख्या शक्ती वाढत आहेत त्यामुळे राष्ट्रीय ऐक्य व शांतता धोक्यात येत आहे.अशा वेळी अंत्योदय योजनाच ग्रामीण प्रश्न सोडवू शकेल. □

---

पुस्तके

# विविध साहित्यप्रकारांचा वैशिष्ट्यपूर्ण वेध

वि. शं. पारगावकर

**प्रा.** गो. म. कुलकर्णी यांचे ‘ मराठी साहित्यातील स्पंदने ’ हे साहित्य समीक्षात्मक पुस्तक अनेक दृष्टींनी वैशिष्ट्यपूर्ण असे आहे. त्यामध्ये साहित्याच्या तत्त्वज्ञानावर विशेष भर दिलेला आहे. समीक्षा ही तत्त्वप्रधान जशी असते, तशीच ती आस्वादप्रधानही असते. विशिष्ट प्रकारच्या कलाकृतीचा एखादा रसिक समीक्षकाच्या भूमिकेमधून जेव्हा परामर्श घेतो, तेव्हा ती आस्वादक समीक्षेच्या पातळीवर गेलेली असते. अशा समीक्षेचे गुणधर्म, स्वभाव आणि मर्म गो. मं. नी ‘जास्वंद’ या माधव आचवल यांच्या समीक्षा ग्रंथाच्या निमित्ताने तपासलेले आहेत. आचवलांचे हे आस्वादक समीक्षा लेखन, त्याविषयी गो. म. लिहितात, तेव्हा प्रथम सुरुवातीलाच ते म्हणतात, ‘जास्वंद’ हा श्री. माधव आचवलांच्या स्फुट समीक्षणात्मक लेखांचा संग्रह, आचवलांचे समीक्षालेखन त्यातील वैशिष्ट्यपूर्णतेमुळे आरंभापासूनच केवळ रसिकमान्यच नव्हे, तर रसिकतेचे परिपोषण करणारेही ठरले आहे.’

या ठिकाणी अशा आस्वादक समीक्षेमध्ये ‘रसिकता’ या संकल्पनेला विशेष महत्त्व प्राप्त झालेले आहे. रसिकता हा गुण व्यक्तीसापेक्ष आहे. एखाद्या कलाकृतीकडे जसे रसिकतेने पाहाता येते तसेच एखाद्या प्रणयक्रीडेकडेही रसिकतेने पाहाता येते आणि निसर्गाच्या एखाद्या विभ्रमाकडेदेखील रसिकतेने पाहता येते. म्हणजे असे की, कलावंतनिर्मित कलेकडे, प्राणीनिर्मित प्रत्यक्ष प्रणयक्रीडा आणि निसर्गनिर्मित विभ्रम या तिन्हीकडे देखील रसिकतेने पाहता येते. म्हणजेच ही रसिकता मानवी व्यक्तिमत्वाला लाभलेल्या एका संपन्नतेतून निर्माण झालेली असते. कुठल्या तरी एखाद्या ठाम तत्त्वावर ती केवळ आधारलेली नसते. मात्र अशा काही तत्त्वांचा परिपाक त्या व्यक्तित्वात समाविष्ट झालेला असतो, असे निश्चयाने म्हणता येईल. रसिकतेचे रूप सिद्ध होतानाच त्यामध्ये काही स्थिर परिमाणांचा (standards) समावेश झालेला असतो. अशा परिमाणाचा अंतर्भाव रसिकाच्या व्यक्तिमत्त्वात नसेल, तर एकाच्या रसास्वादाचा आविष्कार दुसऱ्यापर्यंत पोहोचणारच नाही !

आणि मग चि. त्र्यं. खानोलकरांवरील लेखात सुरुवातीलाच माधव आचवल जे वाक्य लिहितात, ‘खानोलकरांवर लिहिणे कठीण आहे, कारण त्यांचे लिखाण हा सावल्यांचा खेळ आहे. दिवे लागणीला, संधिप्रकाशातला, अंधुक, अस्पष्ट व एकमेकात मिसळलेल्या सावल्यांचा खेळ ! आता एखाद्या कलाकृतीच्या समीक्षणाच्या संदर्भात–सावल्यांचा खेळ–या विधानास एरवी काय अर्थ आहे ? परंतु माधव आचवलांचे हे विधान आस्वादनाच्या संदर्भात विलक्षण अर्थगर्भ आहे असे आपण मानतो. इतकेच नव्हे तर आचवलांच्या अशा विधानांच्या साह्यानेच आपण खानोलकरांच्या कलाकृतीशी आणि तिच्यामधील आशयगर्भ सौंदर्याशी अधिकाधिक जवळीक साधीत जातो हेही मान्य व्हावे.

माधव आचवल यांच्या या प्रकारच्या समीक्षेविषयी म्हणूनच गो. म. कुलकर्णी म्हणतात, 'यामुळे ही समीक्षा केवळ रूपवादी किंवा आशयवादी न रहाता या दोघांचा मेळ साधणारी होते' (पृ ११४) येथे गो. म. रूपवादी आणि आशयवादी असे दोन समीक्षेचे प्रकार मानतात. त्याविषयी थोडे स्पष्टीकरण करणे आवश्यक वाटते. या दोन समीक्षा प्रकाराचा विचार कालाच्या संदर्भातच केला पाहिजे रूपवादी आणि आशयवादी या दोन्ही समीक्षाप्रकारांकडे आजच्या कलाकृतीच्या संदर्भात पाहिले तर त्या दोन्ही प्रकारांमध्ये अपूर्णता दिसते. आजच्या कलाकृतीकडे आपण जेव्हा पहातो तेव्हा वरील दोन्ही समीक्षाप्रकार तेथे तोकडे पडतात असे दिसते. आशय–अभिव्यक्ती आणि आकार या तिन्ही घटकाचे आजच्या कलाकृतीमध्ये मीलन झालेले असते. उदा. मोनालिसाचा आशय–अभिव्यक्ती आणि आकार, ते चित्र पहाताना वेगवेगळे काढता येत नाहीत या तिन्हीचा एकत्रितपणेच विचार करावा लागतो आणि त्या तिन्हीचा मिळूनच एक परिणाम अभिप्रेत असतो. पुढे जाऊन असेही म्हणता येईल की या परिणामातच सौंदर्य असते आणि सार्थकताही असते. या विचाराचा अधिक तपशीलवार विचार येथे अप्रस्तुत आहे. येथे जाता जाता एवढेच नमूद करून ठेवणे आवश्यक आहे की माधव आचवल यांच्या समीक्षा पद्धतीचे हे मुख्यांग आहे. आपल्या माधव आचवल यांच्या समीक्षेवरील लेखात गो. मं. नी त्यांच्या या वैशिष्ट्याचा मार्मिक परामर्श घेतलेला आहे. ते किती मार्मिकतेने आचवल यांच्या समीक्षेकडे पहातात याची गो. मं. नी दिलेली खालील उदाहरणे पुनरुक्त करण्याचा मोह होतो.

## मराठी संवेदनेचा शोध

'प्रत्येक प्रतिभाशाली कलावंत आपण त्याच्याकडे कसे पाहावे हे स्वत:च अप्रत्यक्षपणे सुचवीत असतो.'

'काव्याची भाषा ही सामान्य भाषेच्या अंतर्मनाची भाषा असते.'

'जी. ए. चे कथाविश्व उष्णकटिबंधातल्या एखाद्या जगलासारखे वाटते.'

'भावकाव्य हे स्वभावत:च वैयक्तिक अनुभवाची विशिष्टता शोधत जाणारे काव्य असते.'

'पूर्ण यशस्वी कलाकृती या कलावंतापेक्षा मोठ्या असतात.'

वरील निरीक्षणावरून देखील माधव आचवल यांच्या समीक्षेचा स्वभाव सहज कळतो.

मात्र'पूर्ण यशस्वी कलाकृती या कलावंतापेक्षा मोठ्या असतात.' हे विधान मात्र विवाद्य वाटते. कोणतीही कलाकृती ही तिच्या निर्मात्यापेक्षा मोठी असू शकत नाही. अर्थात येथे 'पूर्ण यशस्वी कलाकृती' असा शब्दप्रयोग आलेला असल्यामुळे वरील विधानाची विवाद्यता जोखता येणे शक्य वाटत नाही जगात 'पूर्ण यशस्वी कलाकृती' संभवते काय ? आणि अशी कलाकृती जोखण्याचे मानदंड काय ? असे प्रश्न मी येथे उपस्थित करून ठेवतो !

'मराठी संवेदनास्वभाव आणि मराठी साहित्य' या लेखात मराठी संवेदनाचा शोध महाराष्ट्राच्या ऐतिहासिक, भौगोलिक आणि सांस्कृतिक धारणेच्या अगानी गो. मं. नी घेतलेला आहे विशेषत. मराठी काव्यप्रकाराच्या संदर्भात त्याचा हा शोधप्रयत्न असला, तरी काही ठिकाणी त्यांनी मराठीतील ललित साहित्य प्रकाराचा आणि गद्य साहित्याचा देखील मागोवा घेतला आहे. कलावंताच्या संवेदनेचा शोध घेताना 'मऱ्हाठी संस्कृतीचा' आणि तिच्या विविध अंगोपांगाचा विचार त्यांनी येथे सविस्तरपणे केलेला दिसून येतो. संस्कृतीतून स्वभाव आणि स्वभावातून कला निर्मिती असा त्यांच्या विचाराचा प्रवास आहे. त्यातही विशेषत: काव्यनिर्मितीच्या प्रक्रियेविषयीच त्यांनी हा शोध घेतलेला आहे त्यासबंधात त्याचे म्हणणे असे, 'संवेदनेच्या विश्वात कवितेला विशेष महत्त्व असल्यामुळे मराठी कवितेला केंद्रस्थानी कल्पूनच पुढील काही नोंदी केलेल्या आहेत.' (पृ. २५) मराठी माणूस, मराठी स्वभाव, मराठी संवेदना याचा नेमका अर्थ सांगण्यासाठी त्यांनी मराठवाडा, विदर्भ, कोकण, गोमंतक यासारख्या प्राकृतिक भेदाकडेही त्यांनी लक्ष दिलेले आहे. भिन्न भिन्न प्रादेशीक गट, त्यातही प्राचीन आणि अर्वाचीन असे प्रकारभेदही त्यांनी विचारात घेतलेले आहेत. शिवाय कोणत्याही समाजाचा संवेदनास्वभाव कालपरत्वे कमी अधिक गतीने बदलत असतो. म्हणजेच संवेदना गतिशील आहे, तसाच तो परिवर्तनशील आहे याचीही जाणीव ते करून देतात. साहित्य किंवा काव्य ही सगळी तशी निसरडीच आहे याचीही त्यांना जाणीव आहे. तरीही मराठी साहित्याच्या संदर्भात मराठी संवेदनास्वभावाचा वेध घेण्याचा ते या लेखात प्रयत्न करतात. या अनुषंगाने त्यांची जी निरीक्षणे आहेत ती फार महत्त्वपूर्ण वाटतात. विषयाच्या विस्ताराला मर्यादित करण्यासाठी ते भूगोल आणि इतिहास ही या परामर्शाची दोन प्रमुख साधने मानतात. त्यातले एक स्थिर आणि दुसरे चर आहे.

## दलितत्वाचे वेगळेपण

महाराष्ट्र हा भौगोलिक दृष्ट्या उत्तर आणि दक्षिण भारताला जोडणारा दुवा आहे. त्यामुळे आघात–प्रत्याघाताच्या लाटामध्येच महाराष्ट्राची वसती आहे असे म्हटले तरी चालेल महाराष्ट्राच्या या भौगोलिक स्थानामुळेच मराठी संवेदनेत समन्वयाला, सतुलनाला प्राधान्य प्राप्त झालेले आहे आणि या समन्वयशीलतेमुळेच, महाराष्ट्राच्या संवेदनस्वभावात भावनेपेक्षा बुद्धीला, विचाराला जीवनव्यवहाराच्या उपयुक्त अंगाला अधिक प्राधान्य लाभले आहे ते म्हणतात, 'माणूस म्हटला की, भावनात्मकता आलीच मराठी लोकगीतातून त्याचे चागले प्रत्यंतरही येते. तथापि उचबळून जाणे, थरारणे हे महाराष्ट्राच्या एकंदर वृत्तीप्रवृत्तीत फारसे बसत नाही. मराठी वृत्तीत आकुलतेपेक्षा रोखठोकपणा, तिखटपणा अधिक आहे; परंतु असे असले तरी ते या संबंधात दुसरेही एक ऐतिहासिक मत नोंदवितात. 'या धारणेबरोबरच महाराष्ट्राला समन्वयशील न मानता एकांडा, भांडकुदळ असे म्हणणारा पक्षही फार जुन्या काळापासून प्रचलित असल्याचे दिसते' महाराष्ट्राचा हा जो दुसरा विशेष आहे त्याबद्दल विचार करताना महाराष्ट्राच्या डोंगराळपणाकडे, कोरडवाहूपणाकडे आणि त्यामुळे निर्माण होणाऱ्या आर्थिक ताणाकडे लक्ष वेधावे लागते

या संदर्भात गो. मं. नी गोविंदाग्रजांच्या 'राकट देशा कणखर देशा दगडांच्या देशा'

कवितेची आठवण करून दिली आहे. तसेच कवी यशवत स्वत.चा परिचय 'दऱ्याखोऱ्यातला कवी' अशी करुन देत असत याचाही उल्लेख केला आहे. महाराष्ट्राच्या या कणखर जडण–घडणीचा शोध घेताना गो. मं. नी महाराष्ट्रातील दुर्ग, घाट, गनिमी युद्धतंत्र, कोरीव लेणी, ज्योतिर्लिंग, देवस्थाने (त्याची जडणघडणसुद्धा) डफ तुणतुण्याची गाणी आणि कुस्त्याचे फड याचा उल्लेख केला आहे. तसेच व्यक्तीमध्ये शिवछत्रपती, रामदास–तुकाराम किंवा लो. टिळक या विभूतीचा विचार करताना टणकपणा आणि रोखठोकपणा,व्यवहार याचे प्रत्यंतर कसे येते हे दाखविले आहे.

गो. म. कुलकर्णी यानी या मराठी सवेदना स्वभावाचा वेध, रांगडेपणाची कारणे (खडकाळ प्रदेश) आणि भौगोलिक दृष्टीने समन्वयवाद अशा दुहेरी भूमिकेवरून घेतलेला आहे. मात्र असे करीत असताना त्यांची तात्विक दृष्टी सावध आहे. कारण त्या संदर्भात ते एके ठिकाणी म्हणतात, 'प्राचीन वा मध्ययुगीन महाराष्ट्राचा विविधागी तपशीलवार इतिहास या दृष्टीने साकार झाला, तरच अधिक बोलणे शक्य होईल.' (पृ. २८)

अशा समन्वयभावनेमधून जे साहित्य मराठीत निर्माण झाले (गो. मं. च्या दृष्टीने विशेषत: काव्य) त्यांच्या अनुषगाने सौंदर्यसवेदनेचे पैलू देखील मराठी साहित्यात दिसतात. उदा. गौळणी, आरत्या, झिम्मा–फुगडीची–भोडल्याची गाणी, स्त्रीगीते यांचा उल्लेख ते करतात. वरील सर्व प्रकाराचा योग्य तो संशोधनात्मक विचार झाल्यानंतर रामदासाच्या कला वा निसर्गविषयक उत्कट भव्य सवेदनेचा आणि त्या अनुषगाने साहित्यातील सौंदर्यविश्वाचा उगम शोधता येईल असा गो मं.चा विश्वास आहे. एकंदरीनेच मराठी सवेदनेविषयीचा हा विचार नवा वाटतो. मात्र या विचाराचा उगम आणि विस्तार न्याहाळताना बऱ्याच तात्त्विक समस्या उद्‌भवतात याचीही जाणीव ठेवणे आवश्यक आहे. केवळ मराठी भाषेचा विकास, प्रवास आणि तिचे रुप भौगोलिक परिस्थितीवरुन न्याहाळता येणार नाही. तसेच ती भाषा बोलणारे मराठी मन आणि त्यामधून जन्म पावलेली मराठी प्रतिभा आणि तिच्यातून निर्माण झालेल्या कलाकृती याविषयीचे विवेचन तर्कशुद्ध आणि तात्त्विक भूमिकेवरून करणे अवघड आहे.

वरील सर्व पातळ्यावरून मराठी सवेदनेविषयीचा एक अभिनव आलेख काढताना गो. म. आपली एक खतही या लेखात नोंदवितात. ते म्हणतात, 'मराठी साहित्यसवेदन सपन्न होण्याच्या दृष्टीने मराठी लेखकाच्या अनुभवाची व्याप्ती आणि खोली म्हणावी तशी वाढलेली नाही; ती वाढली पाहिजे, तिला सखोल चिंतनशीलतेची जोड मिळाली पाहिजे'

'दलित साहित्य : एक चिंतन' या लेखात गो. म. कुलकर्णी यांनी दलित साहित्याच्या प्रकृतीची आणि प्रवृत्तीची सर्वांगीण चिकित्सा केली आहे. दलित साहित्याची महाराष्ट्रातील निर्मिती आणि तिच्या पाठीमागचा ओज याचा उगम डॉ. आंबेडकर यांच्या नेतृत्वाशी सलग्न आहे. डॉ. आबेडकर हे जरी अखिल भारतीय नेतृत्व होते तरी या नेतृत्वाचा उगम महाराष्ट्रात झालेला आहे त्याच्या चळवळीने विशेषतः महाराष्ट्रातील दलित चळवळीला उत्तम प्रेरणा मिळाली. इतकेच नव्हे तर साहित्य निर्मितीच्या दृष्टीने पहिले तर भारतातील इतर प्रातातील दलित साहित्याच्या मानाने महाराष्ट्रातील दलित साहित्याची निर्मिती आणि त्याचा दर्जा उल्लेखनीय आहे चरित्र, आत्मचरित्र, काव्य, कादंबरी, कथा, नाटक, एकाकिका या सर्वच साहित्यप्रकारात मराठीतील दलित साहित्याने स्पृहणीय प्रगती केलेली आहे. विशेषत: उठून दिसणाऱ्या साहित्यप्रकारात आत्मचरित्र आणि काव्य याचा दर्जा विशेष उल्लेखनीय आहे. परतु या साहित्याचा उगम विद्रोहातून झालेला असल्यामुळे त्याला काहीसे प्रचारी आणि त्याचा आविष्कार तत्कालीन उद्रेकातून उदय पावलेला असल्यामुळे स्थिर वाङ्मयीन निकषावर ते पूर्णपणे कसोटीला उतरेल असे वाटत नाही, ही गो. मं. ची शंका आणि भीती रास्त आहे. गो. म. कुलकर्णी यानी दुसऱ्या एका संदर्भात असे म्हटले आहे की, 'सर्वच क्षेत्रातील दलितत्वाचे सपूर्णपणे निर्दलन व्हावे, यासाठी एका बाजूने कटिबद्ध झालेले हे साहित्य, दुसऱ्या बाजूने स्वत:ची वेगळी मशाल या प्रकारे पेटवीत ठेवते, हे वेगळेपण पुसून गेल्यास दलित जाणिवेचे अग्र तीक्ष्ण रहाणार नाही अशी या साहित्याच्या अध्वर्यूंना भीती वाटत असावी' ही त्यांची शका अनेक स्तरावर दलित साहित्याची चिकित्सा केल्यास योग्यच म्हणावी लागेल.

## नवे सौंदर्यशास्त्र ?

दलित साहित्य म्हणजे दलितानीच दलित जीवनावर लिहिलेले साहित्य अशा या तोकड्या व्याख्येचा अट्टाहासही तेच दर्शविते. या सदर्भात प्रा. माटे याचे 'उपेक्षिताचे अंतरंग' देखील दलित साहित्य ठरत नाही. या विचाराचा उहापोह गो. म. नी आपल्या लेखात, साहित्याच्या स्वभावाचा आणि त्याच्या निर्मिती मागील तत्त्वाचा ऐतिहासिक मागोवा घेत घेत तर्कशुद्ध पद्धतीने केलेला आहे. दलित साहित्यिकाना त्याच्या साहित्यासाठी वेगळे साहित्यशास्त्र हवे ही जी मागणी दलित साहित्यातील ज्येष्ठ आणि श्रेष्ठ व अनुभवी साहित्यिकाकडून देखील जेव्हा येते, तेव्हा तिचा खोलवर विचार करणे क्रमप्राप्त ठरते. तसा तो करताना गो. मं. नी या प्रश्नाच्या दोन्ही बाजू वाचकांसमोर ठेवल्या आहेत आणि या दोन्ही बाजूवर विचार करताना हजारो वर्षापासूनचा साहित्याचा आणि त्यामागील मूलगामी तत्त्वाचा विचार माडला आहे. ते म्हणतात, '.. सकृत दर्शनीच जाणवते ते असे की, दलित साहित्याच्या सास्कृतिक भागाची आजवर जेवढी चर्चा झाली आहे, तेवढी या साहित्याच्या साहित्यिक अगाची झाली नाही' एवढे सांगून मग ते साहित्यासबधी काही मूलभूत प्रश्न उपस्थित करतात 'आजचे साहित्य साहित्यगुणाच्या दृष्टीने कोणत्या स्तरावर आहे? या साहित्याने घेतलेला क्रातीचा वसा साहित्याच्या माध्यमातून किती प्रमाणात आणि कोणत्या प्रकारे सिद्धीस गेला? साहित्याचा आणि सामाजिक क्रातीचा अन्योन्य सबंध कोणत्या प्रकारचा असतो? प्रतिबद्धता, नकार, विद्रोह याचा साहित्याशी केव्हा, कोणत्या प्रकारे संबंध येतो?' असे प्रश्न उपस्थित करून गो. म. कुलकर्णी म्हणतात, यांसारख्या, या अनुषंगाने निर्माण होणाऱ्या विविध प्रश्नाचा पुरेसा खोलवरपणे आजवर विचार झालेला नाही. या प्रकारच्या विचारास, उपक्रमास कलावत या नात्याने लागणारी उत्सुक मन:स्थिती दलित लेखकात

तेवढया प्रमाणात अद्यापी तरी रूजलेली नाही. या साहित्याचे केवळ ढोबळ सांस्कृतिक अगच मुल्यत्वाने ते किंवा त्याचे समर्थक पुनः पुन्हा आवर्जून पुढे करतात. कलात्मक अंगाच्या चर्चेस ते सहसा प्रवृत होत नाहीत.

वेगळया साहित्य शास्त्राच्या सदर्भातही गो. मं.नी खालाल काही महत्त्वाचे प्रश्न उपस्थित केले आहेत...स्वतत्र साहित्यशास्त्र खरोखर केव्हा संभवते ? प्रचलित साहित्यशास्त्रात का बदल होतो ? त्या बदलाचे स्वरुप काय ? साहित्यशास्त्रातील सारेच घटक परिवर्तनशील असतात, की काही भाग अपरिवर्तनशील मानावा लागतो ? दलित साहित्याच्या आजच्या स्वरुप विचाराच्या दृष्टीने प्रचलित सौंदर्यशास्त्र खरोखर पूर्णतया निरस्त झाले आहे, असे दिसते काय ? दलित लेखकाच्या साहित्यलेखनात प्रचलित साहित्यमूल्याना काहीच स्थान नाही का ? दलिताचे आजचे लेखन प्रचलित साहित्यव्यवस्थेला धरूनच नाही का ? नवे सौंदर्यशास्त्र स्वीकारावयाचे झाल्यास त्याचा तात्त्विक पाया कोणता ? सौंदर्यशास्त्राचा पुनर्विचार करावयास लागणारी गतिशीलता तत्त्वचिंतन आणि प्रायोगिकत्व आजवरच्या दलितसाहित्याने किती प्रमाणात प्रत्ययकारीपणे प्रकट केले आहे ? अशासारखे प्रश्न दलित साहित्याचा सर्वांगीण विचार करण्यास उपयुक्त आहेत.

सौंदर्याच्या सकल्पनेतील काही अंश देश—काल—परिस्थिती सापेक्ष असतो. असे जरी गो. मं. साहित्यातील सौंदर्य संकल्पनेच्या सदर्भात म्हणत असले, तरी संपूर्ण दलित साहित्य निर्मितीच्या प्रक्रियेत याचा विचार करता येणार नाही. देश, काल, परिस्थितीनुसार आणि बदलत्या सांस्कृतिक सकेतामुळे अभिरुचीमध्ये काही किरकोळ बदल होत असले तर त्यामुळे मूळ स्थायी सौंदर्यभावनेतील तत्त्वे बदलत नाहीत. एखाद्या प्रक्षुब्ध माणसास उगवतीचे सौंदर्य भावत नसेल तर तो दोष मूळ सौदर्य—नियमाचा असत नाही. तो ती पाहणाऱ्या व्यक्तीच्या वृत्तीमधील दोष ठरतो. तसेच एखाद्या दलित लेखकाने एखादी साहित्यकलाकृती निर्माण केली तर तिच्या आस्वादासाठी सौंदर्यनिकषे बदलण्याचे कारण नाही. यासाठी एक उदाहरण असे देता येईल की दलिताच्या अंगणात त्याने गुलाबाचे कलम केले. तर त्याला आलेल्या फुलामधील *सौंदर्य आस्वादण्यासाठी वेगळया सौंदर्य*शास्त्राची गरज नाही ! साहित्य कलानिर्मिती जी होते— कथा, काव्य, कादंबरी, नाट्य वगैरे ती मानवी जीवनातील विशिष्ट भावाकृती द्वारे निर्माण केलेल्या ताणतणावामधूनच. या भावाकृतीमधील ताणतणाव मग कोणीही निर्माण केलेले असोत आणि कोणत्याही जीवनामधून निर्माण केलेले असोत. दलिताने दलित जीवनामधून निर्माण केलेले असोत किंवा अदलिताने दलित जीवनामधून निर्माण केलेले असोत, कलाकृती म्हणून तिच्या आस्वादनाचे निकष बदलण्याचे कारण नाही. कलाकृतीच्या जन्मदात्याच्या मर्जीवर वा इच्छेवर या गोष्टी अवलबून नसतात, किंवा अशा कलाकृतीमधून जो आशय निर्माण होतो त्याच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक वा सांस्कृतिक स्वरुपानुसार साहित्यशास्त्रातील मूलतत्त्वामध्ये बदल करण्याचे कारण नसते. असे केल्यास ललित साहित्यामधील सर्वच व्यवहारात अराजक माजेल.

साहित्यकृतीकडे एक कलाकृती म्हणून पाहावयाचे असेल तर तिच्याकडे पाहण्याचा एक मानदड जो साहित्यविषयक स्थायी मूल्यावर आधारित असतो आणि तसाच तो असावयास पाहिजे, त्या निकषावरच तिचे मूल्यमापन झाले पाहिजे. याविरुद्ध वाद घालता उपयोगी नाही. आज ज्या काही सामाजिक आणि सांस्कृतिक कारणामुळे दलित लेखकांकडून, त्यांच्या साहित्यकृतीविषयी वेगळया न्यायाची मागणी होते आहे, ही मागणी केवळ काल सापेक्ष आहे. म्हणूनच ती दिशाभूल करणारी आहे. उद्या ही सामाजिक आणि सांस्कृतिक विषमता दूर झाली तर दलित लेखकाची ही मागणी केवळ इतिहास म्हणून उरेल !

गो. म. कुलकर्णी यानी या लेखात वरील सर्व समस्यांचा खोलवर विचार केलेला. त्यांचा हा लेख आणि साहित्याच्या स्वभाववरील आणि प्रवृत्तीवरील इतर लेखही मनन करण्याजोगे आहेत. येथे केवळ विस्तार लिहिणे अशक्य आहे. त्यासाठी त्यांचे हे पुस्तक मुळातूनच अभ्यासिले पाहिजे.

¤

मराठी साहित्यातील स्पंदने
गो. म कुलकर्णी
सुपर्ण प्रकाशन, पुणे
मूल्य : ४५ रुपये

## प्रेरणादायी चरित्र

# आनंदवनीचा श्रमयोगी

'आनंदवनीचा श्रमयोगी' या सार्थ नावाचं श्री. बाबा आमटे याचं आटोपशीर चरित्र लिहून, श्री. अविनाश पितळे यांनी समाजसेवा करू इच्छिणाऱ्या तरुणपिढीचे हाती एक प्रेरणादायी मशाल दिली आहे हे प्रथमच मोकळेपणाने सांगितलं पाहिजे. 'ज्यासी आपंगिता नाही । त्यासी धरी जो हृदयी । देव तेथेंचि जाणावा। साधु तोचि ओळखावा' अशा कोटीतले बाबा आमटे हे एक असाधारण व्यक्तित्व, नव्हे कर्तृत्व आहे. ज्योतीने ज्योत पेटत जावी त्याप्रमाणे बाबांच्या कर्मभूमीतील सान्निध्यात जो कोणी सहृदय माणूस येईल त्याचे मनी उपेक्षितांची सेवा करण्याची, त्याना जवळ करून प्रतिष्ठा देण्याची भावना चेतल्याशिवाय राहणार नाही. श्री. पितळे यांना वरोड्याचे आनंदवन आणि आनंदवनाच्याच इतर सेवा केंद्रातून राहण्याची संधी मिळाली होती. तिथे राहून बाबांनी नि त्यांच्या सर्व कुटुंबाने चालवलेली कुष्ठरुग्णसेवा पाहून, किंबहुना तेथील श्रमदानकार्यात सहभागी होऊन बाबांचं जीवनकर्तृत्व लिहिण्याची त्यांना प्रेरणा मिळाली आणि मग त्यांनी मोठ्या तन्मयतेने, प्रस्तुत चरित्र लिहिलं.

'श्रमयोगी' ची जीवनकथा तीन भागात श्री. पितळे यानी सांगितली आहे. आनंदवनाचे शिल्पकार, श्रमगंगेच्या तीरावर आणि बाबा आमटे : एक महामानव, असे हे तीन भाग असून, प्रत्येक भागातील छोट्या छोट्या सातआठ प्रकरणांमधून लेखकाने बाबांचा जीवनपट नि एकूण सेवाव्रती

अखंड कर्तृत्व उलगडून दाखवण्याचा यत्न केला आहे. 'बाबाच्या विविध सेवा नि श्रमकार्याचा परिचय करून देणार पुस्तक' असं एका बाळबोध वाक्यात या चरित्राचं वर्णन करता येईल. पण हे चरित्र यापेक्षा खूप काही आनंद देऊन जातं, अंतर्मुख करतं आणि भारावून टाकतं. मूळ चरित्रविषय उदात्त आणि लेखक रसिक, बहुश्रुत. त्यामुळे चरित्राची एकूण मांडणी नि शैलीच भारावून टाकणारी आहे. बाबांच्या चिंतनशील मनातून स्त्रवलेली अनेक सुभाषितवजा वचनं या चरित्रात पेरलेली आढळतात. इतकंच नव्हे तर इतर कवी, थोर चिंतक यांच्या वचनांची पखरणही श्री. पितळे चपखलपणे करतात आणि त्यामुळे बाबाचं कार्य मनावर साहजिकच अधिक ठसतं.

कुष्ठरुग्णांची सेवा करणारे इतर महाभाग आणि बाबा यांच्यातला मोठा फरक असा की, बाबा हा कविमनाचा, चिंतनशील, क्रियावान पंडित आहे आणि त्याने सावरकराप्रमाणे आपलं सारं कुटुंबच एका दिव्यदाहक व्रताला वाहिलं आहे पृष्ठ २० वर 'की घेतले व्रत न हे आम्ही अंधतेने' यासारखी सावरकराची कविता उद्धृत करून आमटे कुटुंबाच्या सामूहिक सेवाव्रताचं लेखक अचूक वर्णन करतो. 'माझ्या कुष्ठरोगी मित्राच्या चेहऱ्यावरील हास्य मला जगातील कुठल्याही पारितोषिकापेक्षा मोलाचे वाटते' हे बाबाचे उद्गार ऋषीमुनींच्या तोंडी शोभावे असेच आहेत. बाबांच्या विविध कार्याचे मोल सांगताना श्री. पितळे त्यांच्या मनाचा, संकल्पनांचा, विचारांचा मागोवा घेतघेत श्रमयोग्याची मूर्ती साकार करण्याचा यत्न करतात. समाजसेवकाच्या या चरित्रगाथेला ( होय-गाथाच आहे ही ) लेखकाने कौटुंबिक जीवनचित्रणाचा जो एक स्निग्ध मखमली पदर जोडला आहे त्यामुळे या चरित्राची वाचनीयता आणखी वाढली आहे. विषयानुरूप भावपूर्ण भाषाशैली हे तर या चरित्राचं प्रमुख आकर्षण म्हणावं लागेल.

अवतारी विभूतीची भक्तिमानतेने चरित्रगाथा लिहावी तशा स्वरूपाचं हे चरित्र आहे असे काही चिकित्सक वाचकांना वाटण्याचा कदाचित संभव आहे एकाद पक्वान्न फार गोड झाल की, रुचीपेक्षा अरुचीची भावना होणे साहजिकच असतं. पण बाबाचं एकूण समर्पित उदात्त कार्य पाहून श्री. पितळे यांच्यासारखा बहुश्रुत लेखक भारावून जाऊन जेव्हा लिहितो, तेव्हा तो बाबाच्याच कार्याची मशाल हाती घेऊन त्या कार्यात खारीने सेतुबंधन प्रसंगी आपला वाटा उचलावा त्याप्रमाणे सहभागी होतो, असे समजून त्याच्या या पहिल्या पुस्तकाचे स्वागतच केले पाहिजे. तरुण पिढीने अवश्य वाचावं असं हे पुस्तक निश्चित आहे.

—म. श्री. दीक्षित

आनंदवनीचा श्रमयोगी
अविनाश पितळे
कॉंटिनेंटल प्रकाशन
किंमत १५ रु.

एक अप्रकाशित व्यक्तिमत्त्व

## स्वातंत्र्यचळवळ, लेखन, संशोधन, उत्खनन

# अशा कामात झोकून देणारे ज्ञानतपस्वी-बा. बा. महाराज

रघुपती भट्ट

शहीद भगतसिंग यांच्या मातोश्रीचा पंजाब सरकारने गौरव करण्याचे ठरविले. मानपत्र, थैली व मोटार देण्याचा कार्यक्रम होता. आताचे राष्ट्रपति सरदार ग्यानी झैलसिंग त्यावेळी पंजाबचे मुख्यमंत्री होते. या कार्यक्रमाची अनेकांना आमंत्रणे गेली. त्यातील एक आमंत्रण कोल्हापूरला आले. पंजाबच्या त्या वीरमातेने सांगितले होते. 'माझा एक मुलगा कोल्हापूरला राहातो.' त्यानुसार हे आमंत्रण आले होते. कोल्हापूरच्या त्या मुलाने ही आठवण जपली आहे. हा सन्मान मानला आहे. पंजाबच्या वीरमातेने आठवण ठेवून बोलावून घ्यावे यापेक्षा मोठा तो सन्मान कोणता?

या मुलाचे नाव बा. बा. महाराज!

बा. बा. महाराज मूळचे साताराचे पण त्यांची कार्यभूमी मात्र कोल्हापूर. गेली अनेक वर्षे ते कोल्हापुरात काम करताहेत. अनेक क्षेत्रात गती असणारे बाबा सहासष्ट वर्षाचे तरुण आहेत. आतापर्यंत त्यांनी अनेक प्रकारचे लिखाण केलेलं आहे. अनेक उत्खननात भाग घेतलेला आहे. या संदर्भात संशोधनासाठी त्यांनी भरपूर पायपीट केली आहे. नामवंत इतिहास संशोधकाच्या खांद्याला खांदा लावून मेहनत केली आहे. क्रांतिकारकांची चरित्रे लिहिली आहेत. भलेबुरे अनुभव घेतले आहेत आणि अजूनही वाढत्या वयाला न जुमानता बरचस कार्य करण्याची त्यांची उमेद आहे. ही उमेद तरुणांना लाजवणारी आहे.

बाबाचे शिक्षण पुरे झाले. नंतर त्यांनी वृत्तपत्रात नोकरी धरली. त्या काळात नुसती कलमबाजी चालत नसे. हर तऱ्हेच्या कामात भाग घ्यावा लागे. त्या वृत्तपत्राच्या इंग्रजी संपादकाचा त्यांनी लोभ मिळविला. त्या संपादकाने नोकरीतून मायदेशी परत जाताना त्याने बाबांना दुसरीकडे नोकरी देवविण्याची इच्छा व्यक्त केली होती. वृत्तपत्रातील अनुभव लक्षात घेऊन बाबांनी त्यानुसार फ्रीप्रेस, सेंटिनल, बॉम्बे क्रॉनिकल इत्यादी पत्रात काम केले.

सातारा ही क्रांतीवीराची भूमी. सगळा

देश तेव्हा स्वातंत्र्याच्या इच्छेने प्रेरित झाला होता बाबानी स्वातंत्र्यचळवळीत भाग घेतला. क्रांतिसिंह नाना पाटील, बर्डेगुरुजी यांच्या सहवासात त्यांनी पत्रीसरकार अनुभवले. बाबाच्या एका सहकाऱ्याला गोळी लागली तो प्रसंग अजून त्याना आठवतो. जणू काही त्याचेच मरण त्या मित्राने स्वतःवर ओढवून घेतले होते.

बाबांनी जे राष्ट्र-विचाराचे लेखन केले त्याला नाना पाटील, यशवंतराव चव्हाण, अच्युतराव पटवर्धन, छत्रुसिंग यासारख्यांचा सहवास लाभला. त्यांच्या दैदिप्यमान जीवनांची ती झलक त्याना लेखनाला प्रेरणा देऊन गेली असावी.

म. गांधीच्या आदेशानुसार बऱ्याच भूमिगत कार्यकर्त्यांनी ठरविले त्यानुसार बाबानी सांगली संस्थानात प्रगट व्हायचे ठरविले; पण शिक्षणतज्ज्ञ कै जे. पी. नाईक व पोलीस निरीक्षक एफ. डी. रोश्र यांच्या सूचनेवरून निर्णय बदलला. जे. पी. नाईकानी त्यांच्या जीवनाची दिशाच बदलून टाकली. त्यांना नाईकानी त्यांच्या आवडत्या पुरातत्व खात्याकडे वळवले. कोल्हापूरच्या ब्रह्मपुरीजवळ डेक्कन कॉलेजमार्फत डॉ. साकलिया व डॉ एम्. जी. दीक्षित उत्खनन करीत होते. त्यात नाईकानी बाबांचा समावेश केला.

## प्रचंड संग्रहालय

इतिहास व पुरातत्व संशोधन हा बाबाचा आवडीचा विषय. त्यात डॉ साकलियासारख्या विद्वानाबरोबर काम करायला मिळणे हा मोठा आनंद आहे, तसाच तो बहुमानही आहे. त्यानंतर बाबानी सर्व भारताचा प्रवास केला. सारनाथ, नालंदा, खजुराहो इत्यादी सर्व प्राचीन स्थळे व उत्खनने पाहिली. त्याचा त्यानी अभ्यास केला.

हे कार्य चालू असतानाच बाबाना डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या सहवासाचा लाभ मिळाला. अनेकवार त्यानी दिल्लीच्या व भारताच्या फेऱ्या केल्या. अनेक थोर व्यक्तींचा बाबांचा परिचय झाला. डॉ. राजेंद्रबाबूंच्या अभ्यासू वृत्तीचा आणि सर्व समावेशक प्रज्ञेचा त्यांच्यावर खोलवर परिणाम झाला. बाबाची संशोधक वृत्ती पाहून बाबूजीनी त्यांना स्वातंत्र्ययुद्धाचा संशोधक वृत्तीने इतिहास लिहावयास सांगितले.

बाबांनी ते आपल्या आयुष्याचे इतिकर्तव्य मानून काम केले. त्यासाठी स्वातंत्र्ययुद्धातील शहिदांचे दुर्मिळ फोटो, त्यांच्या हस्ताक्षरातील पत्रे, वर्तमानपत्राची कात्रणे, हत्यारे, त्यांच्या नित्य वापरणातील वस्तू, स्मृतिचिन्हे, रक्षा, पुस्तके जे काही गवसेल ते जमा करण्यास सुरुवात केली. त्यासाठी अनेक कष्ट घेतले. राजेंद्रबाबूनी दिलेले काम हे आपल्या जीवनातील प्रधान कार्य मानून बाबांनी आपले जीवन खर्च केले.

यामुळे परिणामी १८५७ ते १९४७ या काळातील स्वातंत्र्ययुद्धाच्या प्रत्यक्ष स्मृतीचे प्रचंड संग्रहालय तयार झाले. बाबांच्या अविरत प्रयत्नाचे हे फळ होते.

या संग्रहालयासाठी 'शहीद भवन' बांधण्याचा बाबानी संकल्प केला. आपल्या या संग्रहाचा जनतेला लाभ मिळावा व राष्ट्रप्रेरणा मिळावी म्हणून बाबानी त्याचा ट्रस्ट निर्माण केला.

## चरित्र लेखन – संशोधन

या संग्रहालयाचा उपयोग संशोधनासाठी व्हावा ही बाबाची इच्छा. त्याप्रमाणे अनेक विद्यापीठांचे विद्यार्थी बाबांच्याकडे येऊन माहिती घेऊन गेले. आजही दोन विद्यार्थी दुर्मिळ कागदपत्राचा आणि स्मृतीचा अभ्यास करण्यासाठी अभ्यासगत आहेत.

इंडियन कौन्सिल ऑफ हिस्टॉरिकल रिसर्च, नवी दिल्ली यासारख्या मान्यवर संस्थानीही त्यांना जरूर ते सहकार्य देण्याचे मान्य केले आहे.

सरदार भगतसिंहाचे सहकारी बटुकेश्वर दत्त पाटण्यास आजारी असल्याची बातमी बाबाना समजताच ते पाटण्याला गेले. पाटण्याला त्यांच्यावर उपचार होऊ शकत नाहीत हे समजताच त्यांनी दत्तांना दिल्लीस नेले. भारत सरकारने त्यांच्या सर्व खर्चाची जबाबदारी घेतली. दत्ताच्या आजारात बाबा दिल्लीतच होते दत्ताना भेटण्यासाठी त्याचे अनेक क्रांतिकारक सहकारी आले होते. भगतसिंहाच्या मातोश्री-पंजाबमाता दिवसभर दत्तांच्याजवळ असत. दत्तानी त्याना बाबाचा परिचय करून दिला. दत्तानी आजारपणात आपल्या सर्व स्मृति सांगितल्या त्या बाबानी टिपून घेतल्या. अखेरच्या क्षणी दत्तांचा हात बाबाच्या हातात होता हे मोठे स्मृतिधन बाबांनी जपले आहे.

बाबानी सरदार भगतसिह चरित्र लिहिले. अनेक जुन्या क्रांतिकारकांच्या जीवनावर 'अग्निफुले' या नावाच्या पुस्तकाचे तीन भाग प्रसिद्ध केले. संशोधकवृत्तीबरोबरच बाबांच्या भाग्याने घडलेला क्रांतिकारकाचा सहवास या गोष्टीही या पुस्तक लेखनास प्रेरक घडल्या.

इतिहास संशोधन हा बाबाचा पिंड. उत्खनन, जुने शिलालेख, प्राचीन अवशेष आणि त्यांची संगत लावण्यातच खरा आनंद मिळतो. म्हणून श्री. ग. ह. खरे, डॉ साकलिया यांच्यात त्यांना स्वजन मिळतात. बाबांचा या विषयावरील अभ्यास मोठा आहे, म्हणून डॉ. मार्टिमूर व्हिलरसारख्या आंतरराष्ट्रीय पुरातत्व संशोधकाला बाबाच्याबद्दल प्रेम वाटत असे.

त्याच्याही पुढे सांगायचे झाले तर डॉ. व्हिलरनी बाबानी आपल्याबरोबर युरोपात यावे, देशोदेशीचे प्राचीन अवशेष अवलोकन करावेत, उत्खननात भाग घ्यावा अशी अनमोल संधी त्याना दिली होती; परंतु बाबाच्याकडे एवढे आर्थिक पाठबळ नव्हते. त्यामुळे त्याना ते नाकारावे लागले.

कोल्हापूर व जवळच्या ऐतिहासिक व प्राचीन स्थानाची सर्व माहिती बाबाना आहे. करवीर नगर वाचन मंदिराचे आवारात ज्या सुवर्णमुद्रा सापडल्या त्याची माहिती बाबानी पोलीसअधिकाऱ्यास बरोबर सांगितली होती. मुद्रा कोणत्या स्थितीत आणि किती असणार याचाही बरोबर होरा सांगितला. पोलिसानी खुदाई करणाऱ्या मजुराना ताब्यात घेतल्याबरोबर सुवर्णमुद्रा बाबानी सांगितलेल्या आकड्याप्रमाणे उपलब्ध झाल्या. या मुद्रा कोणत्या काळातील आहेत, हे पाहण्यासाठी बाबानी खूप परिश्रम घेतले. त्यावेळी पुरातन संग्रहालयाचे सहाय्यक याचे मत वेगळे पडले. बाबाना विवाद आवडत नाही. त्यांनी स्पष्ट सांगितले,–

माझे मत मी सांगितले. तुम्हाला पटत नसेल तर माझा आग्रह नाही.

केशवराव भोसले नाट्यगृहाजवळ पाया काढताना ताम्रपट व देवाच्या मूर्ती मिळाल्या. त्याचेही स्पष्टीकरण बाबानी ततोतत दिले. त्यानंतर पुनः श्री. ग. ह. खरे यानी मुद्रा तपासल्या व बाबाचे मतच बरोबर अस-

त्याचा निर्वाळा दिला.

सरकारी कारभार म्हणजे और काम,असे बाबाचे मत बनून गेले आहे. मुंबईच्या एका अधिकाऱ्याने बाबाच्याकडील, बाबाचे अनेक वर्षांचे सशोधनाचे कागदपत्र पहावयास म्हणून मुबईला नेली. काही व्यवहारात तो सापडला व त्यानी आत्महत्त्या केली. त्याच्याबरोबर बाबाचे मौल्यवान संशोधन कागदपत्रही गेले.

सरकारी अधिकाऱ्याची बेपर्वाई वृत्ती यामुळे आपल्या मौल्यवान इतिहास संशोधनाची अपरमित हानी होते आहे यावद्दल बाबांना मनस्वी खेद होतो. पण त्यावद्दल कोणाला दोष द्यायचा ? त्या अधिकाऱ्याला की स्वतःला ?

देशातील अनेक दुर्मिळ वस्तू चोरीला गेल्या. अनेक प्राचीन मूर्त्या परदेशात भरमसाठ किंमतीला विकल्या गेल्या आहेत. अतिप्राचीन अवशेष केवळ दुर्लक्षामुळे दररोज उध्वस्त होताहेत. बाबाचे मन यामुळे कळकळते पण त्याचा उपयोग काय ?

## चिकित्सक–'महालक्ष्मी'

कोल्हापूर जिल्ह्यात जेवढे पुरातन अवशेष आहेत, मदिरे आहेत, गुहा आहेत त्या बाबानी पालथ्या घातल्या आहेत त्याही केव्हा ? तर जेव्हा गाव तेथे एस. टी. वगैरे नव्हते तेव्हा. त्या काळात जेवढी प्राचीन स्थळे आहेत, त्या सगळ्याना बाबानी भेट देऊन त्याच्या नोंदी केल्या, माहिती घेतली त्यावरून त्यांचा असा दावा आहे की कोल्हापूर परिसरातील कमीत कमी दोन हजार मूर्ती व अवशेष चोरीला गेल्या आहेत.

पेठ वडगावमध्ये एक जुने महालक्ष्मी मदिर आहे. तेथे कोरीव नक्षीचे तीन खाब पडलेले आहेत. बाबानी जेव्हा त्या मदिराला भेट दिली होती, तेव्हा पंचवीस खाब त्या प्रकारचे कोरलेले स्तभ होते. या बेपत्ता असलेल्या खाबाचे काय झाले असावे हा प्रश्न मती गुग करून टाकणारा आहे.

असे अनेक प्रसंग आहेत. मनाला सुन्न करून टाकणारे किस्से बाबांजवळ आहेत. इतिहास जतन करून ठेवायची वृत्ती यालाच म्हणायची काय ? असेच जर घडत आले तर मग आपले गतकालीन वैभव फक्त पुस्तकातील चित्रातच पाहायला मिळेल.

पुराण वस्तू सशोधकाला किती शास्त्रांचा अभ्यास करावा लागतो. त्याला किती कष्ट घ्यावे लागतात, ज्योतिषशास्त्र, आयुर्वेद, इतिहास, भूगोल, प्रस्तरीय विज्ञान इत्यादी अनेक शास्त्राचे अंग त्याला माहीत असावे लागते. कालमान नक्की करण्यासाठी ताऱ्याचे भ्रमण आणि त्याच्या वेळा ध्यानात असाव्या लागतात. त्यासाठी खगोलशास्त्रही माहिती असावे लागते. आयुर्वेदातील काही प्रमाण माहिती असावी लागते. बाबा हाडाचे संशोधक. त्यांनी या सर्व शास्त्राचा काटेकोर अभ्यास केला आहे.

शीलालेख, जुने कागदपत्र, नाणी यांच्या माहितीसाठी बाबानी ब्राम्ही, खरोष्टी, मागधी, मोडी, देवनागरी वगैरे लिप्याचा अभ्यास केला. याशिवाय हिंदी, संस्कृत, पाली, अर्धमागधी, डिंगल वृज इत्यादी भाषाही त्यानी अवगत केल्या. मातृभाषा मराठी व संदर्भभाषा इंग्रजी या दोन्हीवर उत्तम पकड असल्याने बाबाचा व्यासंग उत्तमरीत्या कागदावर उतरू शकला. आपल्याला जे गवसले, आपण जे संशोधिले ते सर्व सामान्यापर्यंत पोहोचवण्याच्या जिद्दीने बाबांनी गेल्या चाळीस वर्षात तीन हजारावर लेख प्रसिद्ध केले.

राणी लक्ष्मीबाई झांशी यांचे चरित्र बाबानी इंग्रजीतून लिहिले. अनेक कागदपत्र, ग्रथालये, सरकारी दफ्तरखाने पालथी घालून त्या आधारे हे चरित्र तयार झाले. अशा सशोधित लेखनाच्या पाठीमागे अनेक वर्षांचे सशोधन-प्रयत्न असतात, उपलब्ध साहित्य चिकित्सक वृत्तीने तपासणारी सशोधक वृत्ती असते आणि अनेक भाषात स्वैरपणे फिरू शकणारी समृद्ध प्रतिभा असते.

या चरित्राचे प्रकाशन लौकरच होणार आहे.

करवीर निवासिनी महालक्ष्मी म्हणजे महाराष्ट्रातील एक मोठे देवस्थान. शक्तिपीठात महलक्ष्मीचा अतर्भाव केलेला आहे. बाबानी गतेइतिहासात शिरून जगदबेसबधी सर्व माहिती गोळा केली. सातव्या शतकात बाधलेल्या या देवळामध्ये महाकाली, महासरस्वती याच्या मंदिराची वाढ कशी होत गेली, मंदिराच्या परिसरात वेगळी वेगळी स्थापत्यशैली कशी आणि का पाहांयला मिळते, मदिराभोवतीची भिंत मुस्लीम शैलीची का आहे इत्यादी सर्व बारकावे त्यानी अभ्यासले आहेत. मदिराच्या स्थापनेची तिथी काढण्यासाठी दक्षिणायन, उत्तरायण आदीचा पाठपुरावा त्यांनी केला. ही सगळी माहिती बाबानी लिहिलेल्या 'महालक्ष्मी' या आगामी पुस्तकात असणार आहे. पुस्तक आता प्रसिद्धीच्या मार्गावर आहे

हे सर्व सागताना शक्तिपीठे याच्या उत्पत्तीमागील कथा, वेगवेगळ्या पीठाच्या उपासना, चालीरिती व पथ याची माहितीही बाबानी अगदी सागोपाग दिली. बाबानी एखाद्या विषयात लक्ष घातले की, किती खोलपर्यंत चिकित्सक दृष्टीने सशोधन करतात याचा एक पुरावाच त्याच्या बोलण्यातून येतो.

अभ्यासक आणि भाविक या दोघानाही बाबाचे हे नवे पुस्तक मार्गदर्शक, उपयुक्त ठरेल.

'महालक्ष्मी'च्या मूर्तीची झीज होऊ नये म्हणून छत्रपति शाहू महाराजानी गुरुमहाराज, जोशीराव, पडितराव न्यायाधिश, राजोपाध्ये व करवीरपीठ शकराचार्य याची एक समिती नेमली. या समितीने मूर्तीवर सोन्याचा पत्रा बसवावा असे सुचविले. छत्रपतीने त्यासाठी सोने जमविले; पण दुर्दैवाने महाराज कालवश झाले व योजना बारगळली गेली.

या बाबतीत अलिकडेच घडलेला किस्सा बाबानी सागितला.

पुरीच्या शकराचार्यांनी महालक्ष्मीस वज्रलेप करण्याचा सकल्प केला. आवश्यक ती परवानगी मिळविली. कारागीर आले. त्यानी मूर्ती कोरली. बाबा वज्रलेप कसा होतो ते पहाण्यास नित्य जात असत.

वज्रलेप कसा करतात याचे शास्त्र बाबानी अवगत केले होते. शेवटी वज्रलेप पुरा झाला. कोल्हापूरचे प्रकाड पडित बाळाचार्य खुपेरकर यानी मूर्ती पाहिली आणि मूर्तीकारांचे भांडे फुटले

मूर्तीच्या मूर्तीवर जे शिवलिंग आहे त्याच्या योनीची दिशा उत्तराभिमुखी असताना ती बदलून पश्चिमाभिमुखी कारागिरानी करून ठेवले. रितीप्रमाणे ते उत्तराभिमुख हवे होते. उत्सव समिती व खुपेरकर याच्यामध्ये कडाक्याचा वाद झाला. शेवटी

हे प्रकरण जिल्हाधिकारी यांचेकडे गेले. डेप्युटी कलेक्टर श्री. एम्. डी. चव्हण यांनी बाबांना बोलवून घेतले,व त्यावर चर्चा केली. पर्यायी कारागिरांनी योनीची दिशा बदलून पूर्ववत करावी व या अशास्त्रीय कृत्याबद्दल उत्सव समितीसह सर्वांनी प्रायश्चित्त घ्यावे असे श्री. चव्हाण यांनी समितीला सांगितले व त्याप्रमाणे घडले व या प्रकरणावर पडदा पडला.

अशा अनेक हकिगती बाबांनी संग्रहात ठेवल्या आहेत. भूतकालाचे संशोधन व वर्तमान व भविष्य या दोन कालासाठी स्मृती-रूपाने करून ठेवण्यासाठी तन मन धन वेचून राबणारी माणसे आता कमी आहेत. बहुविध प्रज्ञांच्या या सहवासाचा आनंद म्हणजे एखादी ग्रंथालयातील कालव्यतितीच या लेखाचे प्रयोजन आहे. प्रसिद्धीच्या झोताला बाबांसारखी माणसे नसतात त्यामुळे अशा लोकाचे कार्य अप्रकाशित रहाते. एखाद्या मिणमिणणाऱ्या समईतील ज्योतीप्रमाणे ही माणसे सभोवतीचा घनदाट अंधकार दूर करण्याचा आपल्या परीने प्रयत्न करीत असतात.

बाबा हे अशाच प्रकारची ज्योत आहेत.

□

# रंगभूमी

## राज्यस्पर्धा पहिली फेरी : पहिली दोन नाटके

वि. भा. देशपांडे

महाराष्ट्र राज्याचे हे रौप्यमहोत्सवी वर्ष. या वर्षी होणाऱ्या राज्य नाटच स्पर्धांना शासकीयदृष्टचा आगळे महत्त्व राहीलसे वाटते. पुण्यामधली पहिली फेरी डिसेंबर-मध्येच संपली. आता दुसरी आणि अंतिम फेरी फेब्रुवारीत मुंबईत सुरू होईल.

एक काळ असा होता की, या राज्यस्पर्धा सुरू होण्याआधीपासून वातावरण निर्माण होत असे. काही विशिष्ट संस्थांची नाटके पाहायची झाली तर आगाऊ तिकिटे मिळवणे ही आवश्यक गोष्ट असायची. एकूण स्पर्धेचे वातावरणही उत्साहवर्धक, चैतन्यदायी असे असायचे. नाटचप्रयोगांची चुरस आणि निकालाची उत्सुकताही तितकीच असायची; पण तो सारा उत्साह, चैतन्य सारेच निमाले. अपवादात्मक नाटकाला गर्दी असते. बाकीच्या वेळी प्रेक्षागृह फारच केविलवाणे दिसते. हे केवळ राज्यस्पर्धेलाच नाही तर अन्य अनेक नाटचस्पर्धांच्या संदर्भात घडते आहे. याला अपवाद आहे तो आंतर महाविद्यालयीन पुरुषोत्तम करंडक स्पर्धेचा. राज्यस्पर्धेची गर्दी ओसरायला अनेक कारणे आहेत. अन्य स्पर्धांची वाढती संख्या, प्रयोगकर्त्यांनी समाजात निर्माण केलेली प्रतिमा, व्यावसायिक रंगभूमीचा वाढता प्रभाव इत्यादी अनेक.

कारणे काही असोत, पण स्पर्धा पाहण्याचा उत्साह कमी झाला ही वस्तुस्थिती. निरनिराळचा कारणांनी मी ही सर्व स्पर्धा पाहू शकलो नाही; पण या स्पर्धेमध्ये जी पहिली दोन नाटके आली आणि आता जी अंतिम फेरीसाठी मुंबईला जात आहेत ती नाटके मात्र पाहिली. पहिले ‘ एक गगनभेदी किंचाळी ’ आणि दुसरे ‘ क्षितिज ’ !

‘ एक गगनभेदी किंचाळी ’ हे महाराष्ट्र कामगार कल्याण यांच्यावतीने पेश झाले याचे लेखक आहेत चंद्रकांत प्रभाकर देशपांडे. अगदी थोडे नाटचलेखन करून स्वतःची एक किमान प्रतिमा ज्यांनी निर्माण केली आहे अशा नाटचलेखकांमध्ये चं. प्र. देशपांडे हे आहेत. ‘ इतिहास ’, ‘ दिनकर पुरोहिताचा खून ’ किंवा ‘ पोत्यातून गोत्यात ’ हे त्यांचे नाटचलेखन परिचित आहे. ‘ किंचाळी’चे सूत्र चाळकरी जीवनातले आहे. एक जुनी, माणसांची खच्चून भरलेली चाळ. त्यातल्या एका घरात कोणीतरी किंचाळी मारली असे उरलेल्या चाळकऱ्यांना वाटते आहे. ते सारेजण तातडीने ‘ समाचाराला ’ येतात; पण वास्तवात ती किंचाळी त्या घरातून आलेलीच नसते. पण जेव्हा खरोखरीच त्या घरातली मुलगी भयाने किंचाळी मारते तेव्हा मात्र कोणीच येत नाही. याभोवती सारे कथानक खेळते राहिलेले आहे. यामध्ये घटना-प्रसंगापेक्षा मानवी स्वभाव चित्रणाला अधिक महत्त्व आहे. ज्यावेळी काही घडलेले असते, प्रतिक्रिया यावीशी वाटते तेव्हा काहीच घडत नाही. याउलट काहीच घडलेले नसताना मात्र हेत्वारोप करून एक प्रकारचा मानसिक छळ सुरू होत राहतो. यातून माणसाच्या स्वभावांचे कंगोरे पाहायला मिळतात. त्यातला द्वेष, मत्सर, कुचाळक्या यातून माणसे आरपार पाहता येतात; पण या नाटकाच्या लेखनात एकच जाणवत राहते की, नाटचविषयाचा जीव अगदी थोडा आहे तो पूर्ण किंवा मोठे नाटक करण्यासाठी अधिकतेने ताणला आहे !

नाटकाचा दिग्दर्शक आहे अनिल खोपकर. त्याने संपूर्ण प्रयोग अतिशय सुविहितपणे पेश केला आहे. विशेषतः मंहिनेत फारसे तपशील नसलेली चाळ, त्यातली माणसे यांचे अनेक बारकावे रंगमंचावर दृश्यात्मक परिणाम घडवतात. त्यासाठी कुमार देशपांडेने केलेले नेपथ्यही वास्तव आहे. आपण चाळीजवळच उभे राहून सारे नाटक पाहतो असे वाटते. नेपथ्याचा वापर दिग्दर्शकाने उत्तमपणे करवून घेतला आहे या नाटकात चाळकऱ्यांसह अनेक पात्रे आहेत. पण त्यामध्ये सर्वात लक्षवेधी ठरतात ती म्हणजे आनंदराव आणि उषाताई. अनुक्रमे अरूण वर्वे आणि अश्विनी गानू या दोघांनी आपल्या भूमिका समरसून केल्या आहेत. दोघांची वये, वृत्ती, लोभराग तपशिलाने व्यक्त झाले. त्यांना उत्तम साथ दिली मोरेकाका (विजय परब) वाटवे (प्रकाश भेंडे), सतीश (राजीव आठवले), मंदार (राजेंद्र शारंगपाणी) इत्यादींनी.

'क्षितिज' हे अतुल पेठेचे नवे नाटक. अगदी आताच्या तरुण पिढीत पुण्यात जी काही जाणकारीने—गांभीर्याने नाट्यलेखन करणारे लेखक आहेत त्यामध्ये अतुल हा महत्त्वाचा आहे त्याने लिहिलेल्या एकांकिका त्याने स्वतः आणि इतरानी स्पर्धेत, अन्यत्र केलेल्या आहेतच. आपल्या पिढीचा, भोवतालच्या वातावरणाचे भान ठेवून वेगळ्या वाटेने जाणारा असा हा नाट्यलेखक.

त्याच्या या नव्या नाटकात त्याने एका मुलाची आणि बापाची जीवनगाथा माडली आहे. पण ती सरळ किंवा ढोबळ पद्धतीने सागितली नाही. मुलगा मनोरुग्ण आहे किंवा त्याचे व्यक्तिमत्त्व भग्नावस्थेत आहे. त्याने आपल्या जीवनाला संपवण्याचा, आत्महत्त्या करण्याचा निश्चय केला आहे. तो निर्णय आपल्या वडिलाना सांगू पाहतो आहे पण त्याना आकळत नाही. हे केवळ वास्तवाच्या व्यवहाराच्या पातळीवरचे आकळणे नाही. तर हे दोन व्यक्तीनी, दोन पिढ्यातील भिन्न वयाच्या वृत्तीच्या लोकानी परस्पराना समजावून घेणे आहे. पण तो सवाद अनेकदा घडत नाही. कारण मूलतः जीवनदृष्टिकोणाचाच फरक आहे.

हे सारे शब्दसवादात पकडणे आणि अभिनयाच्या साहाय्याने व्यक्त करणे ही आव्हानात्मक गोष्ट आहे. अतुल पेठे हा लेखक, दिग्दर्शक आणि अभिनेता अशा तिहेरी भूमिकात असतो. इथेही तसाच आहे. त्यामुळे त्याच्या मनातील—लेखनातील आशय प्रेक्षकापर्यंत पोहोचवण्यास त्याला ह्या साऱ्या गोष्टी साह्यभूत ठरत असतात. प्रायोगिक नाटकामध्ये असे महत्त्वाचे उदाहरण सतीश आळेकरचे आहे. यामध्ये जशी त्या कलावताला अनुकूलता आहे तशीच मर्यादाही आहे. त्याच्यातला लेखक–दिग्द–अभिनेता कोणकोणावर आरुढ होतो यावर प्रयोगाची दिशा निश्चित होत राहते. शिवाय आपल्या लेखनाला दुसरा दिग्दर्शक, नट मिळाला तर त्याचे परिणाम किती—कसे बदलतील हे पाहण्याची सधी निदान या प्रयोगापुरती संपलेली असते.

या नाटकाचा प्रयोग जेव्हा स्पर्धेत मी पाहिला तेव्हा एक अपघाती घटना झाली. ती म्हणजे नाटकाचा प्रयोग चालू असताना अतुल पेठेच्या नाकातून जोरदारपणे रक्त वाहायला लागले. आरंभी कोणालाच या घटनेचा अन्वयार्थ लागेना. पण नंतर ही बाब गंभीर आहे हे अनेकाच्या ध्यानी आले. त्याने ते रक्त पुसण्याचा, थाबवण्याचा आटोकाट प्रयत्न केला. त्यासाठी आडव्या—उभ्या—निजलेल्या अवस्थेतल्या हालचाली ज्या करता येतील त्या केल्या. पण प्रयोग थाबवला नाही. साऱ्यानीच श्वास रोखून प्रयोग पाहिला. हे सारे एवढ्याचसाठी सागितले की अगदी नवोदित कलाकार एखाद्या प्रयोगात किती प्रसगावधान दाखवून प्रयोग अखेरपर्यंत नेऊ शकतो. त्याच्या या धाडसाचा परिणाम त्याचा साथीदार उदय लागू याच्यावरही झाला. विशेष म्हणजे या दोघानीही आपल्या अभिनयाने नाट्याशय अतिशय समर्थपणे पोहोचवला. तो पोहोचवण्यासाठी आणखी एका घटकाची मदत झाली ती नेपथ्याची. मुलाच्या व्यक्तिरेखेतील आणि एकूणच नाट्यविषयातील भग्नावस्था सूचित करणारे नेपथ्य होते. ते केले होते श्याम भुतकर याने.

'क्षितिज' नाटकावर थिएटर अॅकॅडमीच्या लेखन शिबिरात लेखन आणि प्रयोग यावर यावर विस्ताराने चर्चा झाली. त्यातून निर्माण झालेल्या अनेक प्रश्नाना अतुल पेठेने समर्पक उत्तरे दिली. ही चर्चा नाट्यचर्चेचा वस्तुपाठ ठरावा इतकी चागली झाली. □

# मदनबाधा

## भट्टी का बिघडली ?

मलईदार श्रीखडयुक्त कॉमेडी
'मदनबाधा'
लेखक— वसत कानेटकर
दिग्दर्शक— अरविंद देशपांडे
कलावत— यशवत दत्त...वगैरे वगैरे

आता अशी जाहिरात वाचल्यावर सामान्य माणूस धावणारच की. एक तर तो दैनंदिन जीवनातल्या अनत कटकटीनी आणि ताणानी ग्रासलेला; त्या वाळवटात 'मलईदार श्रीखडयुक्त कॉमेडी' चं 'ओअॅसिस' क्षणभर अनुभवायला मिळत असेल तर कोण सोडेल हो ते ? लेखक दिग्दर्शक अगदी नावाजलेले. शिवाय 'मदनबाधा' हे नाव कसं अगदी 'catching!' तमाम पब्लिकला interesting वाटेल असच.

तेव्हा सन्माननीय प्रेक्षकवर्ग सर्व प्रेक्षागृह गच्च भरून टाकतो.

उच्चवर्ग आणि मध्यमवर्ग याच्याही मध्यावर असलेला एक आकर्षक दिवाणखाना त्यामध्ये मम्मी, पप्पा आणि त्याची १७–१८ वर्षांची मुलगी सुदर, याचा टिपिकल हॅपी ससार.

चागल्यापैकी पैसे मिळवणारे, सुस्वभावी, आणि छान पर्सनॅलिटीवाले पप्पा.

लेखिका म्हणून नाव मिळवलेली, स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाची, तरीही आदर्श गृहिणीच्या सर्व कल्पनामधे फिट् बसणारी—आणि अजूनही तरुण आणि सुदर दिसणारी मम्मी.

चुणचुणीत, स्मार्ट, समंजस आणि 'कॉन्व्हेंटी' वळणाची मुलगी—सुदर.

तर अशा या सुखी संसारामधे अचानक मिठाचा खडा पडतो. १० वर्षांपूर्वी (म्हणजे त्याच्या या सुखी संसाराला ७–८ वर्षे झाल्यानतर) कलकत्त्याच्या मृणाल नावाच्या नक्षलाईट आणि करारी व्यक्तिमत्त्वाच्या मुलीशी पप्पाचा जो काही काळ संबंध आलेला असतो, त्यातून एक मुलगा झालेला आहे. तो मुलगा आता १० वर्षांचा आहे, आणि त्याची आई दोन महिन्यापूर्वी नुकतीच अपघातामधे गेलेली आहे हे सार पप्पाना आताच कळत.

तिने म्हणे कधीच लग्न करायच नाही अस पक्क ठरवल होत; पण मूल होण्याच्या तिचा हक्क ती जरूर बजावणार होती. त्यासाठी तिनं निवड केली होती पप्पाची. हा तिचा रीतसर प्लॅन होता, हेही पप्पाना आत्ताच कळल.

पूर्वी एकदा सहज घडलेल्या या घटनेला पप्पा मुळीच महत्त्व देत नाहीयेत. कारण त्यांच सगळं सुरळीत चालू आहेच की. पण आता मुलाची आई गेल्यामुळेच काय तो Problem निर्माण झाला आहे.

आता करायच काय ? हे बायकोला कस सांगणार ? आता आपल्या ससाराचं काय ? प्रतिष्ठेचं काय ? हे नसत लचांड आपल्यामागे नको—असही एका बाजून पप्पाना वाटतय, पण झुरळासारख सगळ झटकून टाकता येण्याइतके निगरगट्टही ते नाहीयेत.

ते बायकोला हे सांगण्याच धाडस करतात. बायको जितकी चिडते, रागावते, तितकाच समजसपणाही दाखवते. दोघांमधला हा कलह ती दोघामध्येच ठेवते. मुलीला आणि नोकरालाही ती तो कळू देत नाही.

दरम्यान मृणाल नामक करारी व्यक्तिमत्वाचा शोध त्याच्या मुलीलाही लागतो; तो वेगळ्या संदर्भात 'मातृसत्ताक पद्धतीचा पाया घालणारी समाजसुधारक कर्तृत्ववान स्त्री...'अशी तिची कीर्ती मुलीच्या कानावर येते. आणि त्याने भारून जाऊन ती आणि तिचा मित्र चेतन–दोघही या नवीन विषयावर व्याख्यान घडवून आणतात; तिच्यावर लेख लिहितात.

आणि एक दिवस सुंदरला अचानक खरी बातमी कळते. मृणालशी संबध येणारा मनुष्य म्हणजे दुसरे तिसरे कोणी नसून आपले पप्पाच आहेत हे कळल्यावर ती कोसळते. पप्पांबद्दलची तिच्या मनातली प्रतिमाच ढासळते. ती त्याचा तिरस्कार करायला लागते. मृणालचे नवीन विचार तिला फेकून द्यावेसे वाटतात. पप्पांना ती तिरिमिरीने *रागाने बोलते.*

मम्मी भलतीच balanced. ती मुलीला रागावते पप्पाना बोलण्याचा तुला काहीही अधिकार नाही म्हणून तिला सुनावते. तिला पप्पाची क्षमा मागायला लावते, आणि मुलगी निघून गेल्यावर नवऱ्याची चागलीच कानउघडणी करते.

दरम्यानच्या काळात मुलाचा निर्माण झालेला problem आपोआप सुटतो. कारण त्या मुलाचं पालनपोषण त्याची मावशी करणार असं त्याच्या आईनं अगोदरच ठरवलेलं असतं. त्यामुळे मुलाला जरी हॉस्टेलवर ठेवलं तरी तो अधूनमधून घरी येण्याचा–आणि मायलेकींनी त्याचा स्वीकार करण्याचा प्रश्नच उरत नाही.

मग काय ? दोघांची दिलजमाई ! शेवटी सारं कस गोड गोड !

हा विषय आपल्याला तसा नवीन नाही. यापूर्वी तो 'जोडीदार'-या नाटकामधे आणि 'मासूम' नावाच्या चित्रपटामधे हाताळला गेलेला आहे; आणि तोही अत्यंत चागल्या तऱ्हेने. 'मदनबाधा' या नाटकाची बीजं 'मासूम' आणि 'जोडीदार' मधेच आहेत. फक्त नंतरची कथा जरा वेगळ्या अगाने जाते इतकच.

मुळात हा विषय अत्यंत गंभीर आणि नाजूक आहे. स्वत:च्या कुटुबामधे चांगल्या तऱ्हेने स्थिरावलेल्या समर्थ पुरुषाचा दुसऱ्या स्त्रीशी आलेला संबध, त्यातून निर्माण झालेलं मूल आणि ती गोष्ट अनेक वर्षांनी उघड होणं–ही घटनाच अत्यत धक्कादायक आहे. यामधे तिघांचीही वेगवेगळ्या पातळीवर tragedy आहे.

तिघामधले परस्पर भावबंध, त्याच्यातलं प्रेम, त्याच्यातला संघर्ष, त्याच्यातले ताण–तणाव याचे पदर मोठ्या हळुवारपणे, कौशल्याने आणि गांभीर्याने उकलून दाखवणं खर आवश्यक होत. इथे मात्र त्या विषयाचे अगदीच 'भजे' झाले आहे. कारण मूळ गंभीर प्रश्नाला दिलेली विनोदाची डूब. विनोदी ढंगानं पेश केल्यामुळे नाटकाची सगळी चवच गेली आहे. ना धड विनोदी, ना धड गभीर–झाली आहे ती एका चमत्कारीक रसाची निर्मिती.

नाटकाचा हेतू आणि विषय–याबाबत झालेली गफलत– हे नाटककाराचे अपयश म्हणायचे की दिग्दर्शकाचे ?

यशवंत दत्तासारख्या मातब्बर कलाकाराचा पार मामा झालाय इथ. त्याच्या ताकदीला इथ मुळीच वाव नाही.

वाटेल ती बोलणी ऐकून घेणारा 'विश्वासू' नोकर, आणि नवरा बाहेरून आल्यावर त्याचा कोट आणि बूट स्वत: काढून आत नेऊन ठेवणारी 'आदर्श' गृहिणी प्रेक्षकानी स्टेजवर अजून किती काळ पहायचो ? कारण प्रत्यक्षात तरी आता या गोष्टी आता नामशेष झाल्या आहेत

सुरुवातीला अर्धा पाऊण तास दिसणारं सुखी ससाराच चित्र मात्र चागलं उतरलंय. मुलीला खरा प्रकार कळतो त्यावेळचा प्रसंगही चागला झालाय. त्या मुलीनं (निशीगधा वाड) कामही केलंय छान.

तर मडळी ! असं हे नाटक ! मलईदार तर राहोच; पण साधही श्रीखंड नाही. त्या श्रीखडाच झालय नुसतं चोथापाणी !

— रंजना पंडित

विज्ञान

# नीती आणि मनोरंजन

शब्दाचा–भाषेचा एक वेळ मनोरंजनासाठी उपयोग होऊ शकेल हे आपण समजू शकतो. उदाहरणार्थ शब्दकोडी, समस्यापूर्ति इत्यादी किंबहुना शब्दांचा मनोरंजनासाठी किती विविध प्रकारे उपयोग होऊ शकतो व आजपर्यंत तो कसा करण्यात आला आहे, यासबंधी नुकताच एक ग्रंथ प्रसिद्ध झाला आहे. ग्रंथाचे नाव आहे : 'वर्ड गेम्स' आणि लेखकाचे नाव आहे : टोनी औगार्ड. हा ग्रंथ ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसने प्रसिद्ध केला आहे. या ग्रथाच्या प्रस्तावनेत तो म्हणतो : 'One of the more lovable characteristics of human beings is their persistent tendency to find new and often frivolous use of things.' अर्थात माणसाचा लोभसवाणा गुण असा की तो वस्तूचे नव–नवीन व बरेचदा हलकेफुलके उपयोग शोधून काढीत असतो. पण नीतिशास्त्र हे इतके गभीर शास्त्र आहे की या विषयाची अत्यंत आवड असल्याशिवाय कोणीही या विषयावरील ग्रंथ वाचण्याच्या अथवा या विषयाची चर्चा करण्याच्या भानगडीत पडणार नाही. अशा स्थितीत जर एखादी कल्पक व्यक्ती याचा मनोरजनासाठी-खेळासाठी उपयोग करून दाखवीत असेल तर मग आपल्याला तिचे मन:पूर्वक कौतुकच केले पाहिजे. हेन्री मॅको नावाच्या कॅनेडियन माणसाने 'A Question of Scruples' नावाचा खेळ शोधून काढला आहे या खेळात त्याने नेमका नैतिक समस्यांचा खेळासाठी उपयोग केला आहे अर्जुनाला युद्धभूमीवर पडलेला प्रश्न हा शेवटी नैतिकच होता *तो म्हणजे आपल्या नातेवाईकाना,* गुरूला मारून हस्तिनापूरचे राज्य मिळवायचे की युद्धसन्याम घ्यायचा. त्याच्या नैतिक समस्येने गीता या काव्याला जन्म दिला. नैतिक समस्या एक वेळ कथा, काव्य, कादबरी किंवा नाट्य यांना जन्म देईल हे आपण समजू शकतो पण तिचा मनोरंजना-

साठी–खेळासाठी उपयोग होऊ शकतो ही नवीन व आगळी गोष्ट आहे.

मॅकोने तयार केलेल्या खेळाच्या सेटची किमत अमेरिकेत १८ डॉलर असून हा खेळ हळूहळू लोकप्रिय होत आहे. खेळाचा प्रसिद्धी प्रमुख आईसेनबर्ग याला खेळाचे एक लक्ष संच विकले जातील अशी खात्री वाटते. या खेळाची लहान मुलांसाठी आवृत्ती काढण्यात मॅको सध्या गुंतलेला आहे. या खेळाचा एक महत्त्वाचा फायदा म्हणजे यामुळे लोकांमधील परस्पर संबंधाला एक नवीन उजाळा मिळण्याची शक्यता बळावली आहे.

### खेळाचे स्वरूप

मॅकोने एकूण २४५ कार्डस् तयार केले आहेत. प्रत्येक कार्डावर एक नैतिक समस्या लिहिली आहे. उदाहरणार्थ : (१) समजा तुम्हाला आयकर विभागातर्फे चुकून जास्त रिफंड मिळाला तर तुम्ही स्वतःहून ही गोष्ट त्या विभागाला कळवाल का ? (२) तुमच्या एका मित्राला नोकरी हवी आहे. तुमच्या शिफारसपत्राने ती त्याला मिळण्यासारखी आहे. पण तुमच्या मते तो त्या नोकरीस लायक नाही. मग तुम्ही त्याला ते पत्र लिहून देण्यास नकार द्याल का ? या कार्डावरील काही प्रश्न साधे व काही गंभीर स्वरूपाचे आहेत. या प्रश्नांचे योग्य उत्तर ठरविणारे कुठलेही परीक्षा मंडळ नाही किंवा या प्रश्नांची ठराविक उत्तरेही नाहीत. मग हा खेळ खेळायचा कसा ? या खेळात प्रश्नांचे व उत्तरांचे कार्डस् वेगळे असतील. प्रत्येक प्रश्न वाचून त्याचे उत्तर कार्डावर लिहायचे. लैंगिक, कौटुंबिक, व्यावसायिक समस्यांची उत्तरे फक्त हो / नाही / नक्की सांगता येत नाही अशा स्वरूपाची असू शकतील. मग तुम्ही तुमच्या प्रतिस्पर्ध्याची उत्तरे न बघता तो काय उत्तर देईल याचा अंदाज करायचा. तुमचे जितके अंदाज बरोबर निघतील त्या प्रमाणात तुम्ही विजेते. अर्थात यासाठी तुमची स्वतःची उत्तरे लवकर लिहून होणे आवश्यक आहे अशा रीतीने दुसऱ्याच्या उत्तरांचा नेमका अंदाज व आपली उत्तरे लवकर लिहून होणे यावर खेळाडूचे यश अवलंबून राहील.

या खेळात खेळाडू खोटे उत्तर देऊ शकेल किंवा गप्पा मारू शकेल. पण त्याला जर इतरांनी आव्हान दिले तर मग वादविवाद होईल व तो वाद खेळाडूंमध्ये मतदान होऊन मिटेल. जो खेळाडू प्रामाणिक सिद्ध होईल त्याला प्रशस्तीपत्ररूपी कार्ड देण्यात येईल. या खेळाची खरी गंमत म्हणजे याच्या माध्यमातून होणारी चर्चा, होणारा वाद-विवाद व एकमेकांच्या स्वभावाचे कळणारे बारकावे. या खेळाचा एक उपयोग असा की याच्या द्वारे : ‘लोक साधारणपणे ज्या विषयावर चर्चा करणे टाळतात त्याची चर्चा घडवून आणणे व त्या द्वारे लोकांच्या विचारांची दिशा जाणून घेणे.’

काही गंभीर स्वरूपाच्या प्रश्नांमुळे कधी कधी गरमागरम चर्चा होऊ शकेल. उदाहरणार्थ : विवाहबाह्य संबंधावरील प्रश्न किंवा व्यवसायाशी संबंधित प्रश्न. पण खेळाचा उद्देश गंभीरता टाळणे हा असल्याने मॅकोने असे प्रश्न फार कमीच घातले आहेत. त्याने बरेचसे हलकेफुलकेच प्रश्न निवडले आहेत. उदाहरणार्थ : तुमच्या मित्राच्या अंगाला उग्र दर्प येत असेल तर तुम्ही ही गोष्ट त्याला सांगाल का ?

—अ. ल. देशपांडे


## राजहंसचे नवे विज्ञान प्रकाशन

टारझनच्या हातात एक पुस्तक पडलं....
पांढऱ्यावर काळे विचित्र आकार पाहून तो बुचकळ्यात पडला.
येत्या काही वर्षांत आपण सगळेच टारझन ठरू की काय ?

अनोळखी वस्तू, अनोळखी भाषा आणि गूढ वाटणाऱ्या शक्ती असलेलं एक जग आपल्या जगात घुसत चाललेलं आहे.
हे आहे कॉम्प्युटरचे जग.

एक लक्षात घ्या. या कॉम्प्युटरमध्ये काहीही जादू नाही.
ते केवळ एक यंत्र आहे.
कर्ताकरविता माणूसच आहे.

या यंत्रात माहिती कशी घातली जाते इथपासून ते हवी असलेली माहिती बाहेर पडेपर्यंत प्रत्येक घटनेची माहिती सांगणारे आणि या सगळ्याचा नेहमीच्या अनुभवांच्या आधारे खुलासा करणारे पुस्तक

# या कॉम्प्यूटरमध्ये दडलंय काय ?

**लेखक : राजीव साने**

किंमत : रुपये तीस

राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११०३०

दूरध्वनी : ४४३४५९

C/o श्री. वा. र. गोडे
४१ भवानीशंकर रोड
जोशी वाडी, चितळे पथ कॉर्नर
दादर (प.) मुंबई ४०० ०२८
दूरध्वनी : ४२२५४५५

# भारत जोडो : पृष्ठ ४ वरून

नंतर अगदी मोजक्या शब्दात बाबानी वरील दोघाना सागितलं की, ते या शिबिरातून कोणते सस्कार तरुण पिढीवर बिंबवणार आहेत. महारोग्याबद्दल ते म्हणाले की, त्याचा रोग बरा झाला की तेही इतर चारचौघासारखेच निरोगी असतात. त्यांना समाजाने भिन्नपणे वागवू नये. कारण ते आपल्यापैकीच आहेत. तरी देखील लोक त्यांच्याजवळ जायलाही दचकतात. त्यांची वाणी ओजस्वी होती. हा होता पहिला सस्कार.

श्री. हरीशभाईंना, नतर वितरण वगैरे आटोपल्यावर जेवताना, ते भेसूर चेहरे आठवून जेवण नीटसं जाईना. प्रमोद मात्र मजेत जेवत होता. प्रमोदने हरीशला धमकावलं, 'नीटपणे जेवतोस का बाबाना बोलवू ? तू काही खरा नेता नाही बनू शकणार.' त्याचं वाक्य पुरं होत तोच बाबा आले. त्यानी पण अद्याप जेवण केलं नव्हतं. ते हरीशला बरोबर घेऊन पाकशाळेत गेले. नंतर हरीशने त्या आचाऱ्याच्या व बाबाच्या सहवासातच जेवण केलं.

या शिबिराला आता सोळा वर्षे होत आली. परतु डॉ. हरीशना त्यातला प्रत्येक क्षण अजून ताजा वाटतो. बाबा आमटे हे महात्माजीच्याच व्यक्तित्वाचं जणू एक विराट रूप ! त्यांच्या स्वार्थरहित सेवाकार्याने साऱ्या जगाला ते आज माहीत झाले आहेत. विश्वस्तरावरली अनेक पारितोषिक त्यांच्याद्वारे कृतार्थ झालीत; अजूनही पुढे होतील.

अशा धोक्याच्या प्रातात पाऊल टाकायला व आपली उभी हयात त्यात वेचायलाही एक घटना कारणीभूत झाली. पस्तीस वर्षांमागे एका कण्हणाऱ्या कुष्ठरोग्याने त्याना नव्या कर्माची दिशा दाखवली. त्या रात्री मुरलीधर देवीदास आमटेंने कुष्ठरोगाने पिडीत, तुळशीराम नामक इसमाला पाहिलं व त्यांना रडूच फुटलं, नतर मनात आल की, उद्या आपल्यालाही असला रोग झाला तर ? त्या रोगाने वाटणारी घृणा त्याना क्षणिक भयभीत करती झाली; परंतु ते तर सदाचे निर्भय असलेले ! म. गांधी त्यांना 'अभय साधक' म्हणायचे...! म्हणून दुसऱ्याचक्षणी आव्हान स्वीकारून ते या दुर्धर रोगाविरुद्ध संघर्ष करायला सिद्ध झाले. कलकत्त्यात त्यानी कुष्ठरोग चिकित्सेचा अभ्यासक्रम पुरा केला आणि मग सर्व सामर्थ्यानिशी, मनोभावाने कुष्ठरोग्यांच्या, कष्ट निवारणाच्या कार्याला वाहून घेतलं. कुष्ठरोग्याचं कल्याण, हा एकच ध्यास ! त्यासाठी त्याना आपल्या घरातील आप्ताचा विरोधही पत्करावा लागला. आपली पत्नी व एक लंगडी गाय याना साथ घेऊन ते या कार्यासाठी बाहेर पडले... आज त्यांच्यापाशी चारशेवर एकर क्षेत्राच 'आनदवन' असून, त्यात अडीच हजार माणस वास्तव्यास आहेत. हे ते लोक आहेत जे पूर्ण निराधार होते, व आज आधार लाभल्याने जे आनंदात जीवन जगताहेत. एका माणसाचं केवढं हे कर्तृत्व ! अर्थात त्यासाठी त्यांना अहोरात्र खस्ता खाव्या लागल्या, अफाट परिश्रम करावे लागले, असंख्य संबंध जोडावे लागले.

दुसरे दिवशी भोजनप्रसंगी एका 'मॉडर्न' युवतीने तक्रार केली की, हे जेवण काही चागलं नाही. तिला दोन भाज्या, रायत व तळलेली डाळ हवी होती. ती तक्रार बाबाच्या कानी गेली. सायंकाळच्या सभेत त्यानी सयत स्वरात सभेला सागितल, 'ही 'श्रमसंस्कार छावणी' आहे. आपण एका तलावासाठी खोदकाम करता आहात. तुम्हाला त्यासाठी सामान्य मजुराला मिळते तितकीच मजुरी मिळेल त्या पैशामधून इतकच केवळ घडू शकतं की, त्यातून दोनदा चहा-नाश्टा व दोन वेळा जेवण देता येत—जस आम्ही देत आहोत. आता तुम्हीच विचार करा की, ज्या मजुराचं त्याच्या मजुरीत कसंबसं पोट भरतं, तो घर, कपडा, मुलाच पालन या गोष्टी कशा काय मिळवू शकणार ?... ज्या दिवशी माझ्या देशातल्या मजुराला इतका मोबदला मिळेल, की ज्यात तो दोन दोन भाज्या, रायत व तळलेली डाळ खाऊ शकेल, त्या दिवसापासून अशा शिबिरांतून मीदेखील तसलच जेवण देईन—जे वाटल्यास मग आपण काटचा-चमच्यानेही खाऊ शकाल !'

सभत एकदम शातता पसरली. अनेक प्रश्न मनात उठले. तसे तर मजुराना सर्वच बघत आलेले, ते गरीब असतात हेही कळलेलं; पण त्यांच्या वास्तव स्थितीची खरी ओळख त्या संध्याकाळीच झाली. अन्—ह्या रात्रीच्या भोजनापासून त्या मॉड् युवतीने इतरांसारखच पत्रावळीवर वाढलेले पदार्थ नि.शकपणे, आनंदाने खायला सुरुवात केली.

ज्या वेळी सर्व शिबिरार्थी तलाव खोदण्याच्या कामात गढलेले असत त्यावेळी मुख्य कार्यालयात राशन समिति, परिवहन समिती, चिकित्सा समिती आदी सर्व समितीचे सदस्य दुसऱ्या दिवसाच्या पूर्ण कार्यक्रमाची रूपरेषा निश्चित करीत असत. सास्कृतिक सभेचे मुख्य संयोजक, गुजराथी चित्रपट, रेडिओ सगीतात गाजलेली जोडी शाह दपती ! चिकित्स विभाग डॉ. अशोककडे, परिवहन व्यवस्था होती बाबांच्या पुत्राकडे, विकास आमटेकडे, तर राशन वगैरेच सगळ नियोजन होतं बाबाच्या सौभाग्यवती साधनाताईंकडे. त्याना सार्थनाम—साधना म्हणता येईल. बाबांचं तर असं मत आहे की, त्यांच्या सर्व साधनेची केंद्रशक्ती साधना आमटे याच होत. बाबा त्याची नेहमी थट्टा करायचे, त्यांचेशी विनोदी गप्पा करायचे पुराणातून एक कल्पना असते ना शिवपार्वतीची, की ते दोघंजण मृत्युलोकावरून विहार करतात आणि गोरगरिबाचं दु:ख-दैन्य पाहून, पार्वती त्याची दु:ख दूर करण्याकरता प्रेमळपणे शिवाची आर्जव करते व शिवशंकर तत्काळ त्याचं दैन्य हरण करतात. तशीच ही आधुनिक शिव-पार्वतीची जोडी आज दीन—दलिताचं दु:ख हरण करण्याच्या कामात अहर्निश गुतलेली आहे व त्याना साथ करताहेत त्यांच्या कुटुबातले सगळे 'गण'—मुलं, सुना आदी सर्वजण !

एक दिवस हरीश वाद्य-वृंद कार्यक्रमाची रूपरेषा तयार करीत असल्याचं पाहून बाबा उद्गारले, 'मोती तर पाणीदार आहेत ! परंतु तू ह्याची माला गुफूनच श्रोत्याना सादर कर. देशातल्या विभिन्न कोनाकोपऱ्यांतून आलेल्या तरुण—तरुणीचा एका सुरेल चालीतला प्रोग्रॅम बनव. आजची खरी गरज तर तशीच आहे—हार्मनीची'— इतकं बोलून ते रानाकडे गेले. आणखी एका नव्या संस्काराची भर हरीशच्या मनात पडली.

सोमनाथचं हे स्थळ तसं दाट जगलात आहे. स्नानासाठी सर्वजण नदीवर जात.

युवतीही. मात्र त्यांच्या स्नानाच्या जागेच्या सभोवार उंच पडदा बांधला होता. श्री. आमटे नारीमुक्तीचे समर्थक आहेत. तरुण–तरुणींची मैत्री त्याना रास्त वाटते–फक्त त्यात बेईमानी त्यांना मंजूर नाही. एका संध्याकाळी हरीश आपल्या दोन–तीन मित्र-मैत्रिणीसोबत जंगलात फिरायला गेले होते. भयकर उष्णतेनतर त्यावेळी प्रथमच गार वारा सुटला होता, त्यामुळे व मधुर संगती-मुळे ते गप्पात बराच वेळ रगून गेले. वेळेचं भान राहिलं नाही. साहजिकच तिथून परतायला उशीर झाला. शिबिरापाशी जातात तो बाबा तिथे उभे. केवळ अमोद व हरीशला उद्देशून ते म्हणाले, 'कुणाच्या भेटी–गाठीत मला काही वाईट दिसत नाही. मी कुणाला रोखतही नाही; परंतु तुम्ही आपल्या आनंदात इथली जबाबदारी विसरलात. आज भोजनाचं वाटप करायचं नाही का? काही करा पण अगावर घेतलेली जबाबदारी विसरू नका.' ते बोलण ऐकून नवल हतबुद्ध!

पण अद्याप जेवणाला वेळ होता. त्यांनी आपापली ड्यूटी हाती घेतली. सर्वांची जेवणं झाल्यावर हे दोघेही जेवायला बसले; पण दोघंही माना खाली घालून जेवत होते. ते लक्षात येताच बाबा म्हणाले, 'अरे, याना आणखी चपात्या वाढा, ह्याच लक्ष नाही जेवणात...' तीच तेजस्वी नजर, नी तसंच गूढ स्मित. मग म्हणाले, 'भोजन शांतपणाने करा, तुम्ही जबाबदारी चोख सांभाळली आहे, मनात त्याची पुष्टी असली तर जेवण चवदार लागतं...!' त्या दिवशी असे हे दोन नवेच सस्कार त्यांच्या पदरी पडले.

– एके दिवशी ३०–४० जण जगलात वाघ बघायला निघाले. वाटेत त्याना एक स्थानिक माहितगार मिळाला. तो सगळ्याना वाघाच्या गुहेकडे घेऊन गेला. सर्वांच्यावरोबर विकास आमटे पण आपल्या बदुकीसह चालत होते. 'दुरूनच वाघ दाखव'– अस गाईडला सागत होते. थोड्याच वेळात वाघाच्या पजाचे मोठाले ठसे दिसू लागले. तशी जरा भीती वाटू लागली. तेवढ्यातच दूर कुठे की वाळल्या पानांची खडखड कानी पडली. सगळे सावध झाले... जीव मुठीत धरून – तोच झाडाच्या सावलीतून दोन आकृती पुढे सरसावल्या. बघतात तर काय; बाबा अन् ताई! दोघंही निडरपणे त्या जगलातून हिंडत होते. हातात कुठलं शस्त्र-पण नाही. बाबा आपले नेहमीच्या त्याच साध्या वेषात. वाघ तर बहुधा आमच्या गलक्याने पळून गेला असावा...! सर्वांकडे पहात बाबा एकवार हसले व विचारते झाले की, तुम्ही विकासला बंदुक वापरता येते का, हे तरी विचारलत का? की शिकवू आत्ताच?

– नतर समजल की ते एक निष्णात निशाणबाज आहेत. तर हा असा मिळाला निर्भयपणाचा सस्कार.

श्री. हरीशना बाबा 'रिपोर्टर' म्हणून सबोधायचे. कारण नुकतेच ते लेखन करू लागले होते. त्यात अजून ते अपरिपक्व होते. तरी पण, मुलाखती, वार्ता वगैरे लिहीत असत. त्याचमुळे त्यानी बाबाचीही मुलाखत घेतली होती. बाबा त्याना अधूनमधून टोकायचे की तुम्ही नुसते रिपोर्टच लिहीत राहणार, की स्वतत्र लेखन पण करणार? एखादी कविता तरी सुनवा... नाही तर असं करा, की साधनाताईंवरच एक कथा लिहा की मी त्यांना कशी दु.ख दिली?– त्याना हरीशच्या आतला सर्जनकार जागा करायचा, असे. थोडक्यात सागायचं, तर संपर्कात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच ते इतक्या बारकाईने अध्ययन करतात की त्याच्यात कसली उणीव राहू नये.

शिबिराच्या समारोपाच्या वेळी बाबानी सर्वांना मनसोक्त आशीर्वाद दिले. ज्याच्या नावाचा उल्लेख केला ते तर आनदाने भरून गेले. प्रमोद रेड्डीला त्यानी 'मिस्टर सोमनाथ कॅंप' व हरीश नवलना 'मिस्टर पॉप्युलर सोमनाथ कॅंप' या उपाधी प्रदान करताच, भावावेगाने दोघांनीही त्याच्या चरणावर धाव घेतली. श्री. नवल म्हणतात की, आजवर त्याना मिळालेल्या पदव्यानी-देखील असा सुखद गौरव झाल्यागत वाटलं नाही, जसा तो त्या अनौपचारिक पदवीमुळे झाला.

– बाबानी अनेकाना जीवन दिलं, मातीमोल झालेल्या असंख्याची आयुष्यं सावरली, आदिवासींच्या जीवनातला अंधार दूर केला, महारोग्याना आलिंगन दिली, अपंगाना सामर्थ्यशाली बनवलं, तरुणाच्यात नवे संस्कार निर्माण केले, राष्ट्रीय चैतन्य जागतं ठेवलं, श्रमिकांच्या श्रमाच महत्त्व समाजाला पटवून दिल. या यज्ञकार्यात घरातील सर्वांना जुपलं आता त्यानी नुकतच बहात्तराव्या वर्षात पाऊल ठेवल आहे; पण याही वयात त्यांच्यात तोच अदम्य उत्साह, तेच साहस नी तोच आत्मविश्वास आहे. हे त्याच्या 'भारत जोडो' अभियानावरून सर्वविदित आहेच. कुणाच्या निरर्थक आयुष्याची वर्षं बाबाच्या वाटयास गेली, तर अशी अनेकानेक वर्षं त्यांना लाभावीत!

–मनोहर देखणे

('धर्मयुग' वरून साभार)


# कुंपण आणि आकाश

मंगला गोडबोले

किमत २० रुपये

राजहंस प्रकाशन १०२५ सदाशिव, पुणे ३०.

MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage No–11 ) Regd. No. PNCW–28

## तेंडुलकरांची नाटके

**डॉ. चंद्रशेखर बर्वे**

" वहात वहात आयुष्याच्या मध्यभागी पोचलो आहे. अथांग खोली आता प्रत्यक्ष जाणवू लागली आहे.... समुद्रावरून समुद्रपक्षी फिरतात, तसा मी जीवनावरून मनानं दिशाहीन, निरुद्देश, संथपणे भिरकांडत, तरंगत आहे....उत्सुकता एकच आहे, या समुद्राचा तळ किती खोल असेल, तो कसा दिसत असेल ? "

जो तळ दिसला तो तेंडुलकरांनी आपल्या नाटकांतून दाखवला,

समुद्रपक्ष्याप्रमाणे शांतपणे भिरकांडणाऱ्या तेंडुलकरांची नाटके मात्र वादळी अन् वादग्रस्त ठरली !

या साऱ्या म्हणजे पंचवीस नाटकांचा व तेंडुलकरांच्या श्रेयाचा, विवेचक दृष्टीने, पण आस्वादक वृत्तीने शोधघेण्याचा हा एक प्रयत्न–

**तेंडुलकरांची नाटके**

किंमत : तीस रुपये

## कल्पान्त

**मनोहर राईलकर**

आजकाल सटरफटर राष्ट्रंसुद्धा अणुशस्त्रांचे ढीगच्या ढीग बाळगून आहेत. अणुयुद्धाच्या संभाव्य परिणामांचं गांभीर्य या सर्वांना समजत असेल का ? आणि एखाद्या बेजबाबदार राष्ट्रानं युद्ध सुरू केलंच तर ?

किरणोत्सर्गी धूळ जगभर पसरली तर ? तर काय होईल ? या प्रश्नाचं ज्वलंत व जिवंत उत्तर म्हणजे ही कादंबरी.

' ऑन द् बीच ' या नेव्हिल शूटच्या कादंबरीचा भावानुवाद

**कल्पान्त**

किंमत : पस्तीस रुपये

## लांडगा आला रे ऽ आला

लेखक : **फर्ले मोवॅट**

रूपांतर : **जगदीश गोडबोले**

फर्ले मोवॅट या जीवशास्त्रज्ञाने घेतलेल्या लांडग्यांच्या जीवनाच्या शोधाची ही कथा. कल्पितालाही मागे टाकणारा, रोमांचक अनुभव मोवॅटला उत्तर ध्रुवावरच्या या सफरीत आला. लांडग्याविषयीची माणसाची पूर्वापार मतं पार कोसळवून टाकणारी ही कहाणी, त्याच वेळी मनुष्य स्वभावावरही विदारक प्रकाश टाकते.

**लांडगा आलारे ऽ आला**

किंमत : तीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
दूरध्वनी : ४४ ३४ ५९

C/o श्री. वा. र. गोडे
४१ भवानीशंकर रोड
जोशी वाडी, चितळे पथ कॉर्नर
दादर ( प. ) मुंबई ४०० ००८
दूरध्वनी : ४२२५४५५